डॉ. स्मिता दामले

अस्ताचलावरील तारे



अस्ताचलावरील तारे

डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

अस्ताचलावरील तारे

डॉ. स्मिता दामले
4212, fishermans Pier Court,
Lutz,
Florida, 33558.
U.S.A.
Emails:
smitasuhas67@rediffmail.com
suhasdamle341@hotmail.com
Mobile: 9867364634

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9869674820

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन :१४ जानेवारी २०२३ (मकरसंक्रांती)

डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे दहावे पुस्तक, “अस्ताचलावरील तारे” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी

प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी "

उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

"असं घडलं होतं" या नवव्या ४५० पानी पुस्तकात त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं, का घडलं होतं आणि असं घडलं होतं, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

अस्ताचलावरील तारे हे त्यांचे ई साहित्यवरील दहावे पुस्तक आहे.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली दहा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

टीम ई साहित्य

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

या पुस्तकातील काही चित्रे गुगलवरून घेतली आहेत. ती अपलोड करणाऱ्यांचे आभार.

टीम ई साहित्य

कै. बापूसाहेब दामले

यांच्या स्मृतीस अर्पण.

प्रस्तावना.

सब भूमी गोपालकी. हा भारत देश तर त्या गोपाळाचाच. या भूमीवरील गगनही विशाल. तिच्यालगतचा महासागरही विशाल. त्याच्यापलिकडे क्षितिजाची रेषाही विशाल. वसुंधरेचं स्व:ताभोवती गरगरत राहणं आणि आतल्या जीवांचं कामक्रोधलोभमोहमदमत्सराच्या तंतूंमधे स्वत:भोवती कोष विणत, त्यात अडकत जाणं हाच खेळ युगानुयुगे चालला आहे. या तंतूंकोषाच्या बाहेर पडून ज्यांनी स्वत:ची सृष्टी निर्माण केली ते धृवाचं अढळपद घेऊन सर्वांच्यावर झळकत राहिले. उदयाचलावर आले, मध्यान्हात झळकले आणि अस्ताचलावर दूर गेले. आजही ते मावळतीचं तारांगण तेवढंच तेजस्वी आहे.

"असं घडलं होतं" या पुस्तकाचा हा दुसरा भाग. यातील नायक नायिका वेगवेगळ्या कारणांसाठी गाजले. हसन गंगू बहामनीने बहामनी राजवट सुरू केली. त्याच्या वारसांच्या अखेरीस दक्षिण भारतात ५ शाह्या निर्माण करणारा निमित्त ठरला. पातशाही बेगम नूरजहाँ प्रत्यक्ष अधिकारसूत्रे हाती न धरता, जहाँगीर पातशहाला मुठीत ठेवून, पडद्यामागील पातशाही बेगम ठरली. शहाजीराजांच्या पत्नी जिजाऊसाहेब यांनी पुत्र शिवरायांना जन्म दिला. स्वराज्याच्या जननी ठरल्या. जिजामाता आणि नूरजहाँ, दोघीही असामान्य कर्तृत्वाच्या होत्या. पेशवा नानासाहेब १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे नायक ठरले. शाहूराजांचे पेशवे बाळाजी विश्वनाथांच्या घराण्यातील हे शेवटचे पेशवे. बहादूरशहा जफर मुगल सल्तनतीचा शेवटचा बादशहा ठरला. मिरज

संस्थानच्या पटवर्धन घराण्याचे वारस, तासगावचे सरदार परशुरामभाऊ पटवर्धन स्वराज्यातील लष्कराचं सेनापतीपद सांभाळतांना, कोसळणाऱ्या स्वराज्याच्या डोलाऱ्याचे साक्षीदार बनले.

नियतीने घडवलेले, विविध गुणांनी, नाट्यमय घटनांनी यशस्वी झालेले आणि पराभूतही झालेले, कालप्रवाहात अजूनही झळकत राहिलेले हे नायक वाचकांसमोर ठेवत आहे. सर्वांना ही चरित्रं आवडतील अशी आशा आहे.

स्मिता दामले

४ जानेवारी २३

अनुक्रमणिका.

१. हसन गंगू बहामनी. - दिल्लीचा सुलतान महंमद तुघलकाचा दक्षिणेतील दौलताबाद किल्ला जिंकून दक्षिण भारताचा प्रमुख झाला. बहामनी राजवटीचा संस्थापक. याच्या घराण्याचा शेवट झाल्यावर दक्षिण भारतात निजामशाही, बिदर शाही, इमादशाही, कुतुबशाही आणि आदिलशाहीची निर्मिती. याचा मृत्यू १० फेब्रुवारी १३५७ ला झाला.

२. पातशाही बेगम नूरजहाँ - सम्राट अकबरानंतर आलेला त्याचा पुत्र, मुगल बादशहा सलिम उर्फ जहाँगीर याची चतुरस्त्र, बहुगुणी, बेगम. जहाँगीरला ताब्यात ठेवून हिनेच राज्य कारभार केला. जन्म अफगाणिस्तानच्या मरूभूमीत १५७९ मधे. मृत्यू-१७ डिसेंबर १६४५ लाहोरमधे.

३. जगन्माता जिजाऊसाहेब. - शहाजीराजांच्या पत्नी, शिवरायांच्या मातोश्री, सिंदखेडचे राजे लखूजी जाधवांची कन्या. पुण्यात लहान शिवरायासह आल्या आणि शहाजीराजांनी पाठवलेल्या उत्तमोत्तम अधिकाऱ्यांच्या मदतीने शिवरायांना मोठं केलं, त्यांना घडवलं. जन्म - सन १५९९ च्या सुमारास. मृत्यू - शिवप्रभूंच्या राज्याभिषेकानंतर १५ दिवसांनी रायगडच्या खालच्या पांचड निवासी १७ जून १६७४.

४. नानासाहेब पेशवे.- विठूरचे पेशवे दुसरे बाजीराव यांचे दत्तकपुत्र. १८५७ सालच्या स्वातंत्र्य युध्दाचे शिल्पकार. जन्म- १९ मे १८२१,

माथेरानजवळ वेणू गावात. मृत्यू- नैमिषारण्यात. मृत्यूची तारीख नक्की नाही.

५. बहादूरशहा जफर – दिल्लीचा शेवटचा नाममात्र बादशहा. पण १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतल्यामुळे इंग्रजांनी त्याला मंडालेच्या कैदेत ठेवलं. तिथे त्याचा मृत्यू झाला. जन्म - २५ ऑक्टोबर १७७५. मृत्यू ७ नोव्हेंबर १८६२, ब्रह्मदेशात..

६. सरदार परशुरामभाऊ पटवर्धन. – मिरजेच्या पराक्रमी सरदार पटवर्धन घराण्यात जन्म. नाना फडणीस कारभारी असतांना सेनापतीपद मिळालं. जन्म- १७४०. मृत्यू- १७ सप्टेंबर १७९९ या दिवशी पट्टणकुडीच्या लढाईत वीर मरण

हसन गंगू बहामनी.

जन्म १२९०. मृत्यू १० फेब्रुवारि १३५७.

हसन – एक साधा नोकर.

एका समुद्रापासून दुसऱ्या समुद्राला जोडणाऱ्या प्रवाहाला सामुद्रधुनी म्हणतात आणि एका समर्थ राजसत्तेपासून दुसरी महान राजसत्ता जोडणाऱ्या माध्यमाला अल्लाउद्दीन हसन गंगू बहामनी या नावाने ओळखलं जातं. दिल्लीच्या महंमद तुघलकाच्या सत्तेपासून नवीन बहामनी सत्तांतर आणि त्यातून ५ शाह्यांचं स्थित्यंतर याच अल्लाउद्दीन हसन गंगू बहामनीमुळे निर्माण झालं. जफरखान हे त्याचं मूळ नाव.

हसन गंगू एक सामान्य तरूण, घियासुद्दीन तुघलक सुलतानाच्या अमदानीत दिल्लीत राहात होता. गंगू नावाच्या ज्योतिषाकडे तो नोकर म्हणून कामाला होता. अत्यंत प्रामाणिक म्हणून त्याचा लौकिक होता त्यामुळे राजपुत्र महंमद तुघलकाचाही तो आवडता झाला होता. शहजादा महंमदने हसनला एक बैलजोडी आणि जमिनीचा एक तुकडा त्याच्या पोटापाण्याची सोय म्हणून बक्षिस दिला होता. एक दिवस शेत नांगरतांना हसनचा नांगर मधेच अडकला. तो कशात अडकला हे हसनने पाहिलं तर जमिनीत पुरलेल्या एका हंड्याच्या साखळीत त्याचा नांगर अडकला होता. हसनने तो पितळी हंडा बाहेर काढून पाहिलं तर त्यात सुवर्णाच्या मोहरा भरलेल्या होत्या. हसनने प्रामाणिकपणे तो हंडा आपल्या गंगू मालकाला दिला. त्यांच्या या इमानदारीवर खूष होऊन गंगूने त्याचं कौतुक शहजादा महंमदकडे केलं. तेव्हा महंमदने आपल्या बापाच्या,

सुलतान घियासुद्दीनच्या कानावर हे घातलं. सुलतान हसनवर खूष झाला आणि त्याने हसनला १०० घोडेस्वारांची मनसबदारी दिली.

भाग्योदय -

हसनचा हा भाग्योदय गंगू ज्योतिषानेही ओळखला होता. त्याने हसनला सांगितलं की तुझा मोठा उत्कर्ष होणार आहे, तुझ्या भाग्यात राजयोग आहे, पण जेव्हा तू खरोखर राजा बनशील तेव्हा माझं गंगू हे नाव तुझ्या नावापुढे लाव आणि मला तुझ्या राज्याचं अर्थसचिवपद देईन असं वचन मला दे. हसनने ते कबूल केलं. तेव्हापासून अल्लाउद्दीन हसन आपल्या भाग्याची वाट पाहात बसला. दिल्लीतील प्रसिध्द संत निजामुद्दीन औलियानेही त्याला हेच भविष्य सांगितलं होतं. काही काळानंतर घियासुद्दीन तुघलकाचा मृत्यू झाला आणि महंमद सुलतान बनला. महंमद तुघलक सुलतानाने आपला शिक्षक कुतलबखानला दक्षिणेचा सुभेदार म्हणून दौलताबादला पाठवायचं ठरवलं. त्यात जे काही अधिकारी पाठवायचं ठरवलं त्यात हसनलाही पाठवलं. दौलताबादला गेल्यावर हसनला रामबाग जिल्ह्यातील कुंची हे गाव जहागिर म्हणून दिलं. असा तऱ्हेने हसन गंगू दक्षिणेत येऊन स्थिरावला.

दिल्लीमधे महंमद तुघलक तख्तावर बसला तेव्हा, महंमद घोरीपासून विस्तारित गेलेलं आणि अल्लाउद्दीन खिलजीमुळे भर पडलेलं दक्षिणेतील राज्यं, असं त्याच्या हाती प्रचंड मोठं साम्राज्य आलेलं होतं. मुलतानपासून वारंगळपर्यंत (आंध्र) गुजरातपासून बंगालपर्यंत त्याची सत्ता होती. तो स्वत: अत्यंत बुध्दिमान सुलतान होता..धर्मशास्त्रांचा अभ्यासक होता. हिंदू धर्मपंडितांशी त्याची चर्चा चाले. जैन मुनि प्रभा सुरी यांच्याकडून जैन धर्म जाणून

घेण्साठी त्याने मुनिंना रात्रभर आपल्याकडे ठेवून घेतलं. त्याची आई हिंदू होती, त्यामुळे त्याला लोक जौना नावाने ओळखत. हसनचा मालक गंगू हा हिंदू असल्यामुळे महंमद तुघलकाचा मित्र होता. सुलतानाची चाकरी करणारा तो पहिला हिंदू ब्राह्मण होता. त्याआधी सर्व ब्राह्मण वेदाभ्यास आणि धर्माचं अध्ययन करत असत. सुलतानाची नोकरी त्यांनी केली नव्हती. पण गंगूने सुलतानाकडे नोकरी धरल्यावर हळूहळू ब्राह्मणही सुलतानाच्या पदरी चाकरीत शिरले आणि बुध्दिमान असल्यामुळे महसूलाचं काम पाहू लागले.

सबंध भारत हाताशी आल्यामुळे महंमद तुघलकाने राज्यकारभाराच्या सोयीसाठी, ३/४ वर्षांच्या विचारानंतर देशाचं मध्यवर्ती ठिकाण, दौलताबादला आपली राजधानी हलवली. त्यामुळे दक्षिणेतील राजे संकटात पडले. पण परकीय आक्रमणामुळे दौलताबाद भारतीय सीमांपासून दूर आहे हे लक्षात आल्यावर त्याने परत आपली राजधानी दिल्लीला नेली. महंमद तुघलकाच्या अखेरच्या पर्वात त्याच्या राज्यात अनेक ठिकाणी बंडाळी माजली आणि मोडून काढण्याचा उद्योग त्याला करावा लागला. त्यातली मोठी बंडाळी ही गुजरातमधे घडली, ज्यातून त्याच्या सत्तेला भविष्यात कलाटणी मिळाली. गुजरातच्या अमिरांनी बंड केलं आहे हे कळल्यावर महंमद तुघलक सुलतानाने त्यांच्यावर हल्ला करुन त्यांचा पराभव केला. तेव्हा सर्व बंडखोर अमिर दक्षिणेत पळून गेले. त्यांना सुलतानाचा सुभेदार कुतलबखानाने आसरा देऊन सुलतानाशी द्रोह केला.

तेव्हा सुलतानाने लछीन नावाच्या आपल्या अधिकाऱ्याला सर्व अमिरांना गुजरातला घेऊन येण्यासाठी पाठवलं. सुलतान देहदंड देण्यासाठी

मशहूर होता. या लछीनने आपण सुलतानाकडे शब्द टाकून त्यांना वाचवू शकतो असा पुकारा करुन या अमिरांकडून भरपूर नजराणे उपटले. पण त्याचा अंत:स्थ हेतू आपल्याला मारण्याचाच आहे हे कळल्यावर सर्व अमिरांनी मिळून लछीनवर हल्ला केला आणि लछीनला ठार केलं. हे सर्व झाल्यावर सुलतानाचे बंडखोर दक्षिणेत दौलताबादकडे जमायला लागले आणि त्यांनी मोठी फौज उभारली. दक्षिणेतील स्वतंत्र असलेले राजेही त्यांना गुप्तपणे सामील झाले. हे सर्व बंडखोर मोठ्या संख्येने गोळा होत आहेत हे पाहिल्यावर सुलतान महंमद तुघलकाचा वऱ्हाडचा सुभेदार जावई घाबरून एलिचपूर सोडून नंदुरबारला निघून गेला तेव्हा त्याची ही फौज आणि अधिकारी बंडखोरांना येऊन मिळाले. त्यामुळे बंडखोरांचं सामर्थ्य खूप वाढलं. त्यांनी दौलताबादवर हल्ला करायचं ठरवलं तेव्हा किल्ल्यातील शिबंदीने किल्ला बंडखोरांच्या हवाली केला. आता बंडखोरांना एक नेता हवा होता. त्यांनी १००० घोडदळाची मनसबदारी असलेल्या इस्माईलखान अफगाण याची त्यांचा नेता म्हणून निवड केली. त्याला नसरुद्दीन ही पदवी दिली. नसरुद्दीनने सत्ता हाती येताच आपल्या सर्व साथीदारांवर देणग्यांचा पाऊस पाडला. अल्लाउद्दीन हसनला जाफरखान ही पदवी दिली. त्याच्या मनसबीसाठी काही जिल्हे त्याच्या स्वाधीन केले.

महंमद तुघलकाला ही बातमी कळल्याबरोबर तो गुजरातमधून मोठी फौज घेऊन दौलताबादेवर आला. बंडखोर आणि सुलतानाची फौज एकमेकांना भिडले. या लढाईत सुलतानाचा पराभव होणार हे जवळजवळ निश्चित झालं होतं, पण अचानक घडलेल्या एका घटनेने युध्दाला कलाटणी मिळाली. बंडखोरांचा नेता खानजहान हा बाणाने जखमी होऊन खाली पडला आणि

त्याची ६००० फौज रणांगणावरुन पळून गेली. त्याचवेळी नवीन सुलतान नसरुद्दीन याचा ध्वजवाहक घाबरला आणि त्याच्या हातून निशाण खाली पडलं. निशाण दिसेनासं झालं तेव्हा आपला नेता दिसला नाही तेव्हा नसरुद्दिनची फौजही मैदान सोडून जाऊ लागली. रणांगणावर युध्द घडलंच नाही. रात्री नसरुद्दीनने आपल्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून वेगळी रणनीती आखली. दौलताबाद जिंकण्याचा प्रयत्न त्याने रहित केला आणि तुघलकी फौजेला त्रास देत राहण्याची आखणी केली. त्यामुळे सकाळी शत्रूचा तळ रिकामा होऊन बंडखोर निघून गेले असल्याचं महंमद तुघलकाला दिसून आलं. मग तुघलकाने दौलताबाद किल्ल्याला वेढा दिला आणि अल्लाउद्दीन हसनला पकडण्यासाठी एका अधिकाऱ्याला पाठवलं. किल्ला हातात येणार अशी परिस्थिती असतानांच सुलतानाला, दिल्लीत तुकी नावाच्या गुलामाने बंड केल्याची आणि राज्यात अत्याचार चालवल्याची बातमी आली. तो गुजरातकडे येत आहे हे कळल्यावर लढाई थांबवून महंमद तुघलकाला दिल्लीकडे कूच करावं लागलं. सुलतान महंमद तुघलकाची फौजही निघून गेल्यावर बंडखोरांनी दौलताबाद जिंकलं. अल्लाउद्दीन हसनने गंगूने बिदरवर हल्ला करुन ते जिंकून घेतलं आणि तो नसरुद्दीन या नवीन सुलतानाला भेटायला दौलताबादला आला.

हसन गंगू सुलतानपदावर.

या भेटीत नसरुद्दीन इस्माईलच्या लक्षात आलं की आपल्या सर्व अधिकाऱ्यांना आणि फौजेला अल्लाउद्दीन हसन हाच नेता म्हणून हवा आहे.



तेव्हा, आपण खालच्या पातळीवरील पदावर राहण्याचा मार्ग नसरुद्दीन इस्माईलने पत्करला आणि सर्व अधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्यात त्याने सर्वांसमोर जाफरखानाचा पर्याय ठेवला. सर्व अधिकारी आणि शिपायांनी याचं स्वागत केलं. तेव्हा हा प्रसंग साजरा करण्यासाठी नसरुद्दीनने ज्योतिषांकडून शुभ मुहूर्त मागून घेतला. त्याप्रमाणे हिजरी ७४८, १२ ऑगस्ट १३४७ या दिवशी अल्लाउद्दीन हसन-जफरखानाचा सुलतान म्हणून राज्याभिषेक पार पडला. अबासिद खलिफा वापरत असलेलं काळया रंगाचं छत त्याच्या सिंहासनावर उभारण्यात आलं , त्याच्या नावे खुत्बा वाचण्यात आला आणि त्याच्या नावची नाणीही पाडण्यात आली.

उत्तरेकडे निघालेल्या सुलतान महंमद तुघलकाला दक्षिण भारत आणि दौलताबाद आपल्या हातून गेल्याची बातमी कळली. तो धक्का त्याला इतका जबरदस्त होता की सुलतानाच्या छातीत दुखायला लागलं पण ४ दिवसांनी त्याला बरं वाटलं. महंमद तुघलक गुजरातहून निघून बंडखोर तुकीच्या मागे गेला. तुकी वेगाने पुढे जात राहिला आणि शेवटी ठठ्ठाच्या राजाच्या पदरी त्याने आश्रय घेतला. महंमद तुघलक त्याच्या मागावर जात असतांना गुजरात सोडल्यापासून त्याला सारखा ताप येऊ लागला होता. ठठ्ठाच्या वाटेवर

असतांनाच सोंडा गावात सुलतान पोचला तेव्हा त्याचा ताप खूप वाढला होता. त्याला तिथेच मुक्काम करावा लागला. शेवटी आठवडाभरानंतर, २० मार्च १३५१ या दिवशी सुलतानाचा मृत्यू झाला.

सुलतान तुघलक निघून गेल्यामुळे मोकळया झालेल्या राज्याची सूत्रं हाती घेतल्यावर अल्लाउद्दीन हसनने गुलबर्गा ही आपली राजधानी केली. तिचं नाव अहसनाबाद करण्यात आलं. आपलं भविष्य सांगणाऱ्या दिल्लीच्या निजामुद्दीन अवलियाच्या दर्ग्याला त्याने ४०० पौंड वजनाइतकं सोनं आणि १०० पौंड वजनाची चांदी भेट म्हणून पाठवली. हुशारी आणि प्रामाणिक असलेल्या सैफुद्दीन घोरीला आपल्या राज्याचा वजीर केलं. चौल बंदरापासून बिदरपर्यंतचा आणि भीमा नदी ते अदोनी किल्ल्यापर्यंतच्या, दक्षिणेतील सल्तनतीचा तो पहिला सुलतान झाला. आपल्या धन्याला दिलेल्या वचनानुसार गंगू ब्राह्मणाला दक्षिणेत बोलावून घेऊन खजिन्याचं मुख्यपद दिलं. त्यानंतर सर्व सरकारी कागदपत्रांमधे हसन गंगू बहामनी हे नाव लावण्यात येऊ लागलं. बहामनी हे ब्राह्मण शब्दाचं रुप आहे.

हसन गंगूचा राज्यकारभार. बहामनी राजवट सुरू.

अल्लाउद्दीन हसन गंगू बहामनीने अत्यंत उदारपणे, दया-क्षमा आणि शांती या त्रिसूत्रांच्या आधारे राज्य केलं. शत्रूला दयेने वागवलं. त्यांचा छळ केला नाही. आपल्या अधिकाऱ्यांना मानमरातब आणि देणग्यांनी तृप्त ठेवलं. राज्यात अमन आणि शांती नांदावी म्हणून राज्यकारभार जनतेला सुखी करणारा केला. प्रतिस्पर्ध्यांशी मैत्रीचा तह करून शांतता नांदवली. पुढील १० वर्षे हसन गंगू बहामनीचा राज्यविस्तार होत गेला. १३५७ सालात हा सुलतान गुजरातच्या

स्वारीवर निघाला. गुजरातमधे नवसारीजवळ शिकार खेळण्यासाठी उत्तम वातावरण होतं. हसन गंगू बहामनीच्या मुलाने, महंमूदने आपल्या पित्याचा हा आवडीचा खेळ आहे हे लक्षात ठेवून हसन गंगूला बोलावून घेतलं. सुलतान नवसारीजवळ येऊन शिकारीच्या खेळात महिनाभर रमला. पण महिन्याच्या शेवटी त्याला ताप येऊ लागला. ती व्यथा वाढत गेली. त्यामुळे सुलतानाला कलबुर्ग्याला परत यावं लागलं. राजधानीत परतल्यावर सुलतानाने आपल्या राज्याचे ४ भाग करुन आपला मुलगा, पुतण्या, वजीर सैफुद्दीन घोरी आणि त्याच्या मुलामधे वाटून दिली आणि त्या भागांचा अधिकारी म्हणून त्यांच्यावर जबाबदारी टाकली.

पुढील सहा महिन्यात त्याची प्रकृती ढासळत गेली. औषधांचा काहीही उपयोग होत नाही आहे हे पाहून हकिमांना आणि औषधांना रजा दिली. शांतपणे आपल्या मृत्यूची तो वाट पाहात बसला. एक दिवस त्याचा सर्वात धाकटा मुलगा शेख सादीच्या बोस्तान या पुस्तकातील उतारा वाचत बसला होता, तेव्हा हसन गंगूने तो वाचून दाखवायला सांगितलं. त्या उताऱ्यात लिहिलं होतं की,

“चांगुलपणाचा पुतळा जमशेट याने संगमरवरी कारंज्यावर शब्द लिहिले होते की हे कारंजे ज्यांनी ज्यांनी पाहिले ते सर्व या जगातून निघून गेले. मी शौर्य आणि शहाणपणावर जग जिंकून घेतले पण मृत्यूरुपी कबरस्तानातील सत्तेला जिंकण्यात मला यश आलं नाही.” हसन गंगूने हे शब्द ऐकल्यावर सर्वांना जवळ बोलावलं. माझी आता अखेर होणार आहे हे सांगितलं, गोरगरिबांच्या दानासाठी खजिन्यातून काही धन काढून दिलं आणि त्याने शांतपणे डोळे मिटले.

वयाच्या ६७ व्या वर्षी, हसन गंगू बहामनीचा मृत्यू १० फेब्रुवारी, सन १३५७ मधे झाला. ११ वर्षे, २ महिने, ७ दिवस तो सिंहासनावर बसला. औदार्य आणि शत्रूशी सहिष्णुता यावर त्याने कारभार केला. त्याच्यानंतर त्याच्या इच्छेनुसार त्याचा ज्येष्ठ पुत्र महंमद गादीवर आला. हसन गंगू बहमनीच्या घराण्याने सन १५३७ पर्यंत राज्य केलं. कलिमुल्ला या शेवटच्या वारसाबरोबर हा वंश संपला. कलिमुल्लाच्या अमदानीतच दक्षिणेत सन १४९० पासून अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशही, वऱ्हाडची इमादशाही, सन १४८७ पासून बिदरची बरीदशाही आणि सन १५१२ पासून गोवळकोंड्याची कुतुबशाही, सुरु झाली. दक्षिणतील या ५ शाही घराण्यांनी विजयनगर साम्राज्याचा अंत केला. पुढे औरंगजेबाने विजापुर गोवळकोंडाचा घास गिळला. औरंगजेबही संपला. मुघलशाही खिळखिळी झाली. राजघराण्यांच्या नवनवीन लाटा भरतवर्षात अखंड उचंबळतच राहिल्या.



पातशाही बेगम नूरजहाँ-

मरुभूमीतील एक अनमोल रत्न.

जन्म १५७९ मृत्यू १७ डिसेंबर १६४५.

घियासबेगचा निर्णय नक्की झाला. हा आपला देश सोडायचा आणि हिंदुस्थान नावाचा फळं-फुलं-नद्या- या निसर्गसौंदर्याने लगडलेला भरभराटीचा देश आहे, तिथे पोटापाण्याचा उद्योग शोधायला जायचं. त्याचे वडील महंमद शरीफ हे खोरासान प्रांताच्या तहमास्प सुलतानाच्या पदरी वजीर होते. शिया धर्माचे विद्वान आणि कवी होते. पण त्यांचा सन १५७७ मधे मृत्यू झाल्यावर त्यांच्या घराण्याची सद्दी संपली. एकेकाळी वैभवात राहिलेल्या घियासबेगला योग्य ती नोकरी मिळेना, त्यामुळे हालअपेष्टांना सुरुवात झाली. गरीबी छळायला लागली. म्हणून जन्मभूमी सोडून नवीन दुनियेत संसार थाटायची स्वप्नं घेऊन तो निघाला. बरोबर पत्नी आणि दोन मुलगे आणि एक मुलगी यांना घेऊन निघाला. खूप अंतर कापायचं होतं. ओसाड वाळवंटी प्रदेश पार करायचा होता, पण नंतर सुखच सुख मिळणार होतं. या आशेनेच त्याने अज्ञात भविष्यात पाऊल टाकलं. बरोबर सामान लादलेले उंट होते. मुलांना आणि पत्नीला बसवायला खेचरं घेतली. पुढच्या मुक्कामापर्यंत पुरेल एवढे खाद्यपदार्थ घेतले आणि ते सारे घराबाहेर पडले. कधीही परत न येण्यासाठी..

प्रवास सुरु झाला. त्यांचा पर्शिया कोरडा ठाण होता. रुक्ष सडक, सावलीला एकही झाड नाही, पाण्याचा थेंबही नाही, अशा ओसाड रेताड,

प्रदेशातून दोघांची पावलं भराभर पुढे पडत होती. प्रवास चालू होता. वाटेत एक मनुष्यही दिसत नव्हता. रात्र झाली की थांबायचं, जवळची छत्री उघडून त्याचाच तंबू बनवायचा, सकाळ झाली की परत चालायला लागायचं. रात्र गारेगार, दिवस तापलेला. अजून खूप खूप अंतर जायचं होतं. किती रात्री, किती दिवस ती सगळी चालतच राहिली, पण कुठेही वस्तीही दिसली नव्हती, पाण्याचा ओघळही दृष्टीला पडला नव्हता. एवढं संकट कमी की काय म्हणून या प्रवासात त्यांचं खेचर आणि उंट आणि थोडं सामानही कुणी बदमाशांनी पळवलं होतं. आता एका खेचरावरच सर्व भार होता. ते जिवंत होतं एवढीच जमेची बाजू होती. त्यांच्या जवळचं बांधून घेतलेलं अन्नही संपत आलं होतं. नशिबाची कठोर परीक्षा चालू होती. चालून चालून अस्मतबेग दमली. एकही वस्ती कशी दिसत नाही या काळजीने दोघे निराश झाले. अन्नपाण्याविना त्यांची शरीरं कोरडी पडायला लागली होती. जीभ वळायला लागली होती. पायातून वाळवंटी उष्णेतेमुळे रक्त यायला लागलं होतं. आता तिची अवस्था फार वाईट झाली. अंगातलं त्राण संपलं होतं. एक पाऊल पुढे टाकणंही तिला शक्य होत नव्हतं. कारण ती गर्भवती होती. दोघांच्या डोळ्यांमधे अश्रू तरारले. आता मी जगत नाही, मला पाणी हवंय..ती क्षीणपणे म्हणाली. या आपत्तीत भर म्हणून की काय, तिचं पोट दुखायला लागलं होतं. बाळंतपणाच्या या वेणा सोसणं भागच होतं. ईश्वर त्यांच्या सहनशक्तीची परीक्षा अत्यंत कठोरपणे पाहात होता. दीनवाणा झालेला घियासबेग पाण्याच्या शोधात बाहेर पडला. खूप अंतर गेल्यावर त्याला थोडं पाणी दिसलं ते घेऊन परतला तोपर्यंत पत्नी बाळंत झाली होती आणि एक सुकुमार, नाजूक कन्या तिच्या हातात होती. आधीच प्रवासाने, धगधगत्या उन्हाने अन्नपाण्याशिवाय विकल झालेली ती सुंदरी या नवीन संकटाने आणखी

हताश झाली. आता या बाळाला कसं सांभाळायचं. कशाने पोट भरायचं, तिच्या शुष्क, कोरड्या झालेल्या शरीरातून जीवनरस तरी कसा पाझरणार होता..दोघंही चिंतेत पडली. तिला थोडं बरं वाटल्यावर दोघंही परत जड झालेली पावलं पुढे टाकायला लागली. काही अंतर गेल्यावर मात्र दोघंही मनाने, आणि शरीराने थकली. दोघांनी मन कठोर करून निर्णय घेतला. आपण मरून जाऊ कदाचित पण या बाळाला कोण बघेल, म्हणून इथेच कुठेतरी झाडाखाली ठेवून देऊ. अल्लावर सर्व भार टाकू. तो आपल्या बाळाचं रक्षण करेल असं म्हणून घियासबेगने एका सावलीच्या झाडाखाली ती सुकुमार नवजात कन्या ठेवून दिली. घियास आणि ती पश्चात्तापाचे अश्रू ढाळत पुढे चालायला लागली.

पण आता मनाची बोच असह्य झाली होती. तिला आपल्या सुकुमार सुंदर कन्येची खूप आठवण यायला लागली. तिने रडवेल्या अशक्त आवाजात घियासला बाळाला घेऊन यायला सांगितलं. घियासबेगलाही तेच हवं होतं. घियासबेग मागे फिरला. त्या खुणेच्या झाडाखाली गेला तेव्हा एकदम चरकला. एक नाग आपला फणा सुकुमारीवर धरून वेटोळयात स्तब्ध बसला होता. घियासबेग हे दृष्य बघून थक्क झाला. घियासला पाहून तो नाग तिथून निघून गेला. बाळाला हातात घेऊन घियास परत पत्नी जवळ आला. पण तिची अवस्था फार वाईट झाली होती. तिचे प्राण कंठाशी आले होते. घियासने तिला छातीजवळ धरलं. तो दु:खाने पार खचून गेला होता. अजूनही ना प्रवासात हिरवळ दिसली होती, ना आयुष्यातली गार पहाट उगवली होती. पोटात काहीच नसल्यामुळे, बाळही सुकायला लागलं होतं. रडून रडून शुष्क झालं होतं. पण अजून रडत होतं. एवढंच घियासबेगला खूप होतं.

मरुभूमीत जन्मलेल्या त्या सुकुमार मुलीच्या जन्माचं साल होतं १५७९ आणि तिचं नाव होतं मेहेरुन्निसा. मेहेरुन्निसाचा जन्म कंधाहारमधे झाला असाही उल्लेख आहे.

सगळं कुटुंब चालत होतं आणि एक दिवस घियासला वस्ती दिसली. तो कंदाहारच्या सीमेवर पोचला होता. कंदाहार मोठं शहर. घियासबेगचा वैराणयोग संपला होता. तिथे त्याला मोठा व्यापारी मलिक मसूद भेटला. तो व्यापारी सामानाने लादलेले उंट घेऊन लाहोरलाच चालला होता. घियासच्या आनंदाला सीमा नव्हती. मलिक मसूदच्या सोबतीने आणखीही प्रवासी होते. प्रवाशांचा तो तांडा लाहोरलाच चालला होता, जिथे अकबर सम्राटाची सत्ता चालू होती. घियासबेग आपल्या कुटुंबाला घेऊन लाहोरात पोचला. घियासबेग आपल्या एका मित्राकडे उतरला होता. त्या मित्राने अकबराशी घियासबेगची ओळख करून दिली. तेव्हा अकबराने त्याला एक साधारणशीच नोकरी दिली, पण आपल्या बुध्दीने आणि कार्यकुशलतेने अकबराची मर्जी जिंकून घियासबेग लवकरच दरबारात मोठ्या पदावर पोचला. घियासबेग आपल्या वडिलांसारखाच बुध्दिमान होता, विद्वान होता. राजशिष्टाचार त्याला उत्तम माहीत होते. पत्र लेखनात हुशार होता, हजरजबाबी आणि उद्योगी होता. त्याचे हे गुण माणूसपारखी सम्राट अकबराच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्याला अकबराने इतिमादउद्दौला म्हणजे साम्राज्याचा मुख्य खजिनदार केलं. त्याला ३०० घोड्यांचं दळ सोपवलं आणि मग काबूलचा दिवाण केलं. वर्ष जायला लागली. घियासबेग राज्यातील मोठ्या वर्तुळात वावरायला लागला.

घियासबेगचा मुलगा असफबेगसुध्दा आपल्या कर्तृत्त्वाने मोठ्या पदावर अर्थतज्ञ म्हणून नावारूपाला आला.

घियासबेगची कन्या, मेहेरुन्निसा, आता लाखात एक अशी सुस्वरूप सुंदरी, चतुरा, बहुगुणी कलावती, म्हणून लोकांच्या नजरेत भरू लागली होती. आपल्या सौंदर्याची जाणीव असलेल्या मेहरुन्निसाने मोठी मोठी स्वप्नं बघायला सुरुवात केली. लहानपणापासूनच ती सुंदर निसर्ग कविता रचत असे. निसर्ग चित्रंही रंगवत असे. गायनात आणि नृत्यात ती प्रवीण होती. घर सजावटीत हुशार होती, सुंदर सुरया, पडदे, माळा, चित्रं, यांनी ती घर इतकं छान सुशोभित करत असे की इतिमादउद्दौलाकडे येणारे लोक तिच्या गुणांची खूप तारीफ करत असत. वस्त्रं तयार करण्यातही ती वाकबगार होती. सर्वगुणसंपन्न अशा आपल्या या मुलीबद्दल घियासबेगला फार अभिमान होता. त्याने तिला उत्तम मौलवींच्या हातून उत्तम शिक्षण दिलं होतं. आता ती विवाहाला योग्य झाली होती.

शेरअफगाणशी विवाह.

घियासबेगने तिचं लग्न, लष्करात नोकरीला असलेल्या अलिकुली इस्तजलूशी म्हणजेच शेर अफगाणाबरोबर २७ जून १५९५ साली लावून दिलं. तेव्हा ती १७ वर्षांची होती. हा शेर अफगाणही शूर, धाडसी, प्रचंड शरीर संपदा असलेला, बुध्दिमान तुर्की होता. पर्शियात शाह इस्माईल बादशहाचा तो अत्यंत आवडता होता. शाह इस्माईल मेल्यावर अलिकुली नोकरीच्या शोधात, मुलतानला येऊन पोचला. मुलतानला सम्राट अकबराचा सेनापती अब्दुल रहीम खान इ खानान तिथे तळ देऊन राहिला होता. त्याच्या फौजेत अलीकुलीला

लष्करात चाकरी मिळाली. अशारीतीने अलिकुली भारतात पोचला. राजधानी आग्र्याला, अकबराच्या भेटीनंतर सम्राटाने त्याला मोठ्या मनसबदारीवर नेमलं. एकदा मेवाडच्या स्वारीवर शहजादा जहाँगीर बरोबर असतांना यात या धाडसी तरुणाने आपल्या शारिरीक बळावर शहजादाच्या अंगावर चालून येणाऱ्या एका वाघाला लांब फेकून दिलं होतं म्हणून अकबर सम्राटाने त्याला "शेर अफकून" या नावाने संबोधायला सुरुवात केली आणि शेरअफकून या टोपण नावाने देशभर कीर्ती झाली. या शेर अफकूनबरोबर घियासबेगने आपल्या मुलीचा, मेहेरुन्निसाचा निकाह लावून दिला. या शब्दाचा शेरअफगाण असा अपभ्रंश झाला. शेरअफगाण सुभेदार पदावर बंगालमधील बर्दवानला निघून गेला. १६०५ सालामधे मेहेरुन्निसाला एक मुलगी झाली. तिचं नाव लाडली बेगम.

पुढे सन १६०५ मधे अकबराचा मृत्यू झाल्यावर सलीमच्या हातात सत्ता आली. जगाचा सम्राट म्हणून त्याने स्वत:ला जहाँगीर हा किताब घेतला. २ वर्षांच्यांनंतर १६०७ मधे जहाँगीरला बातमी मिळाली की शेरअफगाण बंगालमधील बंडखोरांना सामील झाला आहे. तेव्हा शेरअफगाणला पकडून आपल्याकडे आग्र्याला पाठवण्याचा हुकूम बादशहाने बंगालचा सुभेदार कुतुबुद्दीन कोका याला दिला. ती अटक कपटीपणाने करणं भाग होतं कारण शेरअफगाण प्रचंड ताकदीचा तगडा तरूण होता. तेव्हा कुतुबुद्दीनने बर्दवानला सरकारी भेट देण्याचं प्रयोजन जाहीर केलं. त्यासाठी त्याने आपले साथीदार गोळा केले आणि त्यांना बर्दवानला बोलावलं. शेरअफगाण शिष्टाचाराप्रमाणे सुभेदाराच्या स्वागताला वेशीवर पोचला. सुभेदारानेही त्याचं आनंदाने स्वागत केलं. शेरअफगाण सुभेदाराबरोबर त्याच्या अंबारीत थोडा वेळ होता. दोघांच्या

हसत खेळत गप्पा सुरु झाल्या. तेव्हा शेरअफगाणाने सर्व अधिकाऱ्यांना आपल्या घरी जेवणाचं आमंत्रण दिलं. सर्व लवाजमा पुढे जात असतांना अचानक एकाने शेरअफगाणच्या घोड्यावर हल्ला केला. त्याक्षणी सावध झालेल्या शेरअफगाणने चपळतेने आपली तलवार उपसून त्या हल्लेखोराला कापून काढलं. त्याबरोबर वातावरण तंग झालं. शेरअफगाणला क्षणात उमगलं की आपल्याविरोधातला हा कट आहे. त्याने लगेच सुभेदाराला खाली ओढून, सुभेदाराची मानगूट पकडली आणि त्याला आणि त्याच्या साथीदारांना संपवलं. संतापाने बेभान झालेल्या त्या पोलादी पुरूषाने मग जवळच्या सगळयांनाच यमसदनाला पाठवलं. त्याबरोबर ज्यांच्याकडे बंदूका आणि धनुष्यबाण होते त्यांनी शेरअफगाणावर हल्ला सुरु केला. त्या हल्ल्यात शेरअफगाणच्या शरीराची बंदूकीच्या गोळयांनी चाळण झाली होती. रक्ताच्या धारा त्या प्रत्येक छिद्रातून वाहात होत्या. शेरअफगाणाला आपलं प्राक्तन लगेच कळलं. त्याने आपला चेहरा मक्केकडे वळवला. आंघोळ म्हणून जमिनीवरची माती आपल्या अंगावर उडवली आणि तो पुरुषसिंह गतप्राण झाला. (माऊंटस्ट्युअर्ट एल्फिस्टंन-स्टॅनले लेन-पूल, रॉबर्ट कॉंटर यांनी लिहिलेल्या चरित्रात शेरअफगाणला मारण्याचे जहाँगीरने कसे प्रयत्न केले त्याचं रसभरीत वर्णन केलं आहे. त्यात एकदा शिकारीला नेऊन त्याला वाघ मारायचं आव्हान करणं, मग त्याच्या शयनगृहात ४० मारेकरी पाठवणं, त्यातूनही वाचलेल्या शेरअफगाणच्या घरी परतण्याच्या मार्गावर, अरुंद बोळात हत्ती घुसवून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करणं, हे प्रसंग दिले आहेत. पण वेणीप्रसाद यांनी या दंतकथा होत्या असं म्हटलं आहे. शेर अफगाण मेल्यावर मेहेरुन्निस्सा

राजमातेकडे राहिली असतांना एका वसंतोत्सवात जहांगीरच्या दृष्टीस पडली आणि त्याने तिच्याशी निकाह केला असं वेणीप्रसादांनी सिध्द केलंय.)

मेहेरुन्निसाचं आग्र्यात आगमन. मलिका नूरजहाँत रुपांतर.

शेरअफगाण मेल्यावर मेहेरुन्निसाला जहाँगीरने पकडून आणून आपली सावत्र आई, अकबराची बेगम, रुकियाच्या हाताखाली जनानखान्यात ठेवलं. स्वाभिमानी मेहेरुन्निसा आपल्या वडिलांच्या आश्रयाला राहिली नाही. राजप्रासादात मेहेरुन्निसाच्या कलात्मक गुणांना आकाश मोकळं झालं. राजप्रासादाचा भत्ता न घेता, आपल्या सुंदर शिवणकामाने, भरतकामाने, जरीकामाने लेहेंगे, ओढण्या, नकाब, फेटे वगैरे कपडे तयार करून ती चांदणीचौकात, मीनाबाजारात विकायला लागली आणि त्या पैशाने आपला खर्च भागवायला लागली. तिला त्या कलेत विलक्षण गती होती. कापडांची सुंदर रंगसंगती, वस्त्रांना लावलेल्या किनारी म्हणजे लेस, मोती जडवून, सोन्याच्या चांदीच्या तारेने कलाबुतीने काढलेली वेलबुट्टी, फुलंपानं, नक्षीमुळे अमिर-उमरावांच्या स्त्रियांमधे तिने बनवलेले कपडे प्रसिध्द आणि प्रिय झाले. तिने वेगवेगळ्या शैलीत, फॅशनमधे कपडे शिवायला सुरुवात केली. त्यामुळे अनेक मेळे, जत्रा, संमेलनं, यातून तिच्या वस्त्रांची विक्री व्हायला लागली. जनानखान्यातील अकबराच्या रजपूत बेगमांच्या लेहेंग्याची फॅशन तिने उचलली. तिच्या कपड्यांना आग्रा-दिल्ली-लाहोरमधून अमीर उमरावांच्या स्त्रियांकडून मागणी येऊ लागली. जनानखान्यात मेहरुन्निसा खूप कला शिकली. बालवयापासून संगीत काव्य आणि चित्रकलाही तिला उत्तमरीत्या अवगत

होती. ती स्वत: फारसी भाषेत “मक्फी” या टोपण नावाने काव्य करत असे. जनानखान्यात मेहेरुन्निसाच्या गायनाचे कार्यक्रम होत असत. तिचा आवाजही गोड होता आणि संगीतातली जाणही मोठी होती. ती अनेकवेळा स्वत:च्याच रचना संगीतबध्द करून गात असे. तिने जनानखान्यातील इतर मुलींनाही जरीकाम, भरतकाम, शिवणकाम शिकवलं. जरी ती तिच्या या सर्व व्यापात दिवसभर गर्क होती तरी ती उदास राहायला लागली. आपल्या नशिबाचं तारू कुठे आणि कसं भरकटणार हे तिला कळत नव्हतं.

शेर अफगाणच्या मृत्यूनंतर कैद करून आणलेल्या मेहेरुन्निसाच्या अलौकिक सौंदर्यावर जहाँगीर मोहून गेला. पण जनप्रवाद नको म्हणून त्याने ४ वर्षे जाऊ दिली. त्या अवर्णनीय सौंदर्याच्या प्रेमात पडलेल्या बादशहाने २५ मे १६११ मधे तिच्याशी निकाह केला. तिला नूरमहाल म्हणजे राजमहालाची प्रभा-प्रकाश असं नाव दिलं. मेहेरुन्निसा या लावण्यवतीच्या जीवनाचा आता उत्तरार्ध चालू झाला. ५ वर्षांनी बादशहाने नूरमहलचं नाव बदलून नूरजहाँ म्हणजे जगाची प्रभा असं केलं, नूरजहाँ विवाहाच्या वेळी ३२ वर्षांची तर बादशहा ४२ वर्षांचा होता.

अशी एक दंतकथा सांगितली जाते की ४ वर्षं राजमातेच्या महालात तिच्या सेवेत असतांना आपल्या भविष्याची तिला चिंता वाटत असे. महालात राहून तिचं पैसा मिळवणं चालूच होतं पण हे किती दिवस चालणार याचा तिला अंदाज लागत नसे. आपल्या नशिबाचं तारू कुठे आणि कसं भरकटणार हे तिला कळत नव्हतं. त्यामुळे ती उदास असे. एक दिवस मात्र तिच्या आयुष्यात वेगळा उजाडला. तिच्या दासीने एका भविष्य सांगणाऱ्या वृध्द म्हातारीची बातमी

आणली. मेहेरुन्निसाने लगेच त्या भविष्य सांगणाऱ्या महिलेला आपल्या महालात बोलावलं. तिच्या हातावर एक सोन्याची मोहोर ठेवत, जे तिला आपल्या भविष्याबद्दल सांगता येईल ते सांगायला सांगितलं. ती म्हातारी भविष्यकथन करायला लागली आणि मेहेरुन्निसाचा वाळवंटातील जन्म, तिच्यावर नागाने धरलेला फणा हे सारं सांगत ती जहाँगीरची मलिका होण्याचं भाकित करुन आणखी एक मोहोर मेहेरुन्निसाकडून घेऊन निघून गेली. त्यादिवशीपासून मेहेरुन्निसाचं आयुष्य बदललं.ती आनंदी दिसायला लागली. आपण या देशाची मलिका होऊ की नाही याचाच विचार करायला लागली. पण महत्त्वाकांक्षेने मात्र मूळ धरलं होतं. चाणाक्ष, व्यवहारी, बुध्दिमान तर ती होतीच पण आता तिच्या राजकीय बुध्दीलाही निखार चढला. तिची रणनीती, राजनीती, पुढची चाल तिने नक्की करुन टाकली. तिच्या जीवनाचा नूरच बदलला.

भाग २.

अष्टपैलू कलासक्त रत्न नूरजहाँ.



काय नव्हतं नूरकडे? सर्वगुणसंपन्न होती ती, अष्टावधानी होती. बहुगणा होती, कलासक्त होती, मूर्तीमंत लावण्यवती होती. परत साधी रहाणी होती, गरिबांबद्दल तिला कळवळा होता, दानशूर होती. अनेक अनाथ मुलांचा ती सांभाळ करत होती. ती अत्यंत टापटीपीची होती. तिचा महाल सतत देखणाच दिसत असे. तीच शिस्त तिने आता राजप्रासादात, कागदपत्रांमधे आणली. आणि आता तिला राजकीय सत्तासंघर्षाची चटक लागली होती. तिचे प्रतिस्पर्धी तिला माहीत होते. सत्तेत राहण्यासाठी लागणारी महत्त्वाकांक्षा, चाणाक्षपणा, निष्ठूरपणा, विरोधकाला संपवण्याचा गनिमीकावा, कोणत्याही गोष्टीतील पटकन उणीवा दिसणं आणि चटकन निर्णय क्षमता, यात ती फार

हुशार होती हे हळूहळू तिने दाखवून द्यायला सुरुवात केली. कोणताही विषय तिला पटकन कळत असे. ती हजरजबाबी होती. सर्वगुणसंपन्न होती.

जहाँगीरशी विवाह होऊन थोड्याच दिवसांमधे नूरजहाँ पातशाही बेगम म्हणजे पट्टराणी बनली. जहाँगीरची आधीची पातशाही बेगम मृत्यू पावली होती म्हणून ही पदवी तिला मिळाली. पातशाही बेगम बनल्यावर नूरजहाँच्या अष्टावधानी स्वभावाला, राजकीय चातुर्याला, वाव मिळाला. जहाँगीरचं मद्याचं व्यसन कमी करणं, त्याची काळजी घेणं, याला तिने प्राधान्य दिलं. कारण तो आहे तर ती आहे याची तिला पुरेपूर जाणीव होती. जहाँगीर दिवसाला १४ पेले आणि रात्री १ वाजता झोपेपर्यंत ६ पेले असे २० पेले मद्य प्यायचा. ते तिने हळूहळू कमी करायला सुरुवात केली. ४ वर्षे दासी म्हणून राहतांना जनानखान्यात तिला देशाचं राजकारण कळायला लागलं होतं. अनेक रिकामटेकड्या राजस्त्रियांनी. तिथले खोजे, दास दासी, यांनी भरलेला जनानखाना हेच एक मोठं अफवा, कारस्थानं यांचं मोठं केद्र होतं. तेव्हा ती उघड्या डोळयांनी आणि उघड्या कानांनी वावरत होती.

तिला साहित्याची काव्याची आवड असल्यामुळे तिने मुशायरे आयोजित करायला सुरुवात केली. अनेक शायरांना आर्थिक प्रोत्साहन दिलं. त्यातही महिला कवयत्रिंना, लेखिकांना तिने विशेष द्रव्यार्जन करून दिलं. तिची स्वत:ची मोठी लायब्ररी होती. त्यात उत्तमोत्तम पर्शियन-अरबी- हिंदू भाषांची पुस्तकं होती. मथुरा-वृंदावनला भेटी देऊन भारतीय भक्तिसंगीताची तिने ओळख करून घेतली. जगन्नाथ नावाच्या हिंदू ब्राह्मणाला दरबार पंडीत केलं आणि मग त्याला तिनेच पंडीतराज जगन्नाथ असा किताब दिला. अशारीतीने कवी-लेखक-

चित्रकार- शिल्पकार- खगोलवैज्ञानिक या साऱ्या बुध्दिमान क्षेत्रातील कलाकारांना आश्रय देऊन सुखवस्तू करून टाकलं. कवनं करण्यात ती माहीर होतीच. जहाँगीर एखादी ओळ म्हणाला की त्याची पूर्ती ती दुसरी ओळ रचून लगेच पूर्ण करत असे. तिच्या कवनांमधे प्रणयगीतं, विरहगीतं, उदास गीतं, सूफी संदेश असे. त्यामुळे त्याला बेगमचा अभिमान वाटत असे. हळूहळू नूरजहाँवर त्याने विश्वास टाकायला सुरुवात केली. तिच्या सल्ल्याने चालायला लागला. तिचा प्रभाव इतका वाढला की बादशहाच्या निशाणीवर तिचीही सही दिसायला लागली. मुरब्बी, चतुर, नूरजहाँने तिच्या वस्तूंच्या विक्रीचाही व्यापार वाढवला. नवनवीन वेषभूषा, केशभूषा, आभूषण रचनेतही म्हणजे हल्लीच्या फॅशन डिझायनर, ज्युवेलरी डिझायनर, इंटिरियर डिझायनर, मॅनेजमेंट, यातही तिला असामान्य गती होती. आपल्या प्रासादातील पुरुषांना आणि दासींनाही तिने सुंदर कपडे शिवून आकर्षक करून टाकलं. ती इतकी या वेषभूषा कलेत प्रवीण होती की जहाँगीरच्या वस्त्रांनाही तिने नवीन रूप दिलं. मात्र ती स्वत: अत्यंत साधेपणाने राहात होती. तिने आणलेल्या कपड्यांच्या फॅशन्स पुढे कित्येक वर्षे, औरंगजेबाच्या काळापर्यंत लोकप्रिय होत्या.

नूरजहाँ पातशाही बेगम बनली. तिला बादशहाने अनेक मौल्यवान रत्नं, वस्त्, महागड्या भेटी देऊन खूष केलं. तिचा मान दरबारात एवढा वाढला की परदेशी व्यापारी, राजदूतही तिची भेट घेऊन तिला अमूल्य नजराणे भेट द्यायला लागले. जहाँगीरने तिला अनेक प्रदेशांची जहागिरी देण्यात आली. सुरत-आग्रा मार्गावरील अजमेरजवळचा रामसर परगणा, ज्याने तिची वार्षिक प्राप्ती २ लाख रुपये झाली होती. दख्खनमधला तोडा परगणा भेट मिळाला. अलाहाबाद,

बिहार, बंगाल, ओरिसा, भुतान, इथून होणाऱ्या व्यापाराच्या जकातीचा वसूल, तिच्याकडे गोळा व्हायला लागला. तिने या वसूलीसाठी तिच्या अधिकाऱ्यांसाठी तिथे देखण्या सराया बांधल्या. पर्शिया, आफ्रिका, युरोपला, भारतातून जाणाऱ्या नीळ, मसाले, कापड, अफू, अशा वस्तूंच्या निर्यातींवर तिचाच ताबा होता. नूरजहाँचा माल परदेशी जायला लागला. इंग्रज, डच. फ्रेंच अरब, सर्वजण तिने बनवलेल्या वस्तूंचे ग्राहक होते. नूरजहाँकडे व्यापारी जहाजांचा ताफा होता. पण परदेशी व्यापारासाठी ती इंग्रजांची जहाजं वापरत असे. ती इंग्रजांशी करार करु लागली. फर्मानं काढायला लागली. इंग्लडच्या राजघराण्याशी तिचा स्नेह होता. सर्व व्यवहार तिच्या नजरेखालून जात. ती एक यशस्वी उद्योजिका झाली. नूरजहाँबेगमच्या बहुगुणी, बहुआयामी गुणांना जहाँगीरच्या पाठिंब्यामुळे खूप प्रोत्साहन मिळालं.

ती कलासक्त होती. उत्तम चित्रकार होती. मातीच्या, काचेच्या भांड्यांवर रंगकाम करण्यात, चित्रं काढण्यात तरबेज होती. महाल सजावटीची तिला कमालीची आवड होती. चांदीच्या तारेने विणलेले तिचे गालिचे तिच्या कलावैभवाची साक्षीदार होते. तिच्या महालांच्या भिंतींची, पडद्यांची विलक्षण रंगसंगती, नक्षीदार वस्तूंनी केलेली महालाची सजावट लोक बघत राहायचे.. तिच्याकडे रुपाबरोबरच बुध्दिचाही मोठा वरदहस्त होता. चतुर मुत्सद्दी म्हणून तिला सगळे ओळखायला लागले. जहाँगीरची सुंदर उपवन, फुलांची आवड पाहून तिने काश्मीर आणि लाहोरमधे अनेक रमणीय उद्यानं निर्माण केली. नूरजहाँ उद्यान निर्मितीतही प्रविण होती. म्हणजे लँड स्केपिंग मधेही तिची बुध्दी कमालीची तेजस्वी होती. काश्मीर अच्छाबल इथे तिने एकापेक्षा एक सुंदर

फुलबागांची निर्मिती केली. बागांमधे सफरचंद, जर्दाळू, चेरी, प्लम फळांची झाडं लावून कृत्रिम तलाव, झरे, धबधबे निर्माण करून आणि रात्री सुंदर दिव्यांनी उद्यानाचा परिसर झगमगवून टाकून, आपल्या कलासक्त कल्पकतेने तिने उद्यान आखणीतही तिने नवनिर्माण घडवून आणले. तिला वनस्पतीशास्त्रातही मोठी रुची होती. स्वभावत: चित्रकार असल्याने, तिने मोहरा, नाणी-सिक्के, बादशहाकडून दिल्या जाणाऱ्या सन्मान पदकांनाही आकर्षक रुप दिलं.

नूरजहाँ वास्तूनिर्माण कलेतही अग्रेसर होती. आपल्या शेवटच्या आयुष्यात तिने लाहोरमधे बांधलेली मशिद ही शहाजहानने नंतर निर्माण केलेल्या मोती मस्जिदीच्या बरोबरीची होती. आपल्या पित्याच्या, इतिमादउद्दौलाच्या स्मरणार्थ तिने निर्माण केलेला मकबरा, वास्तू आणि शिल्पकलेतील असामान्य नमुना होता. आजवर मुघल वास्तू निर्मितीत लाल पत्थरच सहसा वापरला जायचा. नूरजहाँनेच संगमरवराचा आणि सुंदर उपवन यांचा आपल्या मशिदीत केला जो तिचा आदर्श ठेवून शहाजहाँने आपल्या ताजमहाल बांधणीत वापरला. भारत आणि पर्शियाच्या कला शास्त्रामधला ती एक दुवा होती. जकात वसूलीसाठी आपल्या अधिकाऱ्यांच्यासाठी अनेक मोठ्या शहरांमधे देखण्या सराया बांधल्या. नूरजहाँच कलासक्त नव्हती तर तिची आई अस्मतबेगमला गुलाबाच्या अत्तराच्या निर्मितीचं श्रेय दिलं जातं. झालं असं की गुलाबपाणी बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर एकदा खूप सुवासिक गुलाब मोठ्या हौदात भरून ठेवले होते. त्यावर गरम पाणी ओतण्याची पध्दत होती. एकदा दिल्लीच्या कुडकुडणाऱ्या थंडीत त्या पाण्यावर पहाटे छोटा तवंग तयार झाला होता. तो तवंग अस्मत बेगमने हातावर घासून पाहिला तर तो थेंब

अनेक गुलाबपुष्पांच्या सुगंधासारखा भरलेला होता. तेव्हा, अस्मतबेगमच्या कल्पनेतून त्याचं अत्तर बनवलं गेलं ते गुलाब अत्तर मग जगभर प्रसिध्द झालं. जहाँगीरच्या आईने, सलिमा सुलतानने या गुलाब अत्तराला इत्र ई जहाँगीर नाव दिलं.

विवाहानंतर नूरजहाँने सामाजिक कार्य अत्यंत तळमळीने केलं. स्त्रीशिक्षणासाठी ती पैसा खर्च करायला लागली. ज्यांचे विवाह पैशाच्या अभावी होत नसत त्यांना तिच्याकडून मदत मिळे आणि त्या संसाराला लागत. तिने जनानखान्याचं रुपच बदलून टाकलं. या जनानखान्यात अकबर सम्राटाच्या रुकिया, सलिमा सुलतान, अशा राण्या, जहाँगीरच्या २० बेगम, त्यांच्या राजकन्या, दासी, बादशहाच्या रखेल, असा सर्व मिळून जवळ जवळ ३०० स्त्रियांचा भरणा होता. त्या स्त्रियांना तिने शिस्त लावली. अनेक सण, उत्सव जनानखान्यात साजरे होत. त्या वैभवाला आणखी झळाळी आणली. जनानखानाही सुंदर करुन टाकला. तिथल्या सगळया वर्दळीला, कारभाराला तिने एका मोठ्या हुशारीने उद्योगाचं केंद्र बनवून टाकलं. गुप्त वार्ता, चर्चा करण्याचं ठिकाण बनवलं. एका संस्थेची शिस्त आणली. जनानखान्याला व्यवस्थापनाचा आयाम दिला. जनानखान्यातील महिलांना दरबारी आदब, तौरतरिके शिकवले.

एवढे गुण कमी की काय म्हणून, नूरजहाँ नेमबाजीत आणि घोडेस्वारीतही अव्वल होती. ती जहाँगीरबरोबर शिकारीला जाई. एकदा अजमेरजवळ शिकारीसाठी तळ पडलेला असतांना नूरजहाँने ओरिशा नावाच्या उडत्या पक्ष्याला आपल्या अचूक निशाण्याने मारून खाली पाडलं.त्याचं वजन २००

ग्रॅम होतं आणि तो दुर्मिळ आणि सुंदर रंगांचा बादशहाने कधीही न पाहिलेला होता. पुढच्या वर्षी शिकारीला गेली असतांना त्यांच्यासमोर चार वाघ आले. नूरजहाँने बादशहाकडे त्यांना मारण्याची परवानगी मागितली. ते दोघे हत्तीवर अंबारीत उंचावर बसले होते. नूरजहाँने ४ गोळयांमधे ४ वाघ मारले इतकी तिची नेमबाजी अचूक होती. उंच अंबारीतून दूरवर निशाणा लावणं सोपं काम नव्हतं. तिच्या या नेमबाजीवर खूष होऊन बादशहाने, तिला हिऱ्यांची १ लाख रुपयांची पोचीची (ब्रेसलेट्स) जोडी बक्षिस म्हणून दिली आणि १००० अश्रफी तिच्यावरून ओवाळून टाकल्या. तिने एका बंदूकीच्या सर्व गोळयांचा वापर करुन ४ वाघ मारून टाकले होते. बादशहाही तिच्या या प्राविण्यावर खूष होऊन गेला.

जहाँगीर.

नूरजहाँ इतकाच जहाँगीरही कलेचा मोठा भोक्ता आणि दर्दी होता. चित्रकलेचं वेड अकबरापासून या घराण्यात चालत आलं होतं. अकबरानेच अनेक चित्रकारांना प्रोत्साहन दिलं त्याच्या काळातच, पुस्तक रंजक करण्याठी त्यात विषयानुरूप चित्र घालण्याची पध्दत चालू झाली. जहाँगीरलाही चित्रकला अवगत नव्हती पण चित्रकलेचा तो मोठा समीक्षक होता. एखादं चित्र पाहिल्यावर त्यातील डोळे, भुवया, चेहरा यांच्या रेषांवरुन कोणत्या चित्रकाराने हे चित्र बनवलं आहे ते तो सहज सांगू शकत असे. तो या कलेत इतका प्रवीण होता की एकच चित्र अनेक चित्रकारांनी बनवलं असेल ते त्या कोणत्या चित्रकाराच्या कुंचल्यातून कोणता भाग रंगवला असेल त्या चित्रकाराचं नाव तो

सहज सांगत असे, भले तो चित्रकार मृत असो वा जिवंत. त्याच्या दरबारी असलेल्या थॉमस रो याने जहाँगिरला इंग्रजी युवतीचं एक चित्र भेट म्हणून दिलं. तेव्हा दरबारातील निपुण चित्रकाराला बादशहाने तसंच चित्र रंगवायला सांगितलं. ते चित्र इतकं हुबेहूब होतं की थॉमस रो अस्सल कुठलं आणि नक्कल कोणतं हे ओळखू शकला नाही पण जहांगिरला तो भेद ओळखायला क्षणही लागला नाही. जहाँगिर स्वत: अत्यंत उच्चशिक्षित होता. अत्यंत सुसंस्कृत होता. हिंदी, फारसी, उर्दू, आणि दुसऱ्या काही भाषांवर त्याचं प्रभुत्त्व होतं. त्याच्यात लेखन कौशल्यही होतं. निसर्गप्रेमाचा भोक्ता असल्यामुळे तो झरे, नद्या, वनराजी, फळं फुलांमधे अतिशय रमून जाई आणि मग त्यांचं वर्णन इतकं बारीक सखोलतेने, ओघवत्या लालित्याने करत असे की पक्षीविज्ञानाचं ते पुस्तकही बनू शकलं असतं. वनस्पतीशास्त्राचं त्याला उत्तम ज्ञान होतं. इतर ललित कलांमधेही तो निपुण होता. वैद्यक शास्त्राचा त्याचा अभ्यास दांडगा होता. मायक्रोबायॉलॉजि- जंतुविज्ञानात तो प्रवीण होता.. भवन निर्माण हा तर त्याचा परम आनंदाचा विषय. तोच गुण त्याच्या मुलातही, शहाजहाँमधेही आला. आपल्या प्रथम पत्नीवर, शहाजहाँच्या आईवर जहाँगीरचं नि:स्सीम प्रेम होतं. तिच्या निधनानंतर तो ४ दिवस अन्नाला शिवला नाही इतकं त्याला दु:ख झालं होतं.

आपल्या कुटुंबाबरोबरही जहाँगीरचं प्रेमाचं नातं होतं. अकबराचा तो अत्यंत लाडला पुत्र होता. नवसाने झालेला होता. अकबराला पहिली दोन मुलं होऊन लगेच वारली होती. अजमेरच्या चिस्तीच्या आशीर्वादाने वयाच्या २७ व्या वर्षी अकबराला, ३० ऑगस्ट. १५६९ मधे सलीम पुत्र झाला. हा अंबरचा

राजा भगवानदास याची बहीण, जोधाबाई हिला नवसाने झालेला मुलगा. त्याकाळात मुसलमानी पेहराव घालून एक कुराणातला मंत्र म्हटला की धर्मांतर घडत असे. आणि त्याउलट, हिंदुस्थानी पोशाख घातला की परत हिंदू धर्मात आणता येत असे. तख्ताला वारस हवा त्यासाठी अजमेरला चालत जाण्याचा नवस सम्राटाने केला होता. सलीमनंतर अकबराला दानियल आणि मुराद हे दोन मुलगे झाले. हे दोघेही दारूच्या अतिसेवनाने मरण पावले. म्हणून अकबर सलिमला दारू न पिण्याचा सतत उपदेश करत असे. सलीमने बापाविरुध्द बंड केलं, पण तरीही अकबराचं जहाँगीरबद्दलचं प्रेम कमी झालं नाही. तो सलीमला शेखूबाबा याच नावाने बोलवत असे.

जहाँगीरला ५ मुलगे झाले. पहिला खूस्रो - त्याचं आणि जहाँगीरचं कधी पटलं नाही. दुसरा पर्वेज, तिसरा खुर्रम, चौथा शहर्रयार, आणि पाचवा जहांदर. त्याला ७ मुली होत्या. अकबराच्या मृत्यूनंतर ३ नोव्हेंबर, सन १६०५ मधे जहाँगीर बादशहा बनला. त्याचा मामा, जोधाबाईचा भाऊ, राजा मानसिंग हा अकबराच्या नवरत्नांपैकी एक होता. शूर, पराक्रमी रजपूत सेनापती अशी त्याची ख्याती होती.

हळूहळू जहाँगीरने नूरजहाँवर विश्वास टाकून कारभाराचे निर्णय घ्यायला परवानगी दिली. दरबारात चिकाच्या पडद्याआडून त्याचे निर्णय ती ऐकवायला लागली. तिने घेतलेले निर्णय सूडाचे, अविचाराचे, किंवा घाईगर्दीने घेतलेले नसत हेही त्याच्या लक्षात आलं होतं. सरकारी फर्मानांवर बादशहाच्या शिक्याशेजारी तिचा शिक्का उठायला लागला. मुघल पातशाही मधे एका स्त्रीच्या हातात एवढं नियंत्रण जाणं कधीच झालं नव्हतं. रणनीती, राजनीती,

सरदार - सेनापती यांच्य मोहिमांची आखणी, यात तिने रस घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे दरबारात तिचा एक गट निर्माण झाला होता. नूरजहाँचं बादशहाशी लग्न झाल्यावर तिचे वडील इतिमादउद्दौला पंतप्रधान झाले. तिची आई अस्मतबेगम जनानखान्याची प्रमुख झाली आणि भाऊ असफखान खासगीकडचा प्रमुख झाला. असफखानाची मुलगी अर्जुमन बानू ही शहाजहाँची पत्नी झाली. हीच ती मुमताजमहल जिला शहाजहाँपासून १६ मुलं झाली, आणि जिच्यावरील आत्यंतिक प्रेमाखातर तिच्या मृत्यूनंतर शहाजहाँने ताजमहाल बांधला. असफखानचा मुलगा शाहिस्ताखान, जो महाराजांच्या काळात बोटं तुटून पळाला. हे सर्व तिच्या बाजूचे असल्याने नूरजहाँची बाजू सामर्थ्यवान होती. तिचे विरोधक होते ते जहाँगीरचे खुर्रम, खुस्रो, पर्वेज हे मुलगे. जहाँगीरची पहिली बेगम ही अंबरचा राजा भगवानदासची मुलगी मानबाई ही होती..दक्षिणेच्या स्वारीत असतांना, खुस्रोला शहाजहाँनेच बऱ्हाणपूरच्या छावणीत मारून टाकलं होतं. त्यामुळे आता पर्वेज आणि शहाजहाँच जहाँगिरची जागा घ्यायला शिल्लक होते. नूरजहाँने खुस्रोशी लाडलीबेगमचं लग्न लावून द्यायचं ठरवलं. पण खुस्रोचं आपल्या पत्नीवर निरतिशय प्रेम होतं. म्हणून त्याने हा बेत धुडकावला. मग नूरजहाँने तिसरा मुलगा शहर्रयार याच्याशी आपल्या मुलीचं लाडलीबेगमचं लग्न लावून दिल्यामुळे तोही सत्तेचा हकदार होता. त्यामुळे नूरजहाँच परत अधिकारात राहिली असती.

सत्तासंघर्षाला सुरुवात.

राजकारण म्हणजे सत्तेची स्पर्धा. त्यात घनिष्ट नाती, मुलं, पत्नी, कोमल भावना, या शब्दांना काही स्थान नाही. ही शर्यत जिंकायची तर कुणाला पुढे जाऊ द्यायचं नाही आणि कुणालाही डोईजड होऊ द्यायचं नाही हेच दोन मंत्र. प्रसंगानुरूप वर्तन, चलाखी, कावेबाजपणा, धूर्तपणा, हे गुण राजकारणासाठी महत्त्वाचे. ते फक्त नूरजहाँ आणि शहाजहाँ यांच्यातच होते. त्यामुळे सिंहासनाच्या शर्यतीत हे दोघेच उरले. खुस्रोचा काटा शहाजहाँने बऱ्हाणपूरच्या मोहिमेच्या वेळी काढला होता. आता एक पर्वेज शिल्लक होता. शहर्रयार तर तिचा जावईच होता.

एकदा १६१४ सालात जहाँगीर खूप आजारी पडला. ताप, डोकेदुखी, गळू यांनी हैराण झाला. नूरजहाँने हकिमांना बोलावून गवगवा केलाच नाही. नाहीतर त्याचे राज्यातील अस्थिरतेचे दुष्परिणाम लगेच दिसले असते. म्हणून तिने बादशहाचं दुखणं गुप्त ठेवलं आणि स्वत: बादशहाची दिवसरात्र सेवा केली. जहाँगीरला त्याच्या व्यसनातून मुक्त करण्याची नूरजहाँची सतत धडपड चालत असे. आयुष्याच्या शेवटच्या १० वर्षांमधे, बादशहाची प्रकृती अतिसेवनाने वरचेवर बिघडायला लागली. आता तो वाचणार नाही, हे तख्ताच्या सर्व दावेदारांना कळून चुकलं होतं. जहाँगीरच्या व्यसनामुळे तो कारभार आता त्याचे नातेवाईक आणि दरबारी यांच्या तंत्राने चालायला लागला. जहाँगीरनंतरच्या संघर्षाचे आणि महत्त्वाकांक्षेचे धुमारे प्रत्येकाच्या मनात फुटायला लागले. त्यात नूरजहाँ होतीच. जहाँगीरचा दुसरा मुलगा खुर्रम म्हणजे शहाजहान हा तिचा प्रमुख विरोधक होता. निजामशाही संपवून, अहमदनगर जिंकल्यावर

जहाँगीरनेच खुर्रमला शहाजहाँ हा किताब दिला होता. शहाजहानचा सासरा हा नूरजहाँचा भाऊ असफखान होता. त्यामुळे त्याची बाजूही तेवढीच जबरदस्त होती. आपल्या वजीरीवर असलेल्या शहाजहाँला आपल्या विरोधातील हालचालींचा लगेच लागे. याच काळात, दक्षिणेत राहून, शहाजहाँ बापाविरुध्द लढायला उभा राहिला. त्याने आपला सासरा असफखान याच्या सल्ल्याने, आग्र्याचा खजिना पळवायचा बेत केला. पण खजिनदाराच्या सावधानतेमुळे तो फसला. जहाँगीर फौज घेऊन त्याच्याशी लढायला आला तेव्हा शहाजहाँचा सपशेल पराभव झाला.

नूरजहाँ – शहाजहाँमधे दुरंगी संघर्ष..

आता सरळ सरळ नूरजहाँ आणि शहाजहाँ यांच्यात सत्तासंघर्ष सुरु झाला. जहाँगीरने त्याला दक्षिणेच्या स्वारीवर पाठवलं होतं. त्याच्याबरोबर खुस्रो या आपल्या मोठ्या शहजाद्यालाही दिलं होतं. महाबतखान हा मोठा सरदार बरोबर दिला. खुस्रो हा शर्यतीतला एक प्रतिस्पर्धी होता, त्याचा काटा शहाजहाँने बऱ्हाणपूराच्या तळावर काढला. त्याच्या कटाने, खुस्रोला मरण आल्यावर खुस्रो पोटदुखीने मेला असं शहाजहाँने आपल्या बापाला लाहोरला कळवलं. आता नूरजहाँ आणि शहाजहाँ हेच दोघे दावेदार राहिले. मग नूरजहाँने शहाजहाँला काबूलची मोहीम घेण्यासाठी तिथे दूर पाठवायचं ठरवलं. पण दक्षिणेत बंडाळी फार माजली आहे, म्हणून मी हा देश सोडून जाऊ शकत नाही असं त्याने जहाँगीरला कळवलं. पातशाही बेगमला त्याचा अर्थ लगेच कळला, तेव्हा तिने दक्षिणेतील मोठे सरदार काबूलची बंडाळी मोडून काढण्यासाठी फौज घेऊन

बोलावले, शहर्रयारला काबूलला पाठवलं, आणि शहाजहाँची लष्करी ताकद खच्ची केली. या कट-काटशह सामन्याचा परिणाम म्हणजे, शहाजहाँला महाराष्ट्रात अज्ञातवासात जुन्नरला काही वर्षं राहावं लागलं. जहाँगीरच्या ढासळत्या प्रकृतीची पुरेपूर माहिती असफखान आपल्या जावयाला, शहाजहाँला पुरवत होता. नूरजहाँ आपल्या या शहजादाचा पत्ता लावण्यात दंग होती. पण जहाँगीरचा हुकूमाचा एक्का तिच्या हाती होता त्यामुळे ती स्वस्थ होती. जहाँगीर आता जवळजवळ नूरजहाँच्या नजरकैदेत राहिल्यासारखाच होता.

राजकीय नाट्याला सुरूवात..

नूरजहाँचं या राजकारणावर बारीक लक्ष होतंच. सुरुवातीला नूरजहाँ, आपला भाऊ आसफखानच्या मदतीने शहजहाँला बादशहा करण्याचा विचार करत होती, पण धूर्त, शूर, धोरणी, महत्त्वाकांक्षी शहाजहाँ नंतर आपल्या ताब्यात राहणार नाही हे तिला लगेच लक्षात आलं. त्यामुळे त्याचं नाव तिने बाद केलं. आता आपला जावई शहर्रयार हाच तिने नक्की केला. या दक्षिणेतील खेचाखेचीत तिला आणखी एक गोष्ट कळली ती म्हणजे महाबतखान सेनापतीही डोईजड होणार. हा मूळचा राणा प्रतापच्या वंशातील मुलगा म्हणजे रजपूतच. त्याला रजपूतांचं मोठं पाठबळ होतं. जहाँगीरच्या दरबारात रजपुतांचं मोठं बळ होतं. त्याच्या बऱ्याच राण्याही रजपूत घराण्यातीलच होत्या. महाबतखानाची ताकद कमी करायला हवी होती म्हणून तिने बादशहामार्फत महाबतखानाला दक्षिणेतून परत बोलावून घेतलं आणि त्याच्या जागी दुसरा

सरदार पाठवला. यामुळे महाबत खान चिडला. या कारस्थानामागे नूरजहाँच आहे हे त्याच्या लक्षात आलं. ३ वेळा बादशहाकडून दरबारात हजर राहण्याचा हुकूम झाल्यावर महाबतखानाला लाहोरला जावंच लागलं. त्याने आपले ५००० रजपूत बरोबर घेऊन बादशहाला भेटायला लाहोरला जायचं ठरवलं. तेव्हा त्यातला धोका ओळखून नूरजहाँने एकटाच भेटायला ये असा निरोप पाठवला. शिवाय एक महाबतखानाला अपमानित करणारा आदेश पाठवला की येतांना बंगालचा सर्व सारा आणि जी हत्तींची लूट तू केलीस तीही घेऊन ये. या निरोपामुळे संतापलेल्या महाबतखानाने आपल्या जावयाला बादशहाच्या भेटीला पाठवलं पण तेव्हा नूरजहाँने बादशहाशी गाठ घेऊच दिली नाही, उलट जावयाला अपमानकारक वागणूक देण्यात आली. त्याला फाटक्या चिंध्या नेसवून, अशक्त घोड्यावर बसवून त्याची फौजेत धिंड काढण्यात आली आणि मग त्याला तसाच महाबतखानाच्या तळावर पाठवलं. यामुळे महाबतखान चिडला आणि सूड घ्यायला बादशहा आणि नूरजहाँला अटक करण्याचा विचार करायला लागला.

निकराचा सामना, नूरजहाँची अलोट शौर्यगाथा.

महाबतखान लाहोरमधे असतांना, त्यावेळी बादशहा लाहोरहून काबूलला जायच्या तयारीत होता. झेलम नदी वर होड्यांचा पूल करून काही सामान पलिकडे गेलेलं होतं आणि नूरजहाँ, तिचं सुरक्षा दल, आणि काही सामान अजून पलिकडील तीरावर जायची होती. ही संधी साधून महाबतखान आपले रजपूत सैनिक घेऊन अतिचपळतेने बादशहाच्या तळावर पोचला. त्याने सरळ

बादशहाच्या शामियानातच प्रवेश केला. बादशहा जहाँगीर स्नानासाठी गेला होता. बादशहाच्या नोकराने त्याला अमर्यादा केल्याबद्दल महाबतखानाला जाब विचारला पण त्याचा काही उपयोग नव्हता. महाबतखानाची वर्दी मिळाल्यावर न्हाणीघरातून बादशहा बाहेर आला तेव्हा आपली २००० फौज घेऊन खानाने बादशहाला कैद केलं होतं. बादशहा सुरुवातीला काय चाललंय हे न कळल्यामुळे भांबावला पण महाबतखानानेच त्याचं स्पष्टीकरण बादशहापुढे मांडलं. आपण असफखानाच्या तावडीतून सुटण्यासाठी असं वागलो हे सांगितलं. मग बादशहाला हत्तीवर बसवून महाबतखानाने त्याला आपल्या तळावर नेऊन बंदिवान केलं.

झेलमवर लढाई. नूरजहाँचा अलौकिक लढा.

तिकडे नूरजहाँ अजून पैलतीरावरच होती. तिला ही बादशहा अटकेत पडल्याची बातमी मिळाल्याबरोबर तीही झेलम पार करायच्या तयारीला लागली. महाबतखानाच्या तळावर हल्ला करायचा तिचा विचार नक्की झाला. महाबतखानाने होड्यांचा पूल कधीच तोडला होता. आता झेलमचा प्रवाह पार करूनच पैलतीरावर जायचं होतं. तेव्हा ही जबरदस्त धाडसी पातशाहीबेगम हत्तीवर बसली आणि आपल्या फौजेला आणि सरदारांना घेऊन बादशहाच्या छावणीवर जायचा प्रयत्न करायला लागली. यावेळी पलिकडल्या तीरावरून रजपुतांचा बाणांचा मारा चालू होता. अंबारीत तिच्याबरोबर बसलेल्या लाडलीबेगमच्या छोट्या मुलीला बाण लागला तेव्हा तिनेच तो उपटून काढला आणि तिचं रक्त स्वत:च पुसलं. मग स्वत:च्या नेमबाजीने अनेक रजपूतांना ठार

केलं. पण याठिकाणचा नदीचा उतार फार वाईट होता, त्यात तिचे काही सैनिक बुडून मेले आणि तरीही नदी ओलांडून शत्रूच्या गोटात जायचा प्रयत्न करत राहिले.

नूरजहाँ पराक्रमाची ज्वाला बनली होती. तिने तिचा हत्ती झेलमच्या पाण्यात उतरवला आणि अंबारीतून ती पलिकडील किनाऱ्यावर उभ्या असलेल्या रजपूतांना ठार करायला लागली. पण नूरजहाँच्या हत्तीला सोंडेवर जखमा झाल्या तेव्हा तिने तिचा हत्ती परत उलटा फिरवला तेव्हा काठावरच्या रजपूतांनी त्या हत्तीवर बंदूक झाडून मागच्या बाजूनेही त्याला घायाळ केलं. नूरजहाँने तरीही आपला हत्ती काठावर रेटला तेव्हा तिथल्या रजपूताने हत्तीची सोंड कापली. हत्ती त्या क्षणी मरून पडला आणि नूरजहाँच्या बाणाने तो रजपूतही त्याक्षणी जमिनीवर पडला. हत्ती पडला तेव्हा नूरजहाँ आणि लाडलीबेगम झेलमच्या प्रवाहात पडल्या. नूरजहाँने आपलं धनुष्य तसंच हातात ठेवलं आणि ती पोहत तिचे सरदार पाण्यात होते, त्यांच्याजवळ गेली. तिथे तिला एक हत्ती मिळाला. ती कितीतरी वेळ लढतच राहिली तिच्या पराक्रमाला तोड नव्हती. भारतीय इतिहासात, धनुष्य बाणाबरोबर, वाहत्या झेलमसारख्या नदीच्या प्रवाहात शत्रूच्या सैन्याबरोबर लढणारी ती एकमेव सम्राज्ञी असेल.

या सगळ्या झुंजीत, सम्राज्ञीचे साथीदार तिला सोडून गेले. तेव्हा नूरजहाँला शरण जाण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नाही. बादशहा जहाँगीर आधीच महाबतखानाच्या कैदेत पडला होता. त्यामुळे एकटीने लढत बसण्यापेक्षा शरण जाण्याने जीवदान मिळून भविष्यातील कितीतरी बेत सध्य होणार होते. म्हणून ती महाबतखानाला शरण गेली. नूरजहाँही आपल्या कह्यात

आली यामुळे महाबतखान खूष झाला. महाबतखानाने तिला बादशहाला भेटू न देता अटक करून दुसऱ्या ठिकाणी ठेवलं. पातशहा आणि पातशाही बेगम दोघेही आता महाबतखानाच्या कैदेत पडले. महाबतखानच्या दोन इच्छा पूर्ण झाल्या होत्या. १. जहाँगीरवर ताबा आणि २. नूरजहाँची राजकीय शक्ती संपवणं. त्यानंतर महाबतखान या सर्वांना घेऊन काबूलला निघाला..काबूलच्या प्रवासात जहाँगीरने बाबरच्या समाधीचं दर्शन घेतलं.

नूरजहाँच्या राजकीय मुरब्बीपणाची कमाल....

नूरजहाँ जाळयात अडकलेल्या मासोळीसारखी तडफडायला लागली. ती बाजी हरली होती. असफखानाने बादशहाच्या छावणीची योग्य ती सुरक्षा न ठेवल्यामुळे हे सारं घडलं हे तिला क्षणात उमगलं. पण ती हातपाय गाळून बसणारी नव्हतीच. ती काही दिवस नाईलाजाने स्वस्थ बसली. या काळात आपले कोण, भेदी कोण याचा चाणाक्षपणे शोध घेतला. मग गुप्तपणे बादशहाला निरोप पाठवायला सुरुवात केली. कायम नशेत राहणाऱ्या आणि निर्णयक्षमता नाहीशी झालेल्या बादशहाला तिने सांगितलं की माझी बदनामी करून महाबतखानाचं मन आणि त्याचा विश्वास जिंका. मग बादशहा तसंच करायला लागला. बारीकसारीक गोष्टी तो महाबतखानाजवळ बोलायला लागला. नूरजहाँचा आपल्या तिरस्कार वाटतो आणि आता तिच्या पंजातून सुटल्यासारखं वाटतं असं सांगायला लागला. बादशहा आपल्या ताब्यात आला आहे या विचाराने महाबतखानालाही जरा शिथिलता आली. नूरजहाँला हेच हवं होतं.

या काळात एक घटना अशी घडली की नूरजहाँने त्याचा पुरेपूर फायदा उचलला. काबूलला एका कुरणावर रजपूतांनी चरायला सोडलेल्या घोड्यांवरून रजपूत फौज आणि मुघल फौजेत भडका उडाला. त्यावरून मोठा नरसंहार झाला. महाबतखानाच्या प्रोत्साहनामुळे, अरेरावीने माजलेल्या रजपूत फौजेबद्दल मुसलमानी सैन्याला राग यायला लागलेला होताच त्याचा हा परिणाम होता. ह्या घटनेचा फायदा नूरजहाँने लगेच उचलला. तिने मुघल आणि अफगाणी सरदारांना रजपूत फौजेविरूध्द भडकवण्याचा कावा तिने सुरु केला. तो कावा बरोबर लागू पडला. दुसरी चाल तिने अशी जबरदस्त केली ती ही की एकदा तरी मला बादशहाला भेटू द्या अशी याचना महाबतखानाकडे केली. महाबतखानाने तिला सैनिकांच्या गराड्यात ठेवून बादशहाची भेट घेऊ दिली. त्या भेटीत बादशहाला तिने काही गुप्त सूचना केल्या. ती भेट झाल्यावर काही दिवसांनी बादशहाने महाबतखानाकडे विनंती केली की मी तुझ्या ताब्यात आहेच, एवढी मोठी फौजसुध्दा तुझ्याच लगामी आहे, म्हणून तू नूरजहाँला बंदीवासातून मोकळं कर. महातबखानाला नाही म्हणवेना कारण बादशहा पूर्णपणे त्याच्या ताब्यात आला होता. तो सांगेल तसं वागत होता, उलट नूरजहाँच्या जहांबाजपणाबद्दल स्वत:चं मन मोकळं करत होता. म्हणून महातबखानाने नूरजहाँला सैनिकांच्या गराड्यातून मोकळं केलं. महाबतखानाचा बादशहाबद्दलही विश्वास वाढत गेला. म्हणून त्याने त्याच्याभोवतीचं संरक्षक फौजही कमी केली. राजकारणात शत्रूबद्दल दया चालत नाही हे त्याने अजून अनुभवायचं होतं.ही त्याची फार मोठी चूक होती.

नूरजहाँने महाबतखानाच्या नजरकैदेतून मोकळं झाल्याचा पुरेपूर फायदा उठवला. महाबतखानाच्या असंतुष्टांना आपल्याकडे वळवलं होतं, लोभी सरदारांना भरपूर लाच देऊन आपल्या पक्षात घेतलं, जे निष्ठावंत होते तेही तिला येऊन मिळाले, काहींना मोठी पदं कबूल करून आपल्या पक्षात आणलं, जे अस्थिर मनाचे होते, त्यांना मोठी पदं कबूल केली. मिळून, महाबतखानाचा पक्ष हलका करून फोडून ठेवला. मग आपल्या विश्वासातील लोकांना बादशाहाजवळ तैनात केलं. एवढी कडेकोट तयारी केल्यावर, आता बादशहाला सोडवायच्या तयारीला ती लागली, कारण तो हुकूमाचा एक्का हाताशी असेपर्यंत तिचीच सत्ता चालणार होती. अंतस्थपणे तिने बादशहाशी सतत संपर्क ठेवला होता. त्याने काय बोलायचं, कसं वागायचं ह्याच्या त्याला सूचना पाठवत होती. त्याचवेळी आपला खोजा विश्वासू होशियारखान याला लाहोरला पाठवून तिथे २००० सैन्य तयार करून ठेवलं.

नूरजहाँची महाबतखानावर मात...बादशहाची सुटका..

काबूलला राहिल्यावर महातबखान परत लाहोरला यायच्या मार्गाला लागला. सगळा लवाजमा परतीच्या वाटेवर रोहटकपासून काही मैल अंतरावर असतांना नूरजहाँच्या शेवटच्या अंकाला सुरुवात झाली. जहाँगीरच्या सुटकेसाठी नूरजहाँने एक उत्कृष्ट डाव रचला जो भल्या भल्या राजकारणी धुरंधरांना जमला नसता. तिने अफगाण आणि मुघलांना रजपूतांविरूध्द भडकवलं. त्यामुळे महातबखानाकडे असलेली रजपूत सैन्याची ताकद कमी करण्याचा तिचा डाव सोपा झाला. महातब खान कमजोर होणं म्हणजे त्यायोगे

भविष्यात शहाजहाँही निष्प्रभ होणं घडायला हवं होतं. मग एक दिवस तिने बादशहाला निरोप पाठवला की आपली सर्व फौज एका ठिकाणी जमवून त्यांची पहाणी तुम्ही करावी. तेव्हा जहाँगीरने महाबतखानाकडे मला माझ्या सैन्याची एकदा पहाणी करावी अशी इच्छा आहे असा निरोप पाठवला. महातबखानाला हा हुकूम ऐकणं वावगं वाटलं नाही. मग बादशहाने महाबतखानाकडे दुसरी विनंती केली की, माझी मुसलमान आणि तुमची रजपूत यांच्या एकत्र येण्यात, रक्तपात घडण्याचा धोका आहे म्हणून दोन्ही फौजा एकमेकांपासून लांब ठेवाव्यात.. महाबतखानाने त्यालाही होकार दिला.

त्यामुळे प्रत्यक्ष मैदानावर घडलं असं की मोठ्या संख्येने उपस्थित असलेले मुसलमान सैनिक आणि रजपूत शिपाई दोन लांबलचक रांगा करून एकमेकांपासून दूर उभे राहिले. बादशहाजवळ त्याच्या संरक्षणासाठी अगदी थोडी फौज शिल्लक राहिली. मग बादशहा फौजेची पहाणी करण्यास निघाला तेव्हा अचानक नूरजहाँच्या २००० शिपायांनी बादशहाला वेढा घातला आणि ते त्याला उचलून पसार झाले. महाबतखानाची एवढी मोठी फौज असूनही पक्षी पिंजऱ्यातून डोळयादेखत उडाला.. ही सगळी युक्ती केवळ नूरजहाँची. बादशहाला घेऊन ती रोहटकला पोचली. लगेच तिने कारभारावर ताबा मिळवला आणि आपली सत्ता चालू केली.

भारतीय इतिहासात प्रचंड मोठ्या संख्येने शत्रूच्या गराड्यात पडलेले असतांना विलक्षण मनोधैर्याने साहसी खेळ करून शत्रूला चकित करणाऱ्या ३ घटना म्हणजे कनोजची राजकन्या संयोगिताला लीलया पळवून नेणारा पृथ्वीराज चाहमान, दुसरी नूरजहाँ आणि तिसरे आपले शिवाजीमहाराज. ते तर

३ वेळा, अफझलखान, शायिस्ताखान आणि आग्र्याहून फौजेच्या गराड्यातून सुटका करून घेणारे होते.

महाबतखानाची १०० दिवसांची औट घटकेची सत्ता संपुष्टात आली.

महातबखान या घटनेने अवाक झाला. नूरजहाँने लगेच रोहटकलाच दरबार भरवून, महाबतखानाला त्याच्या कैदेत असलेल्या आपल्या भावाला, असफखानाला, त्याच्या शायिस्ताखान मुलाला, आणि दानियलाच्या ३ शहजादांना मोकळं करण्याचं फर्मान पाठवलं. महाबतखानाला ते ऐकावंच लागलं. मग आत्मसंरक्षणासाठी त्याने उदेपूरच्या राणाकडे आश्रय घेतला. नूरजहाँने त्याला राण्याकडून मागून घेतलं आणि शहाजहाँवर दक्षिणेत पाठवलं. पण महाबतखान शहाजहाँलाच जाऊन मिळाला. त्याचवेळी मोहिमेवर असलेला पर्वीजही अचानक मरण पावला. त्याच्यावर शहाजहाँने विषप्रयोग करवला अशी शंका लोकांना आली. आता फक्त दोनच तट उरले, एक शहाजहाँ आणि दुसरी नूरजहाँ. नूरजहाँ बादशहाला घेऊन लाहोरला आली.

बादशहाचा मृत्यू.

१६२७ च्या ११मार्चला नवरोजचा सण साजरा करून बादशहा काश्मीरला गेला. त्याची प्रकृती बिघडत चालली होती. नूरजहाँला बादशहा आता वाचत नाही हे कळून चुकलं होतं. तिने मनापासून त्याची शुश्रूषा केली. तिच्या दुर्दैवाने तिचा जावई शहर्यारही आजारी पडला आणि काश्मीरचा प्रवास सोडून लाहोराला औषधपाण्यासाठी आला. आता तिच्याबरोबर नातू खुस्रोचा मुलगा दावरबक्ष फक्त होता. काश्मीरचा उन्हाळा संपवून बादशहा लाहोरला

यायला निघाला. तो प्रचंड थकत चालला होता. त्याची अन्नावरची दारूवरची वासनाही उडली होती. दारु आणि अफू त्याला नकोशी व्हायला लागली होती.

एक दिवस शिकारीची तीव्र इच्छा झाली म्हणून तो एका डोंगराच्या पायथ्याशी शिकार करत असतांना अचानक एक शिकारी गडगडत त्याच्या पायाशी येऊन पडला आणि मेला. जहाँगीरच्या मनावर याचा विलक्षण परिणाम झाला. मृत्यूच आपल्याला न्यायला आला आहे असा त्याला भ्रम झाला. त्यानंतरच्या प्रवासात दमा आणि खोकला याने त्रस्त झालेला, मनोदुर्बल आणि देहदुर्बल झालेला बादशहा लाहोरच्या वाटेवर असतांनाच प्रवासातच २८ ऑक्टोबरला मरण पावला. त्या क्षणी नूरजहाँची ललाटरेखा संपली. तिची सत्ता संपली. तिचं राज्ञीपद संपलं. तिचं सौभाग्य संपलं. आता बादशहाचं शव घेऊन लाहोरला पोचायचं एवढाच वेध तिला लागला. आता पुढे काय होणार याकडे तिचं लक्ष लागलं.

खुस्रोचा पुत्र दावरबक्ष याला तख्तावर बसवायचं हे जहाँगीर सांगून गेला होता, पण नियती कशाला त्याचं ऐकणार…? तिचे आकृतीबंध वेगळेच होते.

शेवटचा अंक---

बादशहाच्या मरणाची बातमी लाहोरात त्वरेने पोचली. नूरजहाँचा भाऊ असफखान दरबारात होताच. त्याने शहाजहाँला बादशाही मिळावी म्हणून खुस्रोचा मुलगा, बादशहाचा नातू दावरबक्षला तात्पुरतं तख्तावर नेमलं. शहर्र्यारला कैदेत घातलं. नूरजहाँ आपल्या पतीच्या शवाबरोबर होती. सुतकामुळे ती काहीच करू शकली नाही. लाहोरास काय उलथापालथ झाली

आहे तेही तिला कळलं नाही. तिने असफखानला भेटायला यायचा वरचेवर निरोप पाठवला पण तो आलाच नाही. ज्या बहिणीने त्याला महाबतखानाच्या कैदेतून मोकळं केलं, तिचा पक्ष त्याने आता सोडून दिला. कारण शहाजहाँला बादशहा बनवायचं स्वप्न तो पहात होता. असफखानाने लाहोरात जलद गतीने हालचाली केल्या. आपला अत्यंत विश्वासू माणूस बनारसीदास याला आपली अंगठी दिली आणि चपळतेने शहाजहाँला आग्र्याला यायचा निरोप देऊन पाठवलं. मुद्दामहून कोणताही लेखी निरोप त्याच्या हाती दिला नाही. नूरजहाँ आपल्या पतीचं शव घेऊन ६ दिवसांनी लाहोरास पोचली. तेव्हा तिला लगेच नजरकैदेत ठेवलं. दुसरीकडे दानियल या शहजादाचा पुत्र बायसंघर हा लाहोरात पोचला. असफखानाची नजर चुकवून कैदेत असलेल्या शहर्रयारला जाऊन भेटला. दोघांनी मिळून लाहोरचा किल्ला आणि खजिना ताब्यात घेतला आणि असफखानावर हल्ला केला पण यात शहर्रयारचा पराभव झाला. तो परत आसफखानाच्या अटकेत पडला. बायसंघर अफगाणिस्तानात पळून गेला.

इकडे बनारसीदास असफखानाचा निरोप अज्ञातवासात राहात असलेल्या शहाजहाँच्या तळावर स्वराज्यात २० दिवसांनी पोचला. त्याने महाबतखानाची भेट घेतली. मग दोघांनी शहाजहाँकडे जाऊन झोपलेल्या शहजादाला उठवलं. तो जागा झाला तेव्हा त्याच्या भाग्याचा दिवस उजाडला होता. शहाजहाँ जलद गतीने सुमुहूर्त पाहून आग्र्याकडे निघाला. पहिल्या टप्प्यात तो अहमदाबादेस पोचला. त्याने पहिलं महत्त्वाचं काम केलं ते हे की सर्व राजपुत्रांना मारून टाकण्याचा हुकूम असफखानाला लिहून पाठवला. २१ जानेवारीला हा हुकूम मिळताच २३ जानेवारीला असफखानाने हुकूम मिळाल्याबरोबर जहाँगीरचे

मुलगे, नातू, शहरयार, खुस्रोचे मुलगे दावरबक्ष आणि गर्सास्प, दानियलचे मुलगे तहमुरास आणि होशंग यांना ठार मारलं. त्यांची प्रेतं लाहोरातील बागेत पुरली आणि शीरं, पुरावा म्हणून शहाजहाँकडे पाठवली. शहाजहाँ अजमेरास पोचला. चिश्तीच्या दर्ग्याचं दर्शन घेऊन २४ जानेवारीला आग्र्याला आला. त्याचा तख्तावर बसण्याचा मार्ग मोकळा झाला होता. ५ फेब्रुवारी १६२८ या दिवशी त्याचा राज्यारोहण समारंभ पार पडला.



विरक्ती ...

नूरजहाँच्या आयुष्यातील पुढची पानं रिकामी लिहिली गेली. जहाँगीरचं शव लाहोरात आलं. असफखानच्या देखरेखीखाली जहाँगीरला शहादराच्या नूरजहाँच्या दिलखूष बागेत मूठमाती दिली गेली. आपल्या कबरीवर इमारत बांधू नये, मृत्यूनंतरही मला निसर्गाच्या सान्निध्यातच पाऊसपाणी झेलत राहायचं आहे अशी इच्छा त्याने सांगून ठेवली होती. म्हणून ती कबर उघडीच राहिली. नूरजहाँ तिच्या पतीच्या थडग्याशेजारी त्या आवारातच लाहोरातच राहिली. लाडलीबेगम तिच्याबरोबर होती. शहजहाँने तिला सालिना २ लाखांची पेन्शन मंजूर केली.. नूरजहाँने त्याची कबर संगमरवराने, भोवतालच्या फुलबागेने, अत्यंत देखणेपणाने नयनरम्य केली. तिच्या आवारात मोठी बाग तयार केली. ती स्वत: रोज त्याची कबर स्वच्छ करायची. त्यावर दिवा लावायची. आता सर्व राजकारणापासून ती अलिप्त झाली. दिवसभर ईश्वर उपासना, नमाज, आणि दिवसभर गोरगरिबांची दानधर्माने सेवा करत राहिली. शहरातील विधवांना आणि अनाथ मुलांना आश्रयस्थान बनली. त्यांना अरबी-उर्दू भाषा शिकवण्यात वेळ घालवायला लागली. सतत पांढऱ्या, साध्या वस्त्रांमधेच वावरली. त्या कपड्यांमधेही वृध्दपणीही ती तितकीच सुंदर दिसत होती. तिने शहाजहाँकडे काहीही मागितलं नाही आणि त्याच्या राजकारणात लक्षही घातलं नाही. इतकी ती विरक्त झाली. राजकारणात राहिलेल्या व्यक्तीने एवढं दूर जाणं हेही अवघडच.

वयाच्या ६६ व्या वर्षी १६४५ साली ती वारली. तिच्या कबरीचं चित्रं तिने आधीच रेखाटून ठेवलं होतं. जहाँगीरच्या शेजारीच तिने चिरनिद्रा घेतली. ती

जहाँगीरसाठी जगली. त्याच्यावरच्या उत्कट प्रेमाने, निगराणीने त्याला तिने जगवलं, त्याची सत्ता आपल्या अष्टावधानी राजकीय चातुर्याने, चाणाक्षपणाने आणि डावपेंचाने अबाधित ठेवली. त्याच्या निधनानंतर सर्वातून मुक्त होऊन एकाकी आयुष्य शांतपणाने जगली हाही तिचा अलौकिक गुण. जहाँगीरसाठी नूरजहाँ आणि नूरजहाँसाठी जहाँगीर असं हे प्रेमी युगुल अमर झालं. ती स्त्री होती म्हणूनच केवळ तिला तख्तावर बसता येत नव्हतं. नाहीतर घोडेस्वारीत आणि निशाणबाजीत अव्वल असणाऱ्या, राजकीय चाली खेळण्यात तरबेज असणाऱ्या नूरजहाँनेच मुघल सल्तनत परिपूर्ण सांभाळली असती. ती होती म्हणूनच जहाँगीर सत्तेत राहिला.

इराणच्या ओसाड मरूभूमीतील हे चतुरस्त्र अनमोल चमकदार रत्न, नूरजहाँ म्हणजे जगतप्रभा बनून अजूनही भारतात चमकतंय...

.

महन्माता जिजाबाई

मृत्यू १७ जून १६७४.



लोककल्याणासाठी परमेश्वराने मानवरूपाचा अवतार धारण केला अशा कथा जगात प्रसिध्द आहेत. शिवशंकराने एका स्त्रीच्या पोटी जन्म घेतला आणि दु:खी प्रजेला आनंद दिला, हा अवतार मराठी जनतेने प्रत्यक्ष अनुभवला. त्या पुण्यश्लोक स्त्रीचं नाव जिजाबाई. एक वीर कन्या. एक वीरपत्नी. एक वीरमाता. एका राष्ट्राच्या उदयाची स्वामिनी. देवगिरीच्या यादवांच्या फार मोठ्या घराण्यात ती जन्माला आली. साक्षात श्रीकृष्णाच्या वंशातून. कौरव-पांडव

महायुध्दानंतर श्रीकृष्णांच्या यादव कुळातही झगडे सुरु झाले आणि भयंकर नरसंहार होऊन यादव कुलांचा नाश झाला. त्यावरुनच भयंकर नरसंहाराला “यादवी माजली” हा शब्द रुढ झाला. ययाती देवयानी यांचा पुत्र यदु याच्यापासून यादव कुळाची सुरुवात झाली. त्यांचंच नाव पुढे महाराष्ट्रात जाधव असं रूढ झालं. जसं शिलाहार म्हणजे आताचे शेलार, मौर्य म्हणजे मोरे, कदंब म्हणजे कदम, चालुक्य म्हणजे चाळके-साळुंखे तसे यादव म्हणजे जाधव.

श्रीकृष्णाच्या रुक्मिणीला प्रद्युम्न नावाचा पुत्र होता. त्याचा विवाह विदर्भ कन्येशी झाला. अनिरुध्द, वज्र असे दोन पुत्र प्रद्युम्नाला झाले. अनिरुध्दचा सूड घेण्यासाठी सारे रजपूत एकत्र आले तेव्हा अनिरुध्द आणि वज्र पळून गेले आणि अनिरुध्दने काठेवाडमधील गिरनार-जुनागड इथे आपलं राज्य स्थापन केलं. त्याचा भाऊ वज्र याच्या नाभ आणि क्षीर या दोन मुलांपैकी क्षीरच्या वंशापासून भरतपूरच्या जाट कुळाचा विस्तार झाला. या वंशजांनी राजपूतांना जिंकलं. राज्याचा विस्तार करत हे घराणे इ. स. ७४५ च्या सुमाराला दक्षिणेत पोचले. या कुळातील भिल्लमाने इ. स. ११८७ मधे प्रचंड राज्य विस्ताराला योग्य अशी देवगिरी ही आपली राजधानी केली. या राजधानीने इतिहास घडवला.

या कुळातील अत्यंत शूर सिंघण हा इ. स. १२१० मधे देवगिरीचा राजा झाला. सिंघण याने प्रचंड मुलूख मिळवला आणि स्वत:ला तो पृथ्वीपती आणि राजाधिराज म्हणवून घेऊ लागला. महान गणिती आणि ज्योतिषाचार्य भास्कराचार्यांचा काश्मीरमधे राहणारा मुलगा सोधल हा या यादव राजांच्या पदरी मुख्य प्रधान होता. त्याचा मुलगा सारंगधर याने सिंघणच्या आज्ञेवरून संगीत रत्नाकर हा ग्रंथ लिहिला. भास्कराचार्यांचा नातू आणि लक्ष्मीधराचा

मुलगा चांगदेव हा सिंघणचा मुख्य ज्योतिषी होता. याच सिंघणला देवालयं बांधण्याचा फार नाद होता. कोल्हापूरच्या भोजराजाशी लढत असतांना त्याने सिंघणापूर वसवलं, तिथे देऊळ बांधलं, तेच आजचं शिखर शिंगणापूर. खटाव तालुक्यात मायणी गावातील संगमावरही त्याने संगमेश्वराचं देऊळ बांधलं. या सिंघणनंतर पराक्रमी पुरुषांची परंपरा देवगिरीच्या यादव कुळात चालूच राहिली.

सन १२७१ मधे गादीवर आलेल्या रामदेवरायाच्या नंतर देवगिरीचा इतिहास बदलला. या रामदेवरावाच्या काळात अमरकोश हा सुप्रसिध्द ग्रंथ लिहिला गेला. याच राजाच्या काळात ज्ञानेश्वर माऊलींचा उदय झाला. यादव घराणं असं वैभवाला पोचलेलं असतांना उत्तरेत सुलतानी राजवटीने आपलं स्थान भक्कम केलं होतं. अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीत सत्ता घेतल्यावर दक्षिणेवर स्वारी केली. अल्लाउद्दीन खिलजी हा आपल्या कुरा सुभ्यातून निघाला आणि ७०० मैल प्रवास करुन देवगिरीवर पोचला. त्याच्या स्वारीत रामदेवरायाचा पराभव झाला. त्याचा मुलगा सिंघण-शंकरदेव हा सन १३१२ मधे मारला गेला. अशारितीने, ६०० वर्षांचं पुरातन देवगिरीचं वैभवसंपन्न साम्राज्य लयाला गेलं आणि मुसलमानी सत्ता सुरु झाली. देवगिरीच्या यादवांच्या घराण्यात गोविंददेव, ठाकूरजी, भेतोजी, अचलोजी, विठ्ठलदेव,आणि नंतर लक्ष्मणदेव म्हणजेच लखूजी जाधव (१५७१ ते १६२९) असे वंशज कीर्ती गाजवत राहिले.

या यादव वंशातील ठाकूरजीने दिल्लीची सुलतानी सत्ता कबूल करुन त्यांच्या पदरी नोकरी धरली. तेव्हापासून देवगिरीचं राजघराणं संपलं तरी ते सिंदखेडच्या जवळपासच्या ५२ प्रांतांचे वजनदार देशमुख म्हणून यादव

अधिकारात राहिले. विठ्ठलदेवांनंतर आले ते कीर्तीमान, अतुल पराक्रमी लखूजी जाधव. ते निजामशाहीत चाकरीला लागले. त्यावेळी दिल्लीत अकबर सम्राटाच्या हाती सत्तेचे दोर आले होते. त्याला निजामशाही घशात घालण्याची आंस लागली होती. त्याच्याविरुध्द चांदबिबी वीजेसारखी तळपत होती. चांदबिबी मरण पावल्यावर सत्तासंघर्षात लखूजीने मोठीच भूमिका गाजवली. निजामशाहीचा वारस मूर्तजा याला परिंडा इथे तख्तावर बसवून त्यांनी निजामशाहीचा बचाव केला.

या लखूजी जाधवाच्या पोटी जन्मली जिजाऊ..

लखूजी जाधव बहादूरी गाजवत असतांना दुसरीकडे नियती आणखी एक साखळी घडवत होती. कारण तिला दोन घराण्यांची कडी एकमेकात गुंतवायची होती. सिसोदिया घराण्यातून आलेल्या भोसले घराण्यातील मालोजी आणि विठोजी, हे बंधू वेरुळमधे राहून, लखूजी जाधवरावाच्या लष्करात चाकरी करायला लागले. त्यातील मालोजी भोसले एवढे धिप्पाड होते की ते बसले की घोडं बसायचं तेव्हा लखूजी जाधवांनी मालोजींना आपल्या देवडीवरचा प्रमुख पहारेकरी केलं. या मालोजी भोसल्यांचा विवाह फलटणच्या तालेवार जगपाळ निंबाळकरांची कन्या उमव्वा हिच्याशी झाला होता. बरेच दिवस संतती न झाल्यामुळे, उमव्वाने अहमदनगरच्या शहाशरीफ पीराला नवस केला. तिला दोन मुलगे झाले पहिला शहाजी आणि दुसरा शरिफजी.

आख्यायिका सांगते की, सन १५९९ सालच्या शिमग्याच्या सणाला मालोजीराव आपल्या ६ वर्षाच्या या तेजस्वी, देखण्या पुत्राला, शहाजीला घेऊन लखूजींच्या पायावर घालायला घेऊन गेले. छोटी जिजाबाई तेव्हा आपल्या

पित्याच्या मांडीवर बसली होती. जाधवराव शहाजीचं तेजस्वी रूप पाहून खूष झाले आणि त्यांनी चेष्टेने जिजाबाईस विचारलं, की तुला हा नवरा म्हणून पसंत आहे का? मग चेष्टेत झालेला तो विषय तिथेच थांबला. जिजाऊ आणि शहाजीही रंग खेळण्यात सामील होऊन एकमेकांवर रंग उडवू लागले. तेव्हा मालोजी उठून उभे राहिले आणि सर्वांना उद्देशून म्हणाले की बघा, आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले. त्यावर भर सभेत, मालोजीराजांचं हे बोलणं लखूजींना आणि म्हाळसाबाईंना आवडलं नाही. कारण मालोजी त्यांच्या अजिबातच बरोबरीचे नव्हते. म्हणून लखूजींनी या संबंधाला नकार दिला. या कथेला कागदोपत्री पुरावा नाही.

मालोजींना तो अपमान सहन न झाल्यामुळे आता हीच मुलगी आपल्या पुत्राला करायची या निश्चयाने लखूजींच्या चाकरीतून बाहेर पडले. भीमेच्या काठी आपल्या वतनवाडीवर जाऊन राहिले. तिथे मालोजींना त्यांच्या शेतात पुरलेला मोठा द्रव्यसाठा सापडला. त्या धनातून त्यांनी घृष्णेश्वराच्या देवळाचा जीर्णोध्दार केला. शिंगणापूरच्या देवळाच्या डोंगरावर यात्रेकरूंच्या सोयीसाठी मोठा तलाव बांधला. इमारती बांधल्या. या लोकोपयोगी दानधर्मांमुळे मालोजींचा लौकिक वाढला. मालोजी भोसले आणि लखूजी जाधव यांच्यातील हे भांडण कारभारी मलिक अंबरच्या कानावर गेलं तेव्हा क्षुल्लक कारणावरून आपल्या दोन पराक्रमी सरदारांमधे फूट पडणं त्याला पसंत पडलं नाही. म्हणून मालोजींना लखूजींच्या बरोबरीने आणण्यासाठी म्हणून मलिक अंबरने मालोजींना ५ हजारी मनसब दिली. पुणे आणि सुपेची जहागिरी, शिवनेरी चाकण किल्ल्यांच्या आणि खालच्या भागाची मामलत एवढं दिल्यावर

मालोजींना राजे पद मिळालं. त्यानंतर शहाजी आणि जिजाऊ यांचा विवाह मोठ्या थाटात पार पडला. इ. स. १६०४ च्या एप्रिलमधे हा विवाह झाला. मालोजी आणि विठोजी बंधू निजामाचे प्रतिष्ठित दरबारी बनले.

१६०६ साली मालोजी मरण पावल्यावर शहाजीराजांकडे सरदारी आली. शहाजी तरुण झाले आणि निजामाच्या दरबारात जाऊ लागले. स्वाभिमान, आत्मविश्वास, देखणेपण, तीक्ष्ण बुध्दी, धमन्यांमधील रग, राजकारण खेळण्याची उमेद यामुळे अहमदनगरच्या राजकारणात शहाजीराजे चमकू लागले. दिल्लीमधे अकबराच्या मृत्यूनंतर जहाँगीर सत्तेत आला आणि अहमदनगर जिंकायच्या मागे लागला. त्यावेळी चांदबिबीनंतर मलिक अंबर हा हबशी निजामशाहीत प्रमुख बनला होता. त्याने मुघलांनी जिंकलेले प्रदेश परत घ्यायला सुरुवात केली. पण मुगल फौजेपुढे मलिक अंबरचं काही चालेना तेव्हा त्याने खडकी गाव वसवून तिथे राजधानी उभारली. तीच आजची औरंगबाद नगरी.

लखूजी जाधव आणि शहाजी भोसले यांनी सन १६१६ मधे रोशनगावच्या लढाईत भरपूर पराक्रम गाजवला पण मलिक अंबर हरला. मुघलांच्या हाती निजामशाही येईना तेव्हा जहांगीर बादशहाने सरदार फोडण्याचं कारस्थान सुरु केलं आणि लखूजी जाधवांसारखे अनेक सरदार आपल्याकडे वळवले. त्यामुळे निजामशाही कमकुवत झाली तरी मलिक अंबर डगमगला नाही. त्याची लष्करी डावपेच, गनिमीकावा, पराक्रम आणि रणनीतीतील चातुर्य दाखवणारी १६२४ मधली भातवडीची लढाई, ज्यात शहाजीराजांचा पराक्रम झळाळून उठला. शहाजी आणि शहाजहाँ समोरासमोर आल्याने ती ऐतिहासिक ठरली. यात शहाजहाँ हरला. याच लढाईत शहाजीराजांचा भाऊ शरिफजी ठार

झाला. दुसरा एक मोठा परिणाम झाला तो, मलिक अंबरला शहाजीराजांच्या पराक्रमाची एवढी भीती बसली की त्याने शहाजीराजांचा दरबारात अपमान करायला सुरुवात केली. त्या अपमानाने संतापलेले शहाजीराजे १६२५ मधे निजामशाही सोडून विजापूर दरबारात रुजू झाले.

शहाजी निजामशाहीत असतांना एक दिवस अशी घटना घडली की ज्याने भोसले आणि लखूजी जाधवांचं वैर परकोटीला गेलं. एक दिवस निजामाच्या दरबारातून सर्व दरबारी बाहेर पडत असतांना खंडागळे सरदाराचा हत्ती बेफाम होऊन माणसं चिरडत चालला. त्याला लखूजीचा जाधवाच्या मुलाने, दत्ताजीने वार करुन जखमी केलं. त्याचवेळी विठोजी भोसल्यांच्या संभाजी आणि खेळोजी या मुलांनी खंडागळ्यांची बाजू घेतल्यामुळे हत्ती बाजूलाच राहिला आणि जाधव-भोसले मुलांच्यात मारामारी सुरु झाली. अशा बिकट प्रसंगी एकीकडे मेहुणा दत्ताजी तर दुसरीकडे चुलतभाऊ खेळोजी यांच्या कात्रीत सापडलेल्या शहाजींनी भोसले भावांची बाजू घेतली. या हाणामारीत दत्ताजी जाधव मारला गेला. संतापलेला लखूजी, भोसले बंधूंवर चालून आला आणि त्याने संभाजी भोसलेला ठार केलं. शहाजीवरही वार केला. हे भांडण निजामशहाच्या कानावर गेलं तेव्हा मलिक अंबरने विठोजी भोसल्यांची बाजू घेतली. तेव्हा संतापलेले लखूजी जाधव निजामशहाकडून दिल्लीच्या बादशहाकडे चाकरील गेले. मलिक अंबरचा पराभव करण्यासाठी बादशहाने लखूजीस फोडून आपल्याकडे वळवलं. त्यासाठी त्याने लखूजीस २४,००० पायदळ आणि १५००० घोडदळाची मनसबदारी दिली, इतका लखूजींच्या पराक्रमाचा सन्मान केला.

पुढच्याच वर्षी १६२७ मधे अदिलशहा, मलिक अंबर आणि बादशहा जहाँगीर मरण पावले, तेव्हा निजामाने शहाजीराजांना परत आपल्याकडे बोलावून घेतलं. या राजकीय परिवर्तनामधे शहाजीराजे गुरफटत चालले. शहाजहाँ १६२८ मधे बादशहा बनल्यावर निजामशाही जिंकायला अदिलशहाला घेऊन त्याने युध्दाचा धुमाकूळ माजवला. त्यावेळी १६३० सालात आदिलशहाचे मुरार जगदेव आणि रणदुल्ला खान पुण्यावर चालून गेले. पुणं ओसाड करून गाढवांचा नांगर फिरवला. सगळे वाडे जाळून टाकले. शहाजीराजे हे सर्व संकट असहायपणे पाहात राहिले. शहाजहाँवर निजामाच्या फौजा चालून गेल्या तेव्हा लखूजी जाधवांनी आपल्याला दगा देऊ नये म्हणून मूर्तजा निजामाने लखूजी जाधव आणि त्याच्या मुलांना कैदेत ठेवण्यासाठी दौलताबादच्या किल्ल्यात भेटीला बोलावलं. पण अचानक तिथे दंगल माजली आणि लखूजी जाधव आणि त्याचे मुलगे त्यात मारले गेले. त्यांची बायको गिरिजाबाई सिंदखेडला पळून गेली. सासऱ्यांचा संहार आणि पुणं जळतांना पाहून शहाजीराजे घातकी निजामाला सोडून शहाजहाँला सामील झाले. १६२९ मधे ही सारी उलथापलथ झाली. पण शहाजहाँने दौलताबादवर स्वारी करून तो जिंकला आणि फत्तेखान किल्लेदाराला शहाजीराजांचीच जहागिरी लाच म्हणून दिली. बादशहाने आपली ही फसवणूक केली म्हणून संतापलेले शहाजीराजे परत निजामाकडे आले. शहाजीराजे सततच्या आपत्तीमुळे सतत चाकरी बदलत राहिले. आणि जिजाबाई अस्थिरतेच्या झूल्यावर हेलकावत राहिल्या.

जिजाबाई जेव्हा परत गर्भवती राहिल्या तेव्हा या धामधूमीच्या काळात त्यांना शांतपणे राहता यावं म्हणून शहाजीराजांनी त्यांना शिवनेरीवर ठेवलं.

शहाजीराजांच्या जीवाच्या संकटाच्या काळजीने किल्ल्यावरील शिवाई देवीला त्यांनी नवस केला की माझ्या सौभाग्याचं रक्षण केलंस तर जो पुत्र होईल, त्याचं नाव मी शिवाई ठेवीन. तसंच झालं. फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१, १९ फेब्रुवारी १६३० या दिवशी, जिजाऊंना पुत्र झाला. त्यांनी आपल्या या मुलाचं नाव शिवा ठेवलं. जिजाबाई बालसंगोपनात गढून गेल्या. पण असे थोडेच दिवस त्यांना स्वास्थ्य लाभलं. शहाजीराजांनी जिजाबाई आणि शिवबांना दौलताबादजवळ, बैजापूरला आणलं. जिजाबाई आणि त्यांचा ३ वर्षांचा पुत्र यांना पकडलं तर शहाजी वठणीवर येईल असं वाटल्यावरून त्रिंबकचा किल्लेदार म्हालदारखान याला बादशहाने ती कामगिरी सांगितली. हा म्हालदारखान जिजाबाई आणि शहाजींचा परिचित होता, पण सूज्ञ आणि धाडसी जिजाबाईंनी कपटी दगाबाज मुघलांना कधीच ओळखलं होतं. त्यांनी शिवबांना गुपचुप शिवापूरला पाठवून दिलं होतं. त्यामुळे म्हालदारखानला एकट्या जिजाबाईच सापडल्या. त्यांना कैद करण्यात आलं तेव्हा त्यांचे बंधू जगदेवराव जाधव हे स्वत: बादशहाकडे गेले आणि त्याला विनवलं की शहाजीने दुसरी बायको केली आहे. ते आमच्या बहिणीला विचारत नाहीत. जिजाबाईंना पकडलं तर उलट शहाजीराजांना बरंच वाटेल. तेव्हा बादशहाला हे पटलं आणि जिजाबाईंची सुटका झाली. जिजाबाईंनी मुघलांना फार जवळून ओळखलं. त्यांच्या हुशारीमुळेच शिवबांचं रक्षण झालं होतं. फार धाडसाने आणि धिटाईने जिजाऊंनी हा सामना सहन केला. मग जगदेवरावांनी जिजाबाईंना सिंहगडावर नेऊन ठेवलं. अत्यंत स्वाभिमानी, खंबीर, जिजाबाईंची १० वर्षे अशी ठिकाणं बदलण्यात गेली. त्यांना आधार होता तो शिवबांचा आणि शहाजीराजांचा. कोंडाण्याचे सुभेदार दादोजी कोंडदेव यांनी १६३६

सालात, शहाजीराजांच्या आज्ञेवरून जिजाऊ आणि शिवरायांना पुण्यात आपल्या वतनावर आणलं. मुगलांच्या कपटनीतीवर मात करण्याचं हे बाळकडू आपल्या मातेकडूनच आलं.

आता पूर्ण ताकदीने शहाजीराजे मुगल फौजेच्या नाशाला झटायला लागले. बादशहा,निजाम आणि आदिलशहा यांच्या बदलत्या चढाओढीच्या राजकारणात आणखी एक महत्त्वाची शहाजीराजांची धाडसी योजना आकाराला आली. दौलताबाद किल्ला मुगलांच्या ताब्यात गेला. निजामाला कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात ठेवलं तिथे तो मरण पावला. निजामशाही संपली या कल्पनेत बादशहा असतांना, शहाजीराजांनी एक धाडसी डाव टाकला. निजामाचा एक बालवयीन नातलग मूर्तजाला ताब्यात घेऊन त्याला पेमगडला नेऊन त्याच्या नावाने निजामशाही चालू केली. पण आकाराने लहान आणि गैरसोयीचा म्हणून पेमगड सोडून द्यावा लागल्याने शहाजीराजे घेऊन माहूली किल्ल्यात बंदोबस्ताने राहिले. तिथे मूर्तजाची आईच मुगलांना सामील झाली हे कळल्यावर शहाजीराजांना आदिलशाहीत जाण्याविना दुसरा मार्गच उरला नाही. पण शेवटी आदिलशहा आणि शहाजहाँ एक झाले. माहूलीत खूप शौर्य गाजवूनही राजांना सोडावा लागला. मग आदिलशहाचे सरदार मुरार जगदेव, कान्होजी जेधे, रणदुल्ला खान यांच्या सल्लामसनतीनंतर शहाजीराजे आदिलशहाच्या दरबारात सन १६३६ सालापासून कायम झाले. या सगळ्या धडपडीसाठी विश्वासातील माणसं जमवणं, किल्ल्यांची बंदोबस्ती राखणं, गनिमी कावा, शत्रूंचे सरदार फोडणं हे सारे उद्योग त्याच ताकदीने त्यांनी केले. अप्रतिम युध्द कौशल्य, वेगाने दौडणे, अचंबित करणारा गनिमीकावा, झुंझार

टक्कर, हे त्यांच्या अंगात भरपूर गुण होते. जिजाबाईंनी या मोठ्या काळात खूप धावपळ सहन केली. मात्र आदिलशाहीत आल्यावर राजेही स्थिरावले आणि शिवरायांसह, जिजाबाईही पुण्याला येऊन शांत जीवन जगायला लागल्या. शिवबा १० वर्षांचे झाले तेव्हा निंबाळकरांच्या सईबाईशी त्यांचा विवाह झाला. जिजाबाईंच्या आनंदात आणखी भर पडली.

शहाजीराजांनी १६४३ सालामधे शिवबा आणि जिजाबाई यांना आपल्याजवळ आणलं. शिवरायांना घेऊन आदिलशहाच्या भेटीला गेले. पण विजापूरातील गोहत्या, शिवबांचा यवनद्वेष आणि ताठर भूमिका पाहून सुलतानाची नाराजी नको म्हणून शहाजीराजांनी जिजाबाई आणि शिवबांना २ वर्षांच्या मुक्कामानंतर पुण्याला परत पाठवलं. आदिलशहाच्या आग्रहावरून शिवरायांचा सोयराबाईंशी विवाह मोठ्या थाटात पार पडला. जिजाबाई पुण्याला येऊन दाखल झाल्या. त्यांना पुण्याला परत पाठवतांना, शामराज नीलकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, रघुनाथ बल्लाळ कोरडे, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्लाळ अत्रे अशा आपल्याजवळच्या हुशार लोकांना शहाजीराजांनी त्यांच्याबरोबर दिलं. वडिलांची सरदारी पाहिलेली असल्यामुळे, कारभार पहाणं जिजाबाईंना नवीन नव्हतं. जिजाबाईंनी आपला भाऊ अचलोजीच्या मुलाला, संभाजीला आपल्याजवळ आणलं. या संभाजीने बाजी प्रभू देशपांडेंबरोबर खिंड लढवली आणि प्राणही दिला. जाधवांकडील धनाजी जाधवही मग एक दिवस महाराजांच्या कामगिरीत सामील झाले. त्याउलट जगदेवरावांच्या निष्ठेचं कौतुक करण्यासाठी बादशहाने त्यांना रुस्तुमराव हा किताब आणि सिंदखेड वगैरे ५२ प्रांतांची देशमुखी त्यांच्या नावे करून दिली.

शहाजीराजांचं वरचेवर ताबेदारी बदलणं पहात, जिजाबाईंनी हेही राजकारण सोसलं. पण तो काळच असा होता की सर्व मराठे एकत्र नव्हते. सर्वांना आश्रय मिळेल असं मराठ्याचं स्वतंत्र राज्य नव्हतं. धाडसी शूरांना, मुसलमानी चाकरी पत्करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे सर्वच मराठी सरदारांना आज निजामशाही, उद्या आदिलशाही असं धरसोडीचं राजकारण खेळावं लागत होतं. शहाजीराजांच्या मनात स्वतंत्र राष्ट्राचं बीज तेव्हाच आणि त्यामुळेच रुजलं. जिजाऊंनीसुध्दा हेच अनुभवलं. शहाजीराजे विजापूरकरांकडून मिळालेल्या बंगलोर, होस्कोटे, बाळापूर, कोलार या आपल्या जहागिरीवरस्थिरावले. शहाजीराजांनी संभाजी मोहित्यांच्या कडील तुकाबाईशी लग्न केलं. त्यांना एकोजी हा पुत्र झाला. त्या बंगलोरला शहाजीराजांजवळ राहिल्या. .

मुक्त वाऱ्यासारखे डोंगर, दऱ्या, घनदाट जंगलांमधे, काळोख्या रात्रींमधे, लांब रपेटीमधे, लोकसंग्रहांमधे, सावधान मनोवृत्तीमधे धाडसाचा, चैतन्याचा, कसदार सोन्याचा पुतळा शिवबांच्या रुपाने घडायला लागला. सारी रयत, सारे मावळे, सारे शत्रूसुध्दा, त्यांच्याच भोवती गोळा होऊ लागले. यात जिजाऊंना परत एकदा एक फटका बसला तो संभाजीच्या वीरमरणाचा. अफझलखानाने कपटाने लढाईत संभाजीचा प्राण घेतला होता. आपल्या पुत्राच्या मरणाची जिजाबाईंनी ती कळ शांतपणे सोसली. आता शिवबांबरोबरच्या वास्तव्यात राजगडावरील वाड्यात सुना-नाती, नातवांचे आवाज घुमू लागले. महाराजांना ८ स्त्रिया होत्या. त्यांना ६ मुली झाल्या. सईबाईंच्या पोटी शंभूराजांचा जन्म झाला पण त्यानंतर अवघ्या ३ वर्षात सईबाई गेल्याचं दु:ख मात्र सलत राहिलं.

सोयराबाईंच्या पोटी राजाराम जन्मला. स्वाऱ्या-मोहिमा-मावळे-किल्लेदार-वकील यांनी राजगड गजबजून गेला. शिवबा बलाढ्य औरंगजेबाशी लढत होते. एक संपन्न राष्ट्र उभारत होते. अफझलखानाच्या वधाची बातमी ऐकल्यावर मात्र जिजाबाईंच्या डोळयातून अश्रूंचे लोट वाहिले. संभाजींच्या मृत्यूचा हिशेब शिवबांनी पूर्ण केला होता. सतत होणाऱ्या मुसलमानी हल्ल्यांमुळे राजगड सुरक्षित वाटेना, तेव्हा शिवरायांनी सुरक्षित ठिकाणी राजधानी हलवण्याचं ठरवलं. त्यासाठी महाडजवळचा रायरीचा डोंगर निवडला आणि रायगड ही कारभाराची जागा निश्चित केली. जिजाऊसाहेब रायगडला येऊन राहिल्या.

शिवरायांचे आग्र्यातील अटकेचे ६ महिने जिजाऊसाहेबांनी तळमळत काढले आणि ज्या दिवशी बैराग्याच्या वेषातील शिवबा त्यांच्या पायावर डोई ठेवून झुकले तेव्हा त्यांच्या मिठीत होतं ते फक्त शिवबा नावाचं त्यांचं एक लेकरू..त्यावेळी शिवाच्या स्पर्शाने आपल्याला परत पान्हा फुटेल की काय अशी भीती त्यांना वाटली होती..शिवाईने त्यांचं लेकरु परत सुखरूप आणून दिलं होतं. त्यातच सन १६६१ सालात, शहाजीराजांनी बंगलोरमधील कामातून परत एकदा फुरसत काढली आणि ते पुण्याला येऊन राहून गेले. त्यानंतर मात्र २ वर्षांनी सन १६६४ मधे अचानक शहाजीराजांच्या मृत्यूची बातमी त्यांच्या कानावर आली. शिमोग्याजवळच्या होदिकिरेच्या जंगलात शिकारीसाठी गेलेले शहाजीराजे, घोड्याचा पाय वेलीत अडकल्यामुळे खाली पडले आणि शहाजीराजांचा त्या अपघाताने कैलासवास झाला. पुण्यात बातमी येऊन पोचली. स्वराज्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. जिजाऊसाहेबांनी सती जाण्याचा निर्णय घेतला. शिवरायांना हे कळल्याबरोबर अतोनात दु:ख झालं.

त्यांनी माँसाहेबांचं मन वळवलं. त्या हट्टापायी सती जाणं रहित केलं. शहाजीराजे अनंतात विलीन झाले. जयदीप पंडित कवीने शहाजीराजांवर काव्य रचलं, त्यात लिहिलं की ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार पूर्व पश्चिमेला चंद्र-सूर्य आणि उत्तर-दक्षिणेला शहाजी, शहाजहाँची स्थापना जगदीशाने केली. या दोघांचे जन्म, सन १५९२ आणि सन १५९४, मधले, २ वर्षे अंतराने झाले. २३ जानेवारी १६६४ ला शहाजीराजे गेले, आणि २२ जानेवारी १६६६ ला शहाजहाँ वारला.

मातृभक्त महाराजांनी वृध्द जिजाऊंना पाचडमधे एक सुंदर बाग तयार करून वाडा बांधून दिला.जिजाबाईंच्या आयुष्यातील सर्वात तृप्त क्षण होता तो रायगडावरचा शिवप्रभूंचा राज्याभिषेकाचा दिन. त्यांचा शिवबा आता शिवाजीमहाराज या उपाधीने जगप्रसिध्द झाला होता. हिंदूंचं राष्ट्र व्हावं हे त्यांच्या पतीने आणि त्यांनी पाहिलेलं स्वप्न सत्यात उतरलं होतं. जिजाऊंच्या पोटी एक शककर्ता, युगकर्ता, जन्मला होता. तुळजाभवानीने त्या पुत्राला यशाचं वरदान दिलं होतं. देवगिरीच्या संपन्न, समर्थ यादव कुलात जन्मलेली, विद्या-कला-शौर्य-स्वाभिमान-धाडस-साहस-या गुणांनी संपन्न शहाजीराजांची पत्नी म्हणून रजपूतांच्या सिसोदिया घराण्यात गृहप्रवेश केलेली, लक्ष्मीकन्या जिजाऊ राजकन्या-राजपत्नी-राजमाता म्हणूनच जगली. शिवप्रभूंचा राज्याभिषेक सोहाळा पार पडला. तृप्त डोळयांनी जिजाऊसाहेबांनी १० दिवसांमधे १७ जूनला पांचाड या आपल्या वाड्यात स्वर्गारोहणाचा मार्ग धरला. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा म्हणणाऱ्या शिवप्रभूंच्या मातोश्री जिजाबाई याही श्रींचीच इच्छा होती. नाहीतर कसं जन्मलं असतं हे वीरांचं स्वराज्य...

पेशवा नानासाहेब द्वितीय.

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे नायक.

जन्म १९ मे १८२१.

नवजात बालकाच्या ललाटावर पाचवे दिवशी सटवाई लेख लिहून जाते म्हणतात..नव्हे, नियती प्रत्येक जीवाबरोबर एकेक सटवाई कायम देत असावी.. नाहीतर माथेरान डोंगरांच्या पायथ्याशी असलेल्या वेणू गावातील माधवराव भटांचा पुत्र पेशवे घराण्याचा वारस बनता ना. १९ मे १८२१ मधे माधवराव आणि गंगाबाईंना धोंडू हा पुत्र झाला. त्यानंतर लगेच माधवराव भटांनी विठूरची वाट धरली. सन १८१८ मधे शनिवारवाड्यावर इंग्रजी निशाण लागलं. बाजीरावांना कानपूरजवळ विठूरला हलवण्यात आलं. त्यातही इंग्रजांचा कावा होताच. इंग्रजांचा मोठा सैनिकी तळ कानपूरमधे होता. इंग्रजांची ८ लाखाची पेन्शन घेऊन वास्तव्याला असलेल्या दुसऱ्या बाजीरावांच्या पदरी माधवराव भटांनी आश्रय घेतला. माधवरावांच्या पुत्राचा, धोंडोनानाचा पेशव्यांना लळा लागला. सन १८२७ मधे शेवटी बाजीराव पेशव्यांनी ३ वर्षाच्या नानाला, आणि त्याच्या धाकट्या बाळासाहेब भावाला दत्तक घेऊन टाकलं. विठूरला इंग्रजांची पेन्शन खात बसलेल्या धाकट्या बाजीराव पेशव्यांना स्त्रियांची कमतरता नव्हती, पण पोटी औरस पुत्र कुणीच दिला नव्हता. धोंडोपंतनानासाहेब, त्यांची बालमैत्रिण छबेली-मोरोपंत तांब्यांची एकुलती एक कन्या मनकर्णिका आणि तात्या टोपे ब्रह्मावर्तात एकत्र वाढायला लागले. दोन मित्र तालीम घेत असतांना पाहून छबेलीही या पुरुषी तालमीत, मलखांब शिकण्यात तरबेज झाली.

त्याकाळात भरधाव घोडे दौडवण्यात नानासाहेब आणि छबिलीचा हात धरणारं कुणी नव्हतं अशी ख्याती झाली होती. गंगाधरपंत नेवाळकरांशी लग्न होऊन छबिली झांशीची राणी लक्ष्मीबाई बनून सासरी गेली. बाजीरावांच्या हाताखाली नानासाहेबही कारभारात रमले. लष्करी शिक्षणात प्रविण झाले. बाजीरावांच्या नकळत ते इंग्रजी शिकले. कानपूरातील इंग्रजी अधिकाऱ्यांशी त्यांचे आपुलकीचे संबंध होते. त्यांना राजवाड्यावर मेजवानीसाठी बोलावून बहूमूल्य भेटी देत. नानासाहेबांना इंग्रजांचे सारे शिष्टाचार, दरबारी रितीरिवाज माहीत होते. नानासाहेबांचा विवाह सांगलीकर चिंतामणआपा पटवर्धन यांच्या मामेबहिणीशी झाला होता. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत पराक्रम गाजवलेले मिरजेचे पटवर्धन, तेही मोठं सरदार घराणं होतं. मूळचा येवल्याचा पण बाजीरावांच्या पदरी आलेला, रघुनाथतात्या टोपे हा नानासाहेबांचा बालमित्र आणि एकनिष्ठ कारकून सेवक नानासाहेबांना तनमनाने साथ देत होता.

मैसूरच्या टिपू सुलतानाचा अंत करून मैसूरचा घास गिळल्यावर आणि शनिवारवाड्यावर आपला झेंडा लावल्यावर सत्ताधीश इंग्रजांचं मायावी रुप जाऊन त्यांची पाशवी नखं बाहेर आली. सारा भारत त्यांच्या हाताखाली आला होता. हिंदू रितीरिवाजांची, श्रध्दांची भर रस्त्यात उभं राहून मिशनऱ्यांकडून टवाळकी सुरु झाली. त्यातच शेतसारा भरमसाट वाढला, आजवर कोणत्याही राजाने गरीब जनतेकडून न घेतलेल्या मीठावरचा कर वाढला, त्याने शेतकरी वर्ग आणि गरीब जनताही गांजली. पूर्वीच्या राजांनी दिलेली दर्गा आणि देवस्थानं यांना दिलेली इनामं, देणग्या सरकारने काढून घेतली. हिंदू मुसलमानांना हीदन म्हणजे दगडधोंडे पुजणारे जंगली अशी टिंगलटवाळी सुरु केली. या

भारतवर्षाचा हिंदू धर्मच नाहीसा केला की राज्य करणं सोपं जाईल म्हणून त्यांनी धर्मांतराची सक्ती चालवली. त्या जखमेवर मीठ चोळलं गेलं. या धर्मांतरितांचा आपल्या वडिलोपार्जित स्थावर जंगम संपत्तीवरचा हक्क तसाच चालू राहिला हे धर्मांतर करणारांसाठी मोठं आमिष होतं. मिशनऱ्यांना प्रचंड पैशाची मदत सुरु झाली. इंग्रजी शाळा सुरु केल्या की एकही मूर्तीपूजक बंगालमधे राहणार नाही असं खुद्द मेकॉलेचंच मिजासखोर म्हणणं होतं. भारतातील नीळ, कापूस, खनिजं असा कच्चा माल इंग्लंडला जाऊ लागला आणि शेतकरी आणखीनच लुबाडले गेले.

दुसरीकडे वारस नसलेली संस्थानं गिळंकृत करण्याची भस्मासुराची पाशवी बुध्दी डलहौसीने सुरु केली. दत्तकाची परवानगी नाकारली गेली. त्यामुळे पूर्वजांनी पराक्रमावर आणि शौर्यावर मिळवलेलं संस्थान केवळ औरस वारस नाही म्हणून संस्थानिकांचे दत्तक घेण्याचे हक्क नाकारले गेले आणि जे दत्तक पुत्र सत्तेत होते, त्यांचीही मान्यता काढून घेतली गेली. याचा दूरगामी परिणाम म्हणजे राजप्रासादांमधील दास-दासी-शिपाई-आचारी-पाणके-असे अनेकानेक नोकर-चाकर निराधार झाले..त्यांचीही रोजीरोटी बंद झाल्यामुळे तोही अंगार फुलायला लागला. जनतेच्या रोषाने परमोच्च बिंदू गाठला तो सातारची गादी आणि राजे प्रतापसिंग याची मान्यता इंग्रजांनी काढून घेतली तेव्हा. तो काळच असा तापायला लागला होता. देशातलं वातावरण तंग झालं. बादशहा हा किताब काढून घेतल्यामुळे दिल्लीत बहादूरशहा जफरही अपमानित झाला. मिळून दिल्लीपासून तंजावर, नागपूर, बिहार, अयोध्या, लखनौ, अलाहाबाद, सर्व दिशांचे लहान मोठे संस्थानिक आणि राजे पेटून

उठले, रयतही संतापली आणि काडतुस प्रकरणामुळे हिंदी पलटणीही क्रांतीच्या पालखीचे वाहक ठरल्या. उत्तरेतील हे परकीयांचं चक्रीवादळ दक्षिण भारतातही अंधार करून व्यापून राहिलं होतं. दक्षिणेतही कोल्हापूरचे महाराज, नरगुंदचे भावे त्यात होरपळत होते. बाकी संस्थानंही आपलं वित्त आणि प्राण वाचवण्याच्या तयारीला लागली होती. त्या असंतोषाने क्रांतीकारक तरुणांच्या मशाली पेटायला लागल्या होत्या. प्राणांच्या आहुती या यज्ञात समिधा बनून पडायच्या तयारीला लागल्या होत्या.

या इंग्रजांना घालवून भारतमातेच्या मुक्तीसाठी सारा भारतवर्ष जीवावर उदार झाला होता.

सन १८५१ मधे विठूरला बाजीराव पेशव्यांचा कैलासवास झाला. तेव्हा नानासाहेबांना आपले वडील बाजीराव यांच्या ८ लाख रुपयांच्या पेन्शनवरचा गव्हर्नर जनरल डलहौसीकडून हक्क नाकारला गेला. दुसरे बाजीराव यांनी राज्यावरचा हक्क सोडण्याच्या मोबदल्यात ही पेन्शन इंग्रजांनी त्यांना दिली होती. तेव्हा नानासाहेब त्वेषाने उसळले. त्यांच्या अंगातील रग, धडाडी लाव्हा बनून उसळली. आपली राख झाली तरी चालेल पण इंग्रजांचीही राख करण्याचा त्यांनी निर्धार केला. संगतीला बाळासाहेब, रावसाहेब, तात्या टोपे असे शूर होतेच. नानासाहेब पेशव्यांनी आपला अत्यंत विश्वासू दिवाण मंत्री अझिमुल्लाखान याला न्याय मिळवावा म्हणून इंग्लंडला पाठवलं पण तिथे त्यांना सपशेल नकार मिळाला. सातारच्या गादीवरचा हक्क मागायला इंग्लंडला पोचलेल्या रंगोजीबापू गुप्ते यांनाही नकारच मिळाला. तिथेच रंगोजी बापू आणि अझिमुल्लाखान यांच्या एकत्र विचाराने क्रांतीचं बीज रुजलं. इंग्रजांच्या

अरेरावीला उत्तर द्यायचं ठरलं. कुशाग्र बुध्दी, अत्यंत मानी स्वभाव, तेजस्वी घारे डोळे आणि स्थूल अंगकाठीचे श्रीमंत नानासाहेब जनतेचेही लाडके होते आणि इंग्रजी अधिकाऱ्यांचेही आवडते होते. ३ लाख रुपये किंमतीची तलवार ते कमरेशी बाळगत असत. नानासाहेबांनी आपली गुप्तहेर संघटना कानपूर आणि विठूरमधे सुरु केली. कानपूरचा क्रांतीकारक नेता टिक्कासिंग ह्याच्या घरात गुप्त सभा होत आणि निर्णय घेतला जाई.

ब्रह्मावर्त हे गुप्त क्रांतीसंघटनेचं मुख्य केंद्र बनलं. १८५६ मधे नानासाहेबांनी अनेक राजांना भेटी दिल्या. दक्षिणेपर्यंत निरोपानिरोपी जाऊ लागली. जनता, वीर संघटित होऊ लागले. काश्मिर ते कन्याकुमारी आणि रंगून ते पेशावरपर्यंतचे सर्व राजे, जमीनदार, व्यापारी, एकत्र आले. सांकेतिक भाषेत पत्रं जाऊ लागली. झांशीची राणी, बिहारचे कुँवर जगदीश सिंह, अवधचे नबाब, कलकत्त्याचे अलि नक्की खाँ, आग्र्याचे मौलवी अहमदशहा, रुहेलखंडाचे शोभाराम, खान बहादूर खाँ, बख्तखाँ हे त्यातील मुख्य नेते होते. बहादूरशहा जफर हा वृध्द म्हणून त्याची बेगम झीनत महल आणि लखनौचा अल्पवयीन राजा म्हणून त्याची माता हजरतमहल य दोन स्त्रियाही या संघटनेत भाग घेत होत्या. ३१ मे १८५७ हा सार्वत्रिक उठावाचा दिवस निश्चित झाला. भिकारी, कीर्तनकार, यात्रेकरू, ज्योतिषी, जवाहिरे अशा विविध माध्यमांमधून भारतभर निरोपाची पाठवणी सुरू झाली. या प्रचंड रोषात भर पडली ती गाय आणि डुक्कर यांची चरबी लावलेल्या काडतुसांची. कारण ही काडतुसं तोंडाने तोडावी लागत. त्याने हिंदू आणि मुसलमान या दोन्ही सैनिकांची लष्करातही संतापाची लाट उसळली. या स्वातंत्र्य युध्दाची योजना विठूरमधे गुप्तपणे आखली गेली. श्रीमंत

नानासाहेबच त्या उठावाचे सूत्रधार होते. उत्तर-दक्षिणेकडचे सर्व राजे एकत्र आले. त्यानंतर श्रीमंत नानासाहेबांना रंगो बापूजी गुप्ते यांनी निरोप पाठवला की ज्या क्षणी उत्तरेत उठाव होईल, त्यादिवशी मीही माझी फौज घेऊन सामील होईन. शिपायांमधे लाल कमळं राष्ट्रभक्तीची आणि उठावात सामील होण्याची खूण म्हणून वाटली गेली. दुसरीकडे गावच्या चौकीदाराकडे आलेली गुप्त खूण असलेली चपाती ही संदेशाची खूण ठरली. इंग्रजांनी लगेच ती चपाती कुस्करून पाहिली. पण त्यात त्यांना काहीच गैर सापडलं नाही.

पण घोटाळा झाला. उठावाच्या ठरलेल्या मे ३१ तारखेच्या आधीच मिरतच्या छावणीत २९ मार्चला शिपायांचं काडतूसावरून बंड झालं. त्यात फाशी दिलेला मंगल पांडे मिरतच्या छावणीत ८ एप्रिलला शहीद झाला आणि संतापलेल्या शिपायांनी मिरतचा तुरुंग मोकळा केला. बंडाचा उठाव झाला. मिरतपासून अवघ्या ३२ मैलांवर असलेल्या दिल्लीकडे बंडखोर वाटचाल करायला लागले. तिथे पोचल्यावर या क्रांतीकारकांनी शेवटचा बादशहा याच्या नावाने निशाण उभारलं. इंग्रजांचं निशाण फाडून टाकलं. यामुळे इंग्रज सावध झाले. त्यांनीही फौज जमवली आणि हा उठाव मोडून काढण्याच्या तयारीला लागले. सर्व पत्रं पकडायला लागले. त्यांनी जाळपोळ धरपकड सुरु केली. ठिकठिकाणाहून मिरतला अचानक सुरु झालेल्या बंडाच्या बातम्या भारतभर पसरत होत्या, त्या विठूरलाही पोचल्या.

विठूरपासून कानपूर हे अवघ्या काही मैलांवर असलेलं इंग्रजांच्या लष्कराचं मुख्य ठाणं. एक दिवस संध्याकाळी विठूरात गंगेच्या काठी संध्येसाठी निवडक लोकांबरोबर नानासाहेब बसलेले असतांना, अत्यंत वेगाने,

घाबराघुबरा झालेला पलटणीतील एक अधिकारी, घोडेस्वार महाराजांजवळ आला. त्याने आणलेली बातमी सर्वांनाच हादरवणारी होती. दिल्लीपती बहादूरशहा जफर बादशहाला देशाचं अधिपत्य देऊन, बंडखोर सैनिक कानपूरवर चाल करून येत असल्याची ती खबर ऐकून सर्वच सर्द झाले. वातावरण एकदम तणावाचं झालं. ताबडतोब रात्री गुप्त बैठक झाली. कानपूरच्या क्रांतीकारकांचा नेता टिक्कासिंगही त्या सभेला उपस्थित होता. तेव्हाच रणनीती ठरली. शिवाजीमहाराजांचा गनिमीकावा..शत्रूच्या आमंत्रणावरून शत्रूच्याच गोटात प्रवेश मिळवायचा. मिरतची बातमी आणणाऱ्या पलटणीतील अधिकाऱ्याने महाराजांना गळ घातली की हिंदू धर्माच्या रक्षणासाठी नेतृत्व स्वीकारावं आणि तलवार घेऊन कानपूरावर चलावं. नानासाहेब हतबुध्द होऊन एक क्षणभर स्तब्ध झाले.

त्या क्षणी श्रीमंत उत्स्फूर्तपणे म्हणाले, "ठीक आहे! धर्मासाठी हजारो बायका पोरे मरत आहेत, तेव्हा मीही माझ्या बायकापोरांची आशा सोडतो, यांस गंगामातुश्री साक्ष आहे." असं म्हणत नानासाहेबांनी आवेशाने घोड्यावर स्वार होऊन राजवाडा गाठला. राजवाड्यात येऊन आपले बंधू, पुतणे, साथीदार यांच्यासकट कानपूरला जायचं ठरलं. गुप्तपणे त्यांनीच चालवलेल्या कारस्थानात त्यांनी प्रगट रुप घेतलं.

स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या ग्रंथात लिहितात त्याप्रमाणे, महायुध्दाच्या वेळी कृष्णाने अर्जुनाला दिलेला आदेश त्यांना ऐकू यायला लागला. उठ, युध्दाला तयार हो. तस्मात युध्दाय युजस्व ॥

नानासाहेब पेशवा – कानपूरमधे.

भाग २.

मिरतचे बंडवाले कानपूरात पोचणार हे कळल्याबरोबर, श्रीमंत नानासाहेब कानपूराकडे निघाले. कानपूरात पोचल्यावर तिथल्या कलेक्टर सर व्हीलरने इंग्रजांचं आणि कानपूरचं रक्षण करण्याची जबाबदारी आपले मित्र नानासाहेब श्रीमंतांवरच टाकली आणि आपला सगळा खजिना, दारूगोळा, आणि फौज त्यांच्या हवाली केला. कानपूर हे इंग्रजांचं सैनिकी ठाणं असल्यामुळे कानपूरात दिल्लीला गेलेले बंडखोर येतील आणि आपल्याकडेही बंड होईल याची भीती इंग्रजांना वाटली होती. दोन तोफा, ३०० शिपाई आणि थोडं घोडदळ बरोबर नेऊन इंग्रजांच्या कानपूरच्या उत्तरेकडील छावणीतच नानासाहेबांनी मुक्काम केला. त्यामुळे श्रीमंतच पुढील क्रांतीचे सूत्रधार आहेत ही शंकाही कानपूरातील इंग्रजांच्या मनाला शिवली नाही.

४ जून १८५७ - कानपूरात नानासाहेब पेशव्यांनी सूत्रं हाती घेतली आणि आपण बहादूरशहाचे अनुयायी आहोत हे घोषित केलं. त्यामुळे इंग्रज अधिकारी घाबरले. युध्दनियमांप्रमणे ५ जूनला श्रीमंत नानासाहेबांनी छावणीतून, कानपूरातील जनरल व्हीलरला पत्र पाठवून आम्ही उद्या सकाळी ९ वाजता कानपूरावर हल्ला करणार आहोत असं कळवलं. त्याप्रमाणे ६ जूनला, सर्व सैनिक. सुभेदार टिक्कासिंगच्या नेतृत्त्वाखाली इंग्रजांवर तुटून पडले. मोठी कत्तल सुरू झाली. कानपूर पेटायला लागलं. भेदरलेल्या सर्व इंग्रजांना नानासाहेब हाच क्रांतीकारकांचा नेता आहे हे तेव्हाच उमगलं. पहिल्या आठवड्यात नानासाहेबांनी कानपूर शहरावर ताबा मिळवला. नानासाहेबांनी मग आपला

तळ सावदा कोठीत हलवला. सर्वत्र जाळपोळ झाल्यावर टिक्कासिंग आपल्या ३००० फौजेला घेऊन नानासाहेबांना भेटायला नबाबगंज मधे आला. सर्व उपस्थित वीरांनी नानासाहेबांना आपला राजा म्हणून जाहीर केलं. आणि टिक्कासिंगला आपला सरसेनापती म्हणून निवडलं. कानपूर हे उत्तर-दक्षिण आणि पूर्वेला जाणाऱ्या हमरस्त्याचं मुख्य ठाणं असल्यामुळे नानासाहेबांना ते हातून जाऊ द्यायचं नव्हतं. इंग्रजांचे बंगले पेटायला लागले तेव्हा आपल्या कुटुंबियांना घेऊन इंग्रज आपल्या गढीकडे आश्रयाला पळाले. शिपायांना ती बातमी कळताच गढीवर हल्ला करणासाठी त्यांचे हात शिवशिवायला लागले. दुसरे दिवशी क्रांतीकारकांनी गढीला वेढा दिला. तोफांचे गोळे गढीवर आदळायला लागले. जूनचा कडक उन्हाळा आणि त्यात गोळयांची आग. गढीत १००० इंग्रज लोक होते. त्यातील मुलांनी अन्नपाण्याविना आधीच प्राण सोडले होते. तिथल्या काही स्त्रिया जळून मेल्या. मोठी मनुष्यहानी होऊ लागली. त्यातच सर व्हीलरचा मुलगाही तोफेच्या गोळयाने गतप्राण झाला. पण हार न मानता व्हीलर चिवटपणे झुंजत राहिला.

तोपर्यंत नानासाहेबांकडे ४००० फौज जमली. त्यांच्या तोफखान्यातील अनुभवी म्हातारे तोपची नेम धरून गोळे उडवायला लागले, तेव्हा आपले घुंगट आणि बुरखे फेकून गावातील स्त्रियाही मागे राहिल्या नाहीत, त्याही या झुंजीत सामील झाल्या. कानपूरातील नामवंत नृत्यांगना अझीजानसुध्दा घोड्यावर बसून शिपायांना प्रोत्साहन देऊ लागली. किल्ल्यातील इमारतीही जळायला लागल्या. २३ जून १८५७ तारीख उजाडली. क्रांतीकारकांना १०० वर्षांपूर्वी याच दिवशी प्लासीत झालेल्या आपल्या पराभवाचा बदला घ्यायचा होता,

म्हणून तो दिवस मोठा हल्ला करण्यासाठी निवडला गेला पण या हल्ल्यात यश आलं नाही.२५ जूनचा दिवस उजाडला. इंग्रजांचं पांढरं निशाण किल्ल्यावर फडकलं. शस्त्रे खाली ठेवून ते शरण आले होते. अझीमुल्लाखान आणि ज्वालाप्रसाद यांनी तहावर स्वाक्षरी केली. त्याप्रमाणे २७ जूनला शरणार्थींना अलाहाबादला जाण्याची परवानगी आणि व्यवस्था करण्यात आली. त्याच रात्री तात्या टोपेने कानपुरात गंगेच्या सतीचौरा घाटावर ४० नावा इंग्रजांसाठी तयार करुन ठेवल्या. या नावांच्या गवती छपरांमधे गुप्तपणे. क्रांतीकारकांनी स्फोटकं लपवली होती.

२८ जूनला श्रीमंत नानासाहेबांनी मोठा दरबार भरवला. हजारो देशप्रेमी जमले. नानासाहेब, बहादूरशहा जफर आणि तात्या टोपेंच्या सन्मानासाठी तोफा झडल्या. कानपूर विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी सर्व शिपायांसाठी एक लक्ष रुपये वाटण्यात आले. उठाव यशस्वी करून नानासाहेब कानपूरहून विठूरला आले. मोठ्या थाटात मिरवणूक निघाली. श्रीमंत नानासाहेब पालखीत बसले होते, आणि त्यांचे बंधू बाळासाहेब आणि पुतणे रावसाहेब अंबारीत होते. मागेपुढे हजारो सैनिक, स्वार, पुढे चौघडा, ताशे, वाजंत्री, चंद्रनळे, भुईनळे यांच्या प्रकाशात दिमाखदार विजयी मिरवणूक विठूरास राजवाड्यावर आली. फुलं, दुर्वा उधळून नागरिकांनी त्यांचं अपूर्व स्वागत केलं. राजवाड्यात आल्यावर महाराजांनी दुसरे दिवशी सर्व शूरांचा, विद्वानांचा, दक्षिणा, शालजोड्या आणि धोतरजोड्या देऊन मोठा सत्कार केला. शहरात आनंदोत्सव सुरु झाला. नाच तमाशे रंगायला लागले. शहराच्या संरक्षणाची काळजी म्हणून कानपूरच्या गंगेवरील धृव घाटावर तोफा सज्ज ठेवल्या होत्या. नानासाहेबांनी

१ जुलै १८५७ यादिवशी पेशव्यांच्या सिंहासनावर बसून विठूरमधे राज्याभिषेक करुन घेतला.

त्याचवेळी बनारस अलाहाबादहून आलेले हजारो क्रांतीकारक कानपूरात एकवटले. त्यांची घरेदारे आणि बायका, मुले इंग्रजांनी जाळून आणि मारून टाकली होती. पाळण्यातील बाळालाही मारुन टाकणाऱ्या इंग्रजांचा त्यांना सूड घ्यायचा होता. त्यामुळे कानपूरातील इंग्रजांची बायकामुले सुखरूप जाणार हे त्यांना सहन झालं नाही. त्यांनी कत्तलीची भाषा सुरु केली. २७ जूनचा दिवस उजाडला. किल्ल्यातील इंग्रज बायका मुले कुणी पालखीतून, कुणी चालत गंगेवरील सतीचौरा घाटाकडे, गंगेच्या वाळवंटात येऊ लागली. कडेकोट बंदोबस्तासाठी नानासाहेबांचं घोडदळ,पायदळ गंगेच्या काठी जमा झालं होतं. शरणागतांना पाहायला गावकरीही जमले. तात्या टोपे, अझीमुल्लाखान, नानासाहेबांचे बंधू बाळासाहेब नदीजवळच्या देवालयाच्या गच्चीत उभे राहून हे दृष्य पाहात होते.

सकाळचे १० वाजले होते. चिडीचूप शांततेत, गंभीर वातावरणात, इंग्रजांच्या सगळया नावा भरल्या. तात्या टोपेंनी नावा सोडण्याची खूण केली. नावा सुरू झाल्या आणि थोड्या पुढे गेल्या इतक्यात कर्कश्य वाटेल असं बिगुल वाजलं. त्याबरोबर काठावरच्या शिपायांनी गंगेत उड्या मारून नावांना आगी लावणं सुरु केलं. काहींनी बेछूट गोळीबार सुरु केला. आधीच पेरून ठेवलेल्या स्फोटकांमुळे नावा पेटायला लागल्या. अग्नी सगळं जाळायला लागला. किडामुंगीसारखी जखमी माणसं गंगेत बुडली, काही ठार होऊन पडली, काही जळून मेली. पवित्र गंगा गोऱ्यांच्या रक्ताने लाल होऊन गेली. श्रीमंतांच्या

कानावर राजवाड्यात ही बातमी गेली. पुरूषांना फक्त मारा, बायका मुलांना बाहेर काढा असा हुकूम झाला. मग सर्व स्त्रियांना आणि मुलांना जीवदान देण्यात आलं. त्यांना कानपूरातच सावदा कोठीमधे ठेवण्यात आलं. जिवंत इंग्रजांना रांगेत उभं करुन गोळया घालून ठार करण्यात आलं. १००० गोऱ्यांमधले ४०० इंग्रज, १२५ स्त्रिया आणि २५ मुलं फक्त जीवंत राहिली. हिंदू बायकामुलांना जाळणाऱ्या इंग्रजांच्या बायकामुलांना वाचवून इंग्रजी क्रूरतेला नानासाहेबांनी असं उत्तर दिलं.

एक दिवस प्रयागकडे जाणारी आगबोट गस्तीच्या शिपायांना दिसली. त्यात ६०/७० लोक होते. शिपायांनी गोऱ्यांना मारून टाकण्याचा हुकूम श्रीमंतांना विचारला. त्या बोटीत बायका मुले असल्याने महाराजांनी त्यांना जाऊ द्यावे असा आदेश दिला. पण ती बोट गंगेतून जातांना नेमकी गंगेच्या वाळूत अडकली. गंगेवर वाळूचा असाच खेळ चाले. अचानक प्रवाहात वाळूचे ढीग बनत. ही बोट मोठी असल्याने त्यात अडकली, तेव्हा बोटीतले पुरुष नाव ओढण्यास खाली उतरले. आता मात्र शिपायांनी या शत्रूंना उडवण्याची संधी साधली आणि तोफेचा गोळा टाकला. काही बायका आणि मुले वाचली, बाकी पुरूष जळून ठार झाले. जे वाचले त्यांना मारण्यात आलं. त्या बायका मुलांना कैदी बायका होत्या तिथेच आणलं. ज्या बंदिशाळेत त्यांना ठेवलं होतं, त्याला बिबिका घर नाव होतं.

या सर्व स्त्रियांना पहारेकरी रोज सकाळी प्रातर्विधीसाठी गंगेच्या वाळवंटात नेत असत. तिथे एका इंग्लीश बाईने एका जमादारणीला २ मोहरा देऊन फितवलं. आपलं पत्र प्रयागला पोचवण्याचं काम तिला दिलं. दुसरे दिवशी

सकाळी सगळे गंगेच्या वाळवंटात गेले असतांना त्या इंग्रजी बाईने एक पत्र मुद्दाम तिथे टाकलं, ते जमादारिणीने उचललं. ते पत्र उचलत असतांना एका शिपायाने पाहिलं आणि श्रीमंतांसमोर तिला आणून उभं केलं. २५ चाबकाचे फटके मारल्यावर त्या बाईने सर्व हकीकत सांगितली. नानासाहेबांनी ते पत्र इंग्रजी येणाराकडून वाचून घेतलं. त्यात तिने इंग्रजी अधिकाऱ्यांना कळवलं होतं की इथे ब्रह्मावर्तात कानपूरातील विजयामुळे, सर्व लोक नाच गाणी तमाशात दंग आहेत. फौजेचा बंदोबस्तही ठीक नाही. हीच वेळ हल्ला करायला योग्य आहे. हे कळल्याबरोबर सर्व लोक खवळले आणि सर्व स्त्रियांना मारून टाकण्याची आज्ञा मागितली पण श्रीमंत नानासाहेबांनी फक्त फितूर बाईस तोफेच्या तोंडी देण्याची आज्ञा केली. पण कुणी ऐकलं नाही. बंदिशाळेच्या प्रमुख अझीजानने लखनौहून मुद्दाम मोठे सुरे घेतलेले खाटीक आणवले आणि सर्वच्या सर्व बायकामुलांना कापून काढलं. रक्तमांसाच्या थारोळयात बिबिका घर भीषण झालं. या मृत देहांनी शेजारच्या विहिरी गच्च भरल्या.

क्रांतीकारकांच्या या विजयाचा आणि इंग्रजांच्या कत्तलीचा समाचार अलाहाबादेत कॅनिंग यांना मिळाला. कॅनिंगने आपली राजधानी आता पेटलेल्या मुलूखाच्या बंदोबस्तासाठी कलकत्त्याहून अलाहाबादलाच हलवली होती. त्यांनी लगेच नीलच्या जागी हॅवेलोकला कानपूरात पाठवलं. बरोबर भरपूर युध्दसाहित्य दिलं. तेवढ्यात फत्तेपूरावर रेनॉल्ड चालून येत आहे ही बातमी आल्याबरोबर नानासाहेबांनी आपली फौज त्याच्यावर पाठवली. तिथे क्रांतिकारकांचा पराभव झाला. हॅवेलॉक फौज घेऊन कानपूरावर आल्याची बातमी नानासाहेबांना मिळाली. त्यांनी आपली खास माणसे, लालपरिबुवा,

जळका रामभाऊ आणि मुख्य तात्या टोपे यांना पुढे पाठवून स्वत:ही जायची तयारी केली. लगेच त्यांनी कानपूराकडे आपले घोडे फेकले. नानासाहेबांच्या फौजेची आणि इंग्रजी फौजेची झुंज सुरु झाली. दोन्ही फौजांची तयारी सारखीच होती. पण इंग्रजी लष्कराची शिस्त हा मोठा गुण आपल्या फौजेला नव्हता. दोन्हीकडे शौर्यालाही तोड नव्हती. सूर्यास्त झाल्यावरही मशाली, चंद्रनळयांच्या उजेडात युध्द चालूच राहिलं. लढणारे सैनिक तहान भूक झोप विसरले. आपलं लढणं झालं की लढता लढता मागे येत, साखरपुरी खाऊन पोट भरत, भिस्त्याच्या ओंजळीतून त्याच्या पखालीतलं पाणी पिऊन परत लढाईत भाग घेत होते.

बघता बघता १० दिवस ही धुमश्चक्री चालू होती. अकरावे दिवशी मात्र दैवाचा फासा उलटला. एकाएकी जोराचा वारा सुटला. शत्रूकडून येणाऱ्या तोफांचा धूर क्रांतीकारकांच्या डोळयांमधे शिरून त्यांना काहीही दिसेनासं झालं. त्यामुळे लढाई बिघडली. सैनिक रण सोडून पळू लागले. तेव्हा इंग्रजांनी तोफा पुढे आणून जोरदार हल्ला चढवला. बाळासाहेबांनी तोफा चालवण्याची शिकस्त केली. पण सैनिक पळू लागले तेव्हा नानासाहेब आणि रावसाहेब तिथे आले. आपण परत सैन्य जमवून परत येवू आता माघारी जाऊ असं सांगून बाळासाहेबांना घेऊन रणांगणातून बाहेर पडले. लढाई थांबली. नानासाहेबांच्या सैन्याचा मोड झाला. कानपूर शत्रूच्या हाती पडणं ही दैवगती होती. इंग्रजांनी कानपूर लुटून साफ केलं. निरपराध रयत शत्रूच्या बंदुकीची बळी ठरली. हॅवेलॉकने गावातील ब्राह्मणांना पकडून जिथे इंग्रजी बायका मुलांना ठार करण्यात आलं होतं, तिथल्या जमिनीवरचं रक्त चाटायला लावलं आणि

ख्रिश्चनांचं रक्त जीभेला लागलेले ते धर्मभ्रष्ट झाले या सूडाच्या राक्षसी आनंदात नंतर या ब्राह्मणांना फाशीला लटकवून मोकळे झाले. दैत्यांनी भेसूर संहारच मांडला होता. प्रत्येक संस्थानात विजयानंतर इंग्रज विजन घडवत तसं विजन कानपूराही घडलं. ५ वर्षे ते ८० वर्षांपर्यंतचे पुरुष कापले गेले. तुर्की क्रूरतेएवढेच इंग्रजही क्रूर होते.

दैवगतीमुळे पराभूत झालेल्या नानासाहेबांना विठूरची वाट धरावी लागली. ते गावात पोचले तेव्हा गाव निद्राधीन झाला होता. रात्र भरून आली होती. ब्रह्मावर्तावर झोपेचा अंमल चालू झाला होता, पण काही तरूण कानपूरकडून येणाऱ्या बातमीची वाट पाहात गावाबाहेरच्या पारावर थांबले होते. तेवढ्यात त्यांना धुळीने भरलेले, रक्ताळलेले कपडे घातलेले श्रीमंत, बाळासाहेब, रावसाहेब दमलेल्या घोड्यांवर दिसले आणि त्यांच्या काळजात चर्र झालं. आता पुढचं संकट त्यांना क्षणात उमगलं. इंग्रजी फौजा विठूरवर येणार हे अंधारातही लख्ख दिसलं. नानासाहेब वाड्यावर आले. आता पुढची योजना आखायची होती. गावकऱ्यांचे, आपले प्राण वाचवायचे होते. जाळपोळ, लुटालूट होणारच होती. या धक्कादायक बातमीने हादरलेला सारा गाव जागा झाला. रात्र भेदरलेली, भेसूर झाली. जो तो आपलं गाठोडं बांधून वाट फुटेल तिथे निघायच्या तयारीला लागला. आपण परत येवू या आशेने काहींनी आपलं सोनं नाणं, जमिनीत, विहिरीत लपवायला सुरुवात केली. सगळा गाव भकास झाला. खणत्यांनी विस्कटला. मग रिकामा झाला.

विठूर – नानासाहेब पेशवा.

भाग ३.

कानपूरातील लढाईतून माघार घेऊन, श्रीमंत नानासाहेब वाड्यावर आले. आपल्या कुटुंबियांना त्यांनी परिस्थितीची जाणीव करुन दिली आणि ताबडतोब गंगा पार करुन लखनौच्या बेगमेच्या मुलखात जायची सिध्दता करायला सुरुवात केली. त्यांनी आपला बहूमोल जरीचा शेला पसरला. त्यात घराण्याच्या वैभवाच्या दुर्मिळ, मौल्यवान वस्तू ठेवायला सुरुवात केली. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्यावेळी समर्थ रामदासांनी त्यांना आपल्या छाट्या (वस्त्रं) भेट म्हणून दिल्या होत्या. त्या थोरल्या शाहूराजांनी भेट म्हणून पेशव्यांना दिल्या होत्या. त्या अमूल्य पूजनीय भेट नानासाहेबांनी शेल्यात ठेवल्या. थोरल्या माधवरावांचं वडाचं दुर्मिळ फूल घरात होतं ते घेतलं. देवघरातील दक्षणावर्त शंख, सुंदर कांतीचा बाण त्यात ठेवला. खजिन्यातील दुर्मिळ रत्नं गरज पडेल तेव्हा विकण्यासाठी म्हणून निवडली. हे सर्व वैभव एका क्षणात मूल्यहीन झालं होतं. या घटकेला राजघराण्यातील प्रत्येक जीव लाख मोलाचा होता. घराण्यातील कुणीही शत्रूच्या हाती न पडणं हे घराण्याचं वैभव होतं आणि इंग्रजांच्या हातून मारलं न जाणं ही पेशवेकुलाची अक्षय कीर्ती होती.

ज्या वास्तूमधे अष्टौप्रहरी हुजरे मुजरा घालत होते, सिंहासनावर बसून श्रीमंत न्यायनिवाडा करत होते, सोन्याच्या थाळीतून पक्वान्नांचं भोजन करत होते, चांदीच्या झारीतून सुगंधी पाण्याने हात आचवत होते, ते सारं आजवर भोगलेलं वैभव एका प्रहरात संपलं होतं. आता जेवणासाठी वेळ घालवायलाही अवसर नव्हता. भूकेची आठवणही नव्हती. आज फक्त जीव प्यारा होता.

चांदीच्या देव्हाऱ्यातील देवांना नमस्कार करुन मशालींच्या उजेडात नानासाहेबांनी आपल्या कुटुंबासह राजप्रासादाबाहेर पाऊल ठेवलं. जे वैभव पूर्वाजांनी उभं केलं होतं, जी दिगंत कीर्ती एकापेक्षा एक भट घराण्यातील पेशव्यांच्या वंशजांनी मिळवली होती, त्या भट घराण्याचे वासे आता फिरले होते पण तेही अभिमानाने उर भरून यावा अशा कारणासाठीच, आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठीच. महाप्रतापी शिवरायांचा रायगड बादशहाने जाळून टाकला. खजिना लुटला गेला, तिथपासून प्रतापसिंह महाराजांपर्यंत सर्वांचा हक्क नवीन शत्रूकडून, इंग्रजांकडून, नाकारला गेला. मायभूमी गडद अंधारात सापडली होती. तिला परत सन्मानाने मुक्त करण्यासाठी नानासाहेबांसारखेच अनेक राजे, राण्या आणि पराक्रमी तरूण गनिमांशी लढत होते. यशाची वाट न पाहाता, आपलं सर्वस्व तन-मन-धन अर्पून रानावनात, काट्याकुट्यात उपाशी पोटी हिंडत, हिंमत न हारता, गुप्त मसलती करत होते. प्राण देत होते.

नानासाहेब, बाळासाहेब, रावसाहेब, तीनही पेशव्यांचे वारस भरल्या नेत्रांनी, वाड्याकडे पाहात, गंगेकडे चालायला लागले. हजारोंचा पोशिंदा वाडा स्वत:च अनाथ बनला होता. श्रीमंत नानासाहेब, आपली ३ लाख रुपये किंमतीची तलवारही वाड्यात टेबलावर विसरले होते. आज प्रथमच असं घडत होतं की पेशव्यांच्या कमरेला तलवार नव्हती. ज्या पावलांना पालखीतून चालत जाणं आणि उतरतांना पायाशी पसरलेल्या गालिचावर पाय ठेवणं माहीत होतं ती पावलं जमिनीवर जलद पडत होती.. हॅवेलॉकची फौज कधीही हल्ला करायला येणार होती. श्रीमंतांना निरोप द्यायला सारा गाव गच्च काळोखात गंगेच्या तीरावर जमला. सर्वांचे डोळे पाण्याने भरले होते. काय ही वेळ आली

होती. हीसुध्दा श्रींचीच इच्छा असावी. सर्वांना श्रीमंतांबरोबर येण्याची इच्छा होती पण नानासाहेबांनी सर्वांना नकार दिला. मात्र त्यांचा शिष्य राघोबा, हट्टाने त्यांचं न ऐकताच त्यांच्या नावेत चढला. लहानपणापासून अनाथ राघोबाचा, श्रीमंतांच्या अन्नावरच पिंड पोसला होता.

गंगेवर आल्यावर गंगेची आरती करून, श्रीमंतांनी गंगेला पैठणी आणि हिरवा खण अर्पण केला आणि आपल्याला सुखरुप परतीरावर पोचवण्याची प्रार्थना केली. ते पहिल्या नावेत बसले. त्यांच्या पाठोपाठ दुसऱ्या नावेत त्या तिघांच्या स्त्रिया आणि बाजीरावसाहेबांची पत्नी आणि त्यांची औरस कन्या चढली. त्या पाचजणींची नाव भरल्यावर, तिसऱ्या नावेत बाळासाहेब आणि रावसाहेब चढले. तिघांच्या नावा सुरू झाल्या तेव्हा तीरावरच्या प्रजेने दु:खाने हाहा:कार केला. बोटी सुरू झाल्यावर मुख्य प्रवाहात नावा आल्या, तेव्हा रावसाहेबांनी नावेतल्या मेणबत्त्या विझवून टाकल्या. नावेच्या कोळयालाही उतरुन जायला सांगितलं. तीनही नौका आता अंधारात, कधीतरी या भारतमातेच्या लाजिरवाण्या गुलामी जिण्याचा अंत होईल या आशा उजळवत त्या प्रकाशात लखनौच्या दिशेने वाहात जाऊ लागले. लखनौच्या बेगमेकडे आधीच गुप्तपणे निरोप पाठवलेला होता.

नावांमधला अंधार पाहिल्यावर काठावर जमलेली प्रजा हे सर्व बुडाले या भावनेने आक्रोश करून रडायला लागले. त्यांच्या दु:खाला सीमा नव्हती. नाव पुढे गेल्यावर नानासाहेबांनी शेल्यातील सर्व दागिने काढले आणि गंगेला अर्पण करून टाकले. जी पेशवाईच उरली नाही तिथे हे बहुमोल रत्नहार तरी काय मोलाचे? नाव तशीच पुढे जात राहिली. काही वेळाने नाव पलिकडल्या तीरावर

आली पण तिथे घाट नव्हता. काळ्याकुट्ट अंधारात काही दिसतही नव्हतं. पण आता उतरणं भाग होते. नावेतून उतरून सर्वांनी जमिनीवर पाऊल टाकलं ते चिखलात पडलं. सगळेजण एकमेकांचा हात धरत तो चिखल तुडवत चालायला लागले. कुठे पाऊल रुतत होतं, तर कधी पोटरीभर चिखलातून पाय ओढून काढावा लागत होता. एकदा दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलं की भाळी हमरस्तासुध्दा लिहिलेला नसतो हे सत्य जाणून सर्वजण कोरड्या जमिनीची वाट पाहात आणि झुंजुमुंजू होण्याकडे आभाळाकडे पाहात चालत होते. अंगावरच्या वस्त्राशिवाय दुसरा कपडा कुणाकडेच नव्हता. नदीकाठचं थंड वारं अंगाला झोंबत होतं. पण सारं राजघराणं या निसर्गाशी ओळख करून घेत चालत राहिलं. काहीवेळाने चिखल संपला. कोरड्या जमिनीवरून सर्वजण गावाचा रोख धरुन चालायला लागले आणि त्यांना एक हनुमंताचं देऊळ दिसलं. तिथे मारुतराया त्यांची वाट पाहात उभा होता. मोठी भाग्याची गोष्ट ही होती की सर्वजण लखनौच्या सीमेत आलेले होते.

भाग ३- काही तासांपूर्वी राजा असलेले आणि आता रंक झालेले, थकलेले, भागलेले, चिखलाने मळलेले, ते उपाशी अकरा जीव देवळाच्या आवारात येऊन जमिनीवर बसले. सर्व काही मातृभूमीच्या दास्याच्या बेड्या तोडून टाकण्यासाठी झालं होतं. पण अजून दुर्दशा संपली नव्हती. देऊळ अत्यंत जुनं होतं. उखडलेल्या फरशीमुळे, खाचखळग्यांनी भरलं होतं. सपाट जमीन कुठेच नव्हती तशा जमिनीवरच सगळ्यांनी देह ठेवलं. मग सर्वांच्या लक्षात आलं की आपल्याला तहान लागली आहे. गडद अंधारात शोधाशोध सुरु केली तेव्हा राघोबाला देवळाच्या आवारात एक विहीर दिसली पण त्याला दोर पोहरा,

घागर काहीच नव्हतं. प्राक्तनाची परीक्षा चालूच होती, पण सटवाईने आपल्या अपत्याची काळजी घेऊन, त्यांच्याबरोबर राघोबा नावाचा मदतनीस दिला होता. राघोबाने नानासाहेबांचं उपरणं, बाळासाहेबांचा रुमाल यांची गाठ बांधून विहिरीत सोडला आणि ते भिजलेलं वस्त्र जे पाणी घेऊन आलं ते सर्वांच्या ओंजळीत पिळून त्यांची तृष्णा भागवली. मग सारे त्या ओबडधोबड जमिनीवर सतरंजीविनाच झोपले.

अतिश्रमाने सर्वांना त्या जमिनीवरच अंथरूण पांघरूणाशिवाय झोप लागली. अंगाखालचे खडेसुध्दा सहन करावे लागले. पुरुषांच्या अंगावर दोन कपडे आणि डोक्याचा रुमाल एवढेच कपडे आणि राजस्त्रियांच्या अंगावरचं लुगडं एवढंच होतं. त्या वस्त्रांवरच रात्रीची थंडी सहन केली होती. सकाळी सर्वजण नदीवर गेले. प्रातर्विधी उरकून परत देवळात येऊन बसले. आयुष्यभर पंचपक्वान्न खाल्ली चांदीच्या थाळीपेल्याशिवाय दुसरा धातू माहीत नाही अशा त्या राजयोगींना आज खायला अन्न नव्हतं. धान्य विकत घ्यायला फुटका पैसा नव्हता. सर्वजण दु:खी चेहऱ्याने बसलेले असतांना राघोबा तिथे आला. आणि त्यांना म्हणाला की महाराज, तुम्ही दु:खी होऊ नका. योगायोगाने माझ्या बंडीच्या खिशात एक रुपया मिळाला आहे, त्याचं मी धान्य आणतो आणि काहीतरी जेवण करतो.

नानासाहेबांना त्या क्षणी परमेश्वराचा साक्षात्कार झाल्यासारखं वाटलं. ते त्याला गदगदीत स्वरात म्हणाले की तुला आमच्या दु:खात सहभागी करुन घ्यायचं नव्हतं म्हणून तुला मी नको येऊस म्हणत होतो तर तुला परमेश्वरानेच पाठवलंय असंच मला वाटतंय..आज तो एक रुपयाही त्या सर्वांना

जामदारखान्यातील रुपे, रत्नांपेक्षा मौल्यवान बनला कारण त्यामुळे त्यांची भूक भागणार होती. मग राघोबा गावात गेला. त्या एक रुपयात कणिक, तूप, मीठ, डाळ, सैपाकासाठी, पाण्यासाठी मडकं, पिण्यासाठी लहान मडकी, चूलीसाठी लाकडं, आणि थाळया घेऊन आला. मग वरण शिजवून कणकेचे गाकर करुन ठेवले. जेवणाआधी सर्वांना स्नान करायचं होतं, पण कपडे नव्हते. बायकांची तर स्नानाची फारच पंचाईत झाली. त्यावेळी विहिरीवर पाणी भरण्यास आलेल्या गावातील स्त्रियांच्याही डोळयात पाणी आलं. कशीबशी स्नानं करून सर्वजण जेवायला बसले. पण ती गाकर ते वरण त्यांच्या घशाखाली जाईना. कधी माहीतच नव्हते हे जिन्नस त्यांना. दैवाची मर्जी फिरली की काय होतं त्याचा अनुभव ते ११ जण घेत होते.

तेवढ्यात गावच्या मामलेदाराला हनुमंताच्या देवळात कुणी वाटसरू उतरले आहेत ही बातमी लागली. लोकांनी माहिती दिली की सगळे लोक मोठ्या घराण्यातले वाटतात, पण जवळ पिण्यालाही भांडं नाही, स्त्रियांच्या अंगावर फक्त नेसतं वस्त्र आहे, पण त्यांच्या नाकात हिऱ्याच्या नथी आहेत. मामलेदार धावत जुन्या पुराण्या हनुमंताच्या देवळात आले. कानपूरची लढाई पेशवे हरले आहेत, ते लखनौला आमच्या आश्रयाला येणार आहेत, गावात नवखे कुणी दिसले तर पेशवे असतील तर त्यांची काळजी घ्या, असं लखनौच्या बेगमेचं पत्र आलं होतं ते आठवलं. त्यांच्याशी बोलणी झाल्यावर हे पेशवेच आहेत याची मामलेदारांना खात्री झाली. ते गढीत परत गेले. येतांना पालखी, घोडे, मेणे, वस्त्रे, घेऊन आले. त्यांना सन्मानाने गढीत नेऊन आचारी, पाणके, हुजरे सर्व काही लवाजमा करुन दिला. बेगमेलाही पत्राने मजकूर कळवला. वैरी

रात्र संपली होती. पण आव्हानांचे डोंगर अजून हिमालयाएवढे उभे होते. त्या १२ तासांनी राजघराण्यातील सर्वांना कठीण काळ म्हणजे काय हे शिकवलं होतं. पण त्याचं त्या सर्वांना जराही दु:ख नव्हतं, कारण ते सतीचं वाण त्यांनी स्वत:हून स्विकारलं होतं.

इकडे हॅवेलॉक त्याची फौज घेऊन विठूरास पोचला. विजनास सुरुवात झाली. हत्यारं चालवणाऱ्या इंग्रजी फौजेला पाहून भयभीत झालेले निरपराध प्रजाजन सैरावैरा पळायला लागले, त्यांच्या मार्गांमधे मृत देहांचा खच पडला. या शत्रूच्या फौजेपासून अब्रू वाचवण्यासाठी कित्येक स्त्रिया घराघरातील विहिरींमधे नाहीशा झाल्या. मग लूटालूट सुरु झाली. घराघरात खणत्या लागल्या. राजवाड्यात शिरलेल्यांनी तांबे, पितळ, चांदी सोने, रेशमी वस्त्रं, सर्व काही लुटलं. लुटून फस्त झालेल्या त्या राजवाड्याला आग लावून देण्यात आली. दुसरे बाजीराव, नानासाहेब, सारं इतिहासजमा झालं. तिकडे इंग्रजी फौजेने लखनौमधे प्रवेश करून हाच युध्दाचा खेळ मांडला. लखनौची बेगम आपला खजिना घेऊन वायव्येकडे पळून गेली. तिच्याबरोबर गावातले सावकारही पळाले. तिथेही बिजन झालं. रक्तांचे पूर वाहिले. मांसाचे ढीग पडले. नानासाहेबांना लखनौ सोडणं भागच पडलं. पण त्यांचा एक परमसखा तात्या टोपे जीवाची बाजी लावून लढतच होता. कानपूरहून जीव वाचवून बाहेर पडलेला तात्या, परत फौज जमवून यमुना उतरुन काल्पीत शिरला. त्याच्या साथीला रावसाहेबांना पाठवण्यात आलं. दोघांनी काल्पी हस्तगत केली आणि किल्ल्ल्याचा आश्रय घेतला. काल्पीत भगवे झेंडे फडकले. लोकांच्या आनंदाला पारिवार राहिला नाही. लगेच लालपरिबुवा, जळला रामभाऊ

यांच्यासह नवीन फौज उभारण्यात तात्या टोपे बुडून गेला. सर्वजण मोक्याच्या जागी टपून बसले. कानपूरहून निघालेल्या इंग्रजी फौजेशी लढायला ते आता उत्सुक होते. क्रांतीकारक साथीला होतेच.

खलक् खुदाका, मुल्क बादशहाका अंमल अंग्रेज सरकारका हा क्रांतीकारकांचा मंत्र आकाशापर्यंत पोचला.

इंग्रजी हल्ल्याच्या भयाने हजारो जीव रानावनामधे आश्रयाला होते, इंग्रज नानासाहेबांचा शोध घेत होते. नानासाहेबांचे साथीदारही पराभूत झाले होते. तेव्हा जायचं तर जायचं तरी कुठे हा सर्वांनाच प्रश्न पडला. शेवटी नानासाहेब, मौलवी अहमदशहा आणि अन्य नेते अज्ञातवासासाठी रुहेलखंडाच्या आश्रयाच्या गेले आणि ३ मार्चला बरेलीत पोचले. तिथून सर्व शहाजहाँपूरला जाऊन राहिले. शहाजहाँपूरला नानासाहेबांना बातमी मिळाली की हजरत महल, राजा तेजसिंगसारखे इतर क्रांतीकारक नेतेही बरेलीच्या आश्रयाला आले आहेत. तेव्हा नानासाहेब परत बरेलीला पोचले. त्यांच्या पाठोपाठ कॉलीनची फौजही तिकडे येऊन थडकली. क्रांतीकारक आणि इंग्रजी फौजेमधे घमासान युध्द झालं. बरेली शहाजहाँपूर इंग्रजांच्या हाती पडलं तेव्हा सर्व क्रांतीकारक नेते तिथून सटकले आणि नेपाळ नरेशाच्या आश्रयाला गेले. नानासाहेबांनी नेपाळच्या नरेशाला पत्र लिहून क्रांतीकारकांना, आम्हाला आश्रय द्यावा अशी विनंती केली, पण नेपाळच्या राजाने क्रांतीकारकांना आश्रय दिलाच नाही. उलट त्यांना ठार करण्याचा मुक्त परवाना इंग्रजांना दिला. तिथूनही नानासाहेब निसटले. त्यामुळे नानासाहेब हाती लागलेच नाहीत. नानासाहेब गुप्तपणे हिंडत गुजराथला गेले, आणि अज्ञातवासातच राहिले. मौलवी

अहमदशहा हे शहाजहानपूरहून पोवनचा राजा जगन्नाथसिंग याच्याकडे लष्करी मदत मागायला गेले, तेव्हा या फितूर राजाने मौलवींना आपल्या भेटीला बोलवलं, ते आल्यावर वेशीची दारं बंद केली. मौलवींना हे लक्षात आल्याबरोबर त्यांनी आपल्या हत्तीला इशारा केला. हत्ती आपल्या धडकेने दार फोडायला लागला तेव्हा जगन्नाथसिंग राजाने आपल्या भावाकडून मौलवींना गोळी घालून ठार केलं. त्यांचं शव इंग्रजांना दिलं आणि त्यांच्याकडून ५०, ००० रुपये बक्षिसाचे घेतले.

इंग्रजांशी युध्द चालूच राहिलं. एकेक राज्य जिंकत इंग्रजांची सत्ता दृढ व्हायला लागली. त्यांच्याशी लढतांना १७ जून १८५८ या दिवशी झांशीची राणी स्वर्गवासाला गेली. इंग्रजांपासून बचाव करत गुप्तपणे हिंडणारे तात्या टोपे आणि रावसाहेब इंग्रजांच्या हाती लागले. जम्मू शहराच्या आसपास हिंडत असतांना भीमराव नावाच्या माणसाने रावसाहेबांना इंग्रजांच्या हवाली केलं. त्यांना विठूरच्या राजवाड्यासमोर २० ऑगस्ट १८६२ मधे फाशी देण्यात आलं. तात्या टोपेला मानसिंग या त्यांच्या सहकाऱ्यानेच फसवलं आणि इंग्रजांच्या हवाली केलं. इंग्रजांनी टोपेला सिप्रीला नेलं. १८ एप्रिलला फाशी देण्यासाठी फाशीच्या तक्तापाशी नेण्यात आलं. मांग लोकांनी त्यांचे हातपाय बांधायला सुरुवात केली तेव्हा तात्या टोप्यांनी असं काही कारु नका म्हणून त्यांना सांगितलं आणि फाशीचा दोर आपल्याच हाताने गळयात अडकवला. हजारो लोकांच्या साक्षीने तो देशभक्त परमवीर स्वर्गस्थ झाला.

नानासाहेब कुठे गेले ते कुणाला कळलंच नाही. कुणी म्हणत की गुजरातमधे अज्ञातवासात राहिले. पण बेलसरे यांनी ब्रह्मचैतन्य

गोंदवलेमहाराजांच्या चरित्रात आठवण लिहिली आहे की नानासाहेब नैमिष्यारण्यात गुप्तपणे राहिले होते. गोंदवलेकर महाराजांचे पट्टशिष्य तात्यासाहेब केतकर हे प्लांचेटवर बसत आणि त्यांच्या मुखातून महाराज बोलत हा चमत्कार अनेकांनी अनुभवला होता. महाराजांच्या आवाजातच तात्यासाहेब तसंच्या तसं बोलत. (आमच्या घरातच केतकर महाराजांची प्लांचेटवरील महाराजांची प्रवचने झाली आहेत.) त्या महाराजांच्या वाणि संभाषणातून श्रीमंतांचा स्वर्गवास नैमिष्यारण्यात झाला असं निष्पन्न झालं. त्यात प्रगट झालेल्या श्रींच्या वाचासिध्दीतून असं सांगितलं गेलं की, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यात्रेसाठी गोंदवल्यातून बाहेर पडले. हर्द्यावरून लखनौला गेले. तिथून नैमिषारण्यात पोचले. तुमच्या अंतकाळी मी तुमच्या सोबत असेन असं वचन महाराजांनी नानासाहेब पेशव्यांना दिलं होतं, त्याप्रमाणे नानासाहेबांची भेट घेण्यास गोंदवलेकर महाराज नैमिषारण्यात आले होते. गोंदवलेकर महाराजांना भविष्य जाणण्याची ही सिध्दि प्राप्त होती. त्यावेळी नानासाहेब पेशवे यांची ऐंशी उलटली होती. नानासाहेब तापाने आजारी पडले होते. ताप उतरत नव्हता. म्हणून ते गोंदवलेकर महाराजांच्या भेटीची आस लावून बसले होते. असे ५/६ दिवस गेले. ७ व्या दिवशी गोंदवलेकर महाराज नानासाहेबांच्या समोर उभे होते. दोघांची भेट झाली. दोघांच्याही डोळयांमधून अश्रूधारा वाहात होत्या. दोन दिवसांनी, ९ व्या दिवशी नानासाहेब अत्यवस्थ झाले. दुपारची वेळ होती. श्री गोंदवलेकर महाराजांनी नानासाहेबांचं मस्तक आपल्या मांडीवर घेतलं. नानासाहेबांनी हात जोडले, आणि म्हणाले, “महाराज येतो, चल रामा, मला बरोबर ने ” श्रींनी त्यांच्या मुखात गंगा घातली.मग नानासाहेबांची प्राणज्योत मालवली. गोंदवलेकर महाराजांनी त्यांच्या देहावर अंत्यसंस्कार केले. त्यांचं

उत्तरकार्यही पण केलं. नानासाहेबांच्या अस्थी गंगेत विसर्जित झाल्या. तिथून महाराज परत हर्द्याला परतले. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर १९०६ मधे पेशवे नानासाहेबांचा कैलासवास झाला. सन १७१३ मधे बाळाजीपंतनाना यांनी भट घराण्यात आणलेली पेशवाई त्याच नानासाहेब नावाच्या १४ व्या पेशव्याच्या अंताने संपली.

तिकडे दिल्लीचा बादशहा बहादूरशहा जफर या बादशहाला रंगून इथे नेण्यात आलं. आजवरच्या मुघल बादशहांसाठी खास राखून ठेवलेल्या दफन भूमीत आपलं दफन व्हावं ही त्याची इच्छा पूर्ण झाली नाही. ब्रिटीशांनी त्याचा देह रंगूनमधेच मूठमाती देऊन पुरला.

कैसा हैं बदनसिब जफर। दो गज जमींनभी न मिली कु एँ यारमे... हे दु:ख सोसत बादशहा संपला.

लाखो लोकांच्या प्राणाच्या आहुतीनंतर सन १८५७ चं स्वातंत्र्य लढाईचं धगधगतं यज्ञकुंड शांत झालं. कुणी तोफेच्या तोंडी मेलं, कुणी हद्दपार झालं, कुणी फाशी गेलं, कुणी हाल सोसत तुरुंगात शांत झालं. माझे थोरले बंधू कै. वा. द. दिवेकरांनी लिहिलेल्या "साऊथ इंडिया इन १८५७ वॉर ऑफ इंडिपेंडन्स" या पुस्तकात दिलेल्या आकडेवारीनुसार या स्वातंत्र्य युध्दात भाग घेतला म्हणून ८०० पेक्षा जास्त क्रांतीकारक अंदमानच्या तुरुंगात डांबले गेले होते. त्यात २६० लोक दक्षिणेतील होते. नरगुंदचं भावे घराणं हे टिपू सुलतानाच्या रोषालाही बळी पडलं होतं, ते आताही इंग्रजांकडून पकडले गेले आणि भास्करराव, आणि बाबासाहेब भावे हे फाशी गेले. त्यात आणखी एक क्रांतीकारकाचं नाव होतं ते पेठच्या राजे भगवंतराव यांचं. आपापसातील

क्षुल्लक वैरामुळे इंग्रजांना सामील झालेल्या राजांनी, शीखांनी, फितुरांनी आणि आपल्याच हिंदू फौजेने केलेल्या मदतीमुळे इंग्रजांनी हा विजय साध्य केला. इंग्रजधार्जिण्या ग्वाल्हेरच्या राणी बायजाबाई शिंदे यांनी क्रांतीकारकांची त्यांना आलेली सर्व पत्रं इंग्रजांकडे पाठवली. त्यामुळे राणी लक्ष्मीबाईचा ठावठिकाणा समजण्यास सर ह्यू रोजला जराही अडचण आली नाही. नेसत्या वस्त्रानिशी गर्द अंधारात, राणी लक्ष्मीबाई झांशीतून बाहेर पडली. गर्द अंधारात अंगावरच्या २ वस्त्रांनिशी नानासाहेब पेशवा विठूरचा राजप्रासाद सोडून बाहेर पडला. इंग्रज आणि भारतीय यांच्यातील ठळक फरक म्हणजे एकही इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीला फितूर झाला नाही. इंग्रजांनीच राज्य करायचं आहे, ही आपली भूमी पारतंत्र्यात ठेवण्याची त्या विश्वंभराचीच इच्छा असावी. नानासाहेबांनी इंग्रज सेनापती होप ग्रँटला पत्र लिहिलं, त्यात म्हटलं होतं,



"हिंदुस्थान बळकावून मला बंडखोर म्हणण्यात काय अधिकार आहे? परके फिरंगी तुम्ही या देशाचे राजे आणि आमच्या या देशात आम्ही तेवढे चोर ठरलो काय?" नानासाहेबांचं हे शेवटचं पत्र. तसंच घडलं होतं.

बहादूरशहा जफर.

जन्म २५ ऑक्टोबर १७७५ मृत्यू ७ नोव्हेंबर १८८२.

कृतयुगाच्या आधीपासून चालत आलेली, राजे-राण्या-राजपुत्र-राजकन्या ही राजसत्ता मोडून टाकून योगेश्वराला आता नवीनच खेळ मांडायचा असावा. नाहीतर भारतातला युगानुयुगे चाललेला घराण्यांच्या राजसत्तेचा खेळ त्याने असा क्रूरपणे चिरडून टाकला नसता, राजघराण्यांना नेसत्या वस्त्रांनिशी घराबाहेर काढलं नसतं, रानोमाळ भटकायला लावलं नसतं, स्वराज्य संपवलं नसतं. लालबुंद मुखाचा ताम्र इंग्लंडहून वल्ही हाकत सिंध ते सिंधू प्रवास करत आला नसता, त्याने २५० वर्षांमधे भारत व्यापून टाकला नसता. पावसाच्या पुराचं पाणी घराघरात, शिरत जावं तशी इंग्रजी सत्ता भारतभर पसरली. हा पूर अडवण्याचा भारतीय सत्ताधीशांचा १८५७ सालातला प्रयत्न असफल झाला नसता.

अठराव्या शतकात भारताची मोडतोड झाली. १९ व्या शतकात युरोपियन जगतातही तेच घडलं. या शतकात तर जगाचा, व्यवहाराचा, विचारांचा चेहराच पार बदलून गेला. १८०२ सालात फ्रान्सच्या नेपोलियन नावाच्या बटूने युरोपात रिपब्लिक, रिफॉर्म्स, राईट्स-समान नागरी कायदा, असे तीन 'R' दिले. हे विचार युरोपभर पसरवले ज्यात त्या खंडातले विचारवंत आणि विद्यार्थी भारून गेले. वसुंधरेच्या प्रत्येक रेखांशावरील देशांवर ताम्रमुखी लोकांची सत्ता स्थापन झाली. जागतिकीकरणाची अशी सुरुवात झाली. प्रत्येक राष्ट्रात क्रांतीचे विचार पसरले. युरोपातील सिंहासनं डळमळायला लागली.

राजेशाहीच्या जागी लोकशाही, समाजवाद, कार्ल मार्क्समुळे साम्यवाद, असे सत्तेचे मार्गही विसाव्या शतकात नवीन उदयाला आले. युरोपातील औद्योगिक क्रांतीने सरदार-उमराव वर्ग नामशेष झाला आणि उद्योजक, पगारी मध्यमवर्ग, कामगार वर्ग, असा बदल झाला. हे बदलाचे वारे भारतापर्यंत येऊन पोचले ते इंग्रजांमुळे. २०व्या शतकाच्या सुरुवातीलाच युरोपातील १९१७ सालच्या महायुध्दात पृथ्वीतलावरील उरल्यासुरल्या राजवंशांचीही समाप्ती झाली. काही चारएक राजघराणी वानगीदाखल शिल्लक राहिली. त्याच महायुध्दात महाकाय वटवृक्षासारख्या ऑटोमन साम्राज्याची चिरफाड होऊन त्यातून अनेक लहान लहान देश मध्य आशियात निर्माण झाले.

भारतातील इंग्रजांच्या जुलूमशाहीतूनच १८५७ चं स्वातंत्र्ययुध्द भडकलं. एकेक भारतीय राजघराणी विझत चालली होती. उरला होता दिल्लीचा बादशहा. पण त्याचीही सत्ता त्याच्या लाल किल्ल्यापासून पालम भागापर्यंतच चालत होती. तो शेवटचा नाममात्र बादशहा म्हणजे बहादूरशहा जफर. हा बहादूरशहा जफरही असाच मंगोलहून आलेल्या एका बाबर नावाच्या सरदाराचा वंशज. बाबर-हुमायूँ-अकबर-जहांगीर-शहाजहान-औरंगजेबानंतर मुघलशाहीही मोडकळीला आली. १७०७ सालात औरंगजेब मरण पावल्यावर त्याचे तीन म्हातारे झालेले शहजादे गादीवर आले पण अल्पजीवी ठरले. सन १७१९ मधे बादशहा झालेल्या महंमदशहा रंगीलेपासून सल्तनतीला जरा स्थैर्य आलं. सदारंग अदारंग हे शास्त्रीय संगीताचे पाईक याच्याच काळात झाले. महंमदशहा रंगीलेच्या काळापासून, संभाजीपुत्र शाहूमहाराजांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राच्या पराक्रमाची आणि यशाची चढती कमान भारतभर गाजायला

लागली. पेशवे बाळाजी विश्वनाथांच्या पुत्राने, बाजीरावांनी आपल्या शिंदे होळकर, साथीदारांबरोबर दरारा निर्माण केला. उत्तरेकडून नादीरशहाने दिल्लीच्या बादशहाला कंगाल करून टाकलं. १७५३ सालच्या प्लासीच्या लढाईतील विजयाने इंग्रजी सत्तेचा भारतात पाया रचला. बादशहा अलिगोहरच्या काळातच मराठ्यांचा आणि अहमदशहा अब्दालीचा पानिपतला १७६१ मधे युध्दाचा भडका उडाला. १७६४ सालची बक्सरची लढाई पातशाही आणखी कमकुवत करुन गेली. एकापाठोपाठ बादशहाही कमकुवत निघाले.सन १८०६ मधे बादशहा अकबर द्वितीयच्या हातातून इंग्रजांनी कारभार हिसकावून घेतला. या बादशहाने राजा राममोहन राय यांना आपली बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला पाठवलं पण उपयोग झाला नाही. सन १८३७ मधे या अकबर द्वितीयचा मृत्यू झाला.

त्यानंतर तख्तावर बसला तो बहादूरशहा जफर, हा मुघल सलतनीतला शेवटचा बादशहा. अकबर द्वितीयचा हा थोरला शहजादा.२४ ऑक्टोबर १७७५ ला याचा जन्म झाला. याच्या आईचं नाव लालबाई. याचं बापाशी अजिबात पटत नसे. त्यामुळे जहांगीर या आपल्या धाकट्या मुलाला तख्तावर बसवण्याचे मनसुबे बादशहा अकबर आणि त्याची आवडती बेगम मुमताजमहल करायला लागले. पण हे शहजादे आपल्या मनाचे राजे होते. उध्दटपणा हा त्यांचा आनंदाचा विषय होता. इंग्रजांनी या वारसाला सरळ नकार दिला. कारण मुघल दरबारातील इंग्रजांचा एजंट सॅटन याचा या जहांगिरने अपमान केला होता. या जहांगिरने इंग्रज रिजंट सॅटन याला लुल्लु म्हणत हिणवलं तेव्हाच त्याच्या गच्छंतीचा मार्ग इंग्रजांनी आखून ठेवला होता. त्यातच एक दिवस सॅटन

दरबारात येत असतांना या जहांगिरने बंदूकीतून त्याच्यावर गोळी झाडली. टोपीला गोळी लागल्यामुळे सॅटन वाचला पण त्याला निमित्त मिळालं. इंग्रजांनी त्याला अटक केली तेव्हा बेगमेने आपल्या मुलाच्या सुटकेसाठी मेहेरोलिच्या हजरत ख्वाजा कुतुबुद्दीन बख्तियार काकीच्या दर्ग्यावर फुलांची चादर चढवीन असा नवस केला. जहांगीरच्या सुटकेनंतर बेगमने दर्ग्यावर चादर आणि मेहेरोलितील जोगमाया देवीपासून मशिदीपर्यंत फुलांनी सजवलेल्या पंख्याची थाटामाटाने जुलूस काढला. आठवडाभर मौजमजा करून दिल्लीतील नागरीक आनंदात घरी परतले. या निमित्ताने तेव्हापासून दर भाद्रपदात फूलोंकी सैर काढण्याचा चस्काच दिल्लीकरांना लागला. महिनेके ३० दिन और ४० मेले असा रंगेल स्वभावाच्या हिंदी-मुसलमान-शीख दिल्लीकरांनी हा फूलोंवाली सैरचा मौजमजेचा मेळा कायम केला. पं. नेहरूनी या उत्सवाचं १९६२ सालामधे पुनर्जीवन केलं.

सन १८३७ मधे हा अकबर बादशहा त्याच्या महालात मरण पावला. त्याबरोबर नगारे उलटे केले गेले. दुखवटा सुरु झाला. तेव्हा ही बातमी घेऊन बहादूरशहा जफरचे पाठीराखे जफरकडे आले आणि त्याला म्हणाले की,

“हुजर मुबारक हो ! घीका कुप्पा लुडक गया। बधाई हो, मुसाफीर गया।” त्याबरोबर लगेच बहादूरशहाने शाही वस्त्रं अंगावर चढवली. आणि सिंहासनावर बसण्याच्या तयारीला लागला तेव्हा त्याच्या ज्योतिष्यांनी ही मध्यरात्रीची वेळ अशुभ आहे, सकाळ होऊ द्यावी अशी विनंती केली पण ६२ वर्षाच्या बहादूरशहा जफरला तेवढा धीर नव्हता, तो म्हणाला की सूर्यप्रकाश होईल एवढ्या दिव्यांनी किला उजळवून टाका. त्या मध्यरात्रीच मृत बापाच्या मुखावर

पाय ठेवत त्याने तख्तारोहण केलं. शवावर पाय देत तख्तावर आरूढ होण्याची ही पारंपारिक रीत मुघलांची होती.

आता तो अबुजफर मुहमंद सिराजुद्दीन बहादूरशहा या नावाने बादशहा बनला पण कारभार आणि सत्ता इंग्रजांची होती. त्याकाळात गल्लीबोळातून दवंडी घुमायची- खल्क- (जमिन)खुदाका, मुल्क बादशहाका, हुक्म अंग्रजोंका.

बहादूरशहा जफरचा दिनक्रम पतंग उडवणे, कोंबड्यांच्या झुंजी लावणे, हत्तीच्या झुंजी, कधी काचेच्या बंद नालकीतून शिकारीला जाणे, काव्यगायनाचे जलसे करणे यात जायला लागला. तो स्वत: उत्तम शायर होता जगविख्यात शायर सम्राट गालिब हा त्याच्याच दरबारात हजेरी लावणारा. बहादूरशहाचा सर्व कारभार इंग्रजांच्या हाती होता त्यामुळे न्यायनिवाडा करणंही त्याच्या हातात राहिलंच नव्हतं. त्याला सालाना १ लाख रुपयांची पेन्शन सुरु झाली. हा बादशहा फार दयाळू होता. आपल्या जेवणाच्या आधी ७ मण गव्हाच्या (तंदूरी) खमिरी रोट्या, भाजी तयार होऊन गरिबांना वाटलं जायचं आणि मग त्याचं जेवण सुरु व्हायचं. १००० बुलबुल पक्षी त्यांच्याकडे पाळलेले होते. त्याच्या कबुतरांना शिकवणारा सैयद वारिस अली हा वस्ताद असा होता की ईदच्या दिवशी हत्तीवर बसून, बादशहा नमाजासाठी मशीदीत जायला बाहेर पडला की शिकवलेल्या कबुतरांचा एक थवा त्याच्यावर सावली धरण्यासाठी त्याच्या मस्तकावरून त्याच गतीने जाई. होळी, दसरा, दिवाळी जोरात धामधुमीने साजरी होई. बहादूरशहा स्वत: अरबी, फारसी, उर्दू, पंजाबी भाषांचा जाणकार होता. सुलेखन कलेत तरबेज होता, हस्तीदंतावर नक्काशी काढण्यात वाकबगार होता,

उत्तम निशाणेबाज होता. संगीताचा जाणकार होता. सगळं आरामात चाललं होतं.

त्याच्या या चैनीच्या आयुष्यात अचानक बदल आला, क्रांतीच्या उठावाचं बिगुल वाजलं तेव्हा. बादशहा त्यात सामील झाला. फैजाबादच्या मौलवी अहमदशहाने चपाती वाटणे आणि लाल कमळ दुसऱ्याला देतांना "सब लाल हो गया" असं म्हणणे यातून सर्वांना एकत्र जोडलं. पण घात झाला. विठूरचे नानासाहेब पेशव्यांनी ३१ मे ही तारीख उठावाची म्हणून गुप्तपणे निश्चित केली होती, पण ३१ मेच्या आधीच मिरतच्या छावणीत शिपायांनी बंड केलं. पण ते अजून दिल्लीला कळायचं होतं. आणि अचानक एके सकाळी ८ वाजता, सुस्त दिल्लीच्या रहिवाशांना घोड्यांच्या टापांचे आवाज त्यामुळे उठणारा धुरळा दिसायला लागला. हे कोण घोडेस्वार याचा विचार मनात शिवण्याच्या आधीच, मिरतच्या बंडखोरांनी सीलमपूरच्या चौकीला आग लावली, तिथल्या कलेक्टरला ठार केलं. नावांचा पूल करून यमुना पार करत घोडेस्वार काश्मीर दरवाजाने गावात शिरले. त्यात पहिला नरबळी पडला तो कर्नल रिप्ले याचा. दुसरी तुकडी कलकत्ता दरवाजाने गावात शिरली. दिल्लीच्या बाहेर जाणाऱ्या सर्व दरवाजांवर त्यांनी कब्जा केला. दर्यागंजमधले इंग्रज प्राण गमावू लागले. मिरतच्या बंडखोरांकडे झेंडे नव्हते, मग त्यांनी या बळी गेलेल्या इंग्रजांची मुंडकीच त्यावर अडकवली. आजवरच्या इंग्रजी जुलूमांचा तो सूड होता. हे सगळे मिरतचे बंडखोर शिपाई होते.

मग ते बादशहाकडे राजवाड्यात गेले. त्यांनी मिरतहून येऊन पोचलेल्या तोफांची सलामी बादशहाला दिली. बेगम झीनत महल आणि बहादूरशहा जफर

दोघेही उघडपणे क्रांतीकारकांना जाऊन मिळाले. बंडखोरांनी किल्ल्याच्या बुरुजावर बसून यमुनेची शोभा पाहणाऱ्या बादशहाला मुजरा घातला आणि तुम्हीच आमचे खाविंद, आमचं नेतेपद स्वीकारा अशी मागणी केली. बादशहा गांगरला. हे कोण, कुठले, इथे कसे पोचले ते त्याला काहीच कळेना. त्याने किल्ल्याचा अधिकारी डग्लस याला बोलावणं पाठवलं. डग्लस आला आणि त्याने सर्व बंडखोरांना फिरोजशहा कोटला मैधानावर जमायला सांगितलं. बंडखोर निघून गेले. त्यांनी गावात प्रचंड कापाकापी सुरू केली. गोरा दिसला की घाल गोळी असं चालू झाल्यावर गाव तंग झालं. डग्लस आणि कमिशनर फ्रेजर हे बंडखोरांना भेटायला निघले. डग्लसला पाहिल्याबरोबर घोडेस्वारांनी त्याच्यावर गोळी झाडली. त्याबरोबर त्याने जवळच्या विहिरीत उडी मारली. मिरतचे हे बंडखोर आहेत हे कळून चुकलं. घोडेस्वारांनी डग्लस आणि फ्रेजर, दोघांनाही मारलं. मग दंगा सुरुच झाला. क्रांतीवीरांनी बँक लुटली, इंग्रजी छापखाना संपवला, रस्ते रक्ताने लडबडले. लोक सामान घेऊन धावत सुटले. दुपार झाली तसे घोडेस्वार लाल किल्ल्यात शिरले. घोड्यांना पाणी दाखवून परत सवार झाले. शहरभर दंगा उसळला. राजघाट, चांदनी चौक, काश्मीरी दरवाजा, चहूकडे क्रांतीवीर पसरले. त्यांनी तुरूग फोडून कैदी मोकळे केले. मग तेही इंग्रजांच्या कत्तलीत सामील झाले. इतक्यात मोठा धमाका झाला. दारूगोळयाचं कोठार लुटायला बंडखोर पोचले होते. तिथल्या सुरक्षा अधिकाऱ्याने त्यांना विरोध केला तर बंडखोरांनी कोठाराला आग लावून टाकली. १०,००० बंदूकी, सुरुंगाच्या माळा ९ लाख काडतुसं सगळयाचा मोठा धमाका झाला. सारी दिल्ली हादरली. ३०० पेक्षा जास्त लोकांच्या चिंध्या झाल्या. ११ मे ते १६ मेपर्यंत हा दंगा उसळला. बंडखोरांना सूडाची नशा चढली

होती. लखनौहून काही मदत येईल याची इंग्रज वाट पाहात होते पण त्यांची निराशा झाली. मग सुटकेसाठी काहींनी कबीराचे दोहे पाठ केले, काहींनी वेष बदलले, काहींनी काळा रंग चोपडून काला आदमी म्हणवून घेतलं पण कुणीच सुटलं नाही. इंग्लिश नागरीकांचा मोठा नरसंहार झाला होता. या लोकांनी सत्ता हाती येताच खूप छळलं होतं भारतीय नागरिकांना. त्याचा वचपा निघाला.हिंदू आणि मुसलमानांच्या एकोप्यामुळे दिल्ली स्वतंत्र झाली. बहादूरशहा जफर परत देशाचा काही काळासाठी बादशहा बनला. ती क्रांतीकारकांची गरज होती.

पण मग रंग पालटला. अंबाल्याहून सुसज्ज पलटणी आल्या. राजवाड्यात, गावात, घरभेदी आणि इंग्रजधार्जिणे भरपूर भरले होते. त्यांनी बंडखोरांच्या सर्व बातम्या इंग्रजांना पुरवल्या, स्फोटकांच्या पोत्यांमधे बाजरी भरून ठेवली. मग व्हायचं तेच झालं. इंग्रजांना बाहेरून मदत आली. त्यांचा ८ जूनला त्यांचा दिल्लीला वेढा पडला. ज्या ठिकाणी मुसलमान बादशहांनी शीख धर्मगुरूना ठार केलं, त्याच दिल्लीची आणि तख्ताची शीख राखरांगोळी करतील ही जुनी प्रतिज्ञा शीखांच्या मनात भरवून इंग्रजांनी शीखांना फोडलं आणि स्वत:कडे वळवलं. त्यामुळे शीखांच्या शूर पलटणी इंग्रजांना जाऊन मिळाल्या. दिल्ली बरबाद झाली. लुटली गेली.

बहादूरशहा जफर कुटुंबासकट हुमायूँ मकबऱ्यात जाऊन बसला. पण इंग्रजी अधिकारी हडसन याने त्याला आणि त्याची बेगम झिनतमहल यांना अटक करून झीनत महलच्या एका छोट्या खोलीत ठेवलं. दोघेही एका पलंगावर हताश होऊन बसून राहिले. इंग्रज अधिकारी यायचे त्याची दाढी ओढायचे, त्याची टिंगल करायचे आणि निघून जायचे. बादशहाला रोजचे २

आणे खर्चासाठी मंजूर करण्यात आले. ती जवाहिरात, ते गेहेने, ती रेशमी वस्त्रं, ते मखमली पडदे, ते वैभव, सर्वकाही संपलं. बादशहा एक सामान्य बिचारा नागरीक बनून बसून राहिला होता. मधेच स्वत:शी पुटपुटत होता..कोणती दुखभरी दास्तान स्वत:लाच ऐकवत होता कोणास ठाऊक. ज्या लोकांनी त्याच्या शहजाद्यांना सोडवण्याचा प्रयत्न केला त्यांना आणि त्यांच्या शहजाद्यांना इंग्रजांनी ठार करून टाकलं. शहजाद्याचं शीर कापून बादशहापुढे आणून टाकलं आणि धड चांदनी चौकात लटकवलं. कोरड्या नेत्रांनी बहादूरशहाने बेगमेने आपल्या पुत्रांचं अखेरचं दर्शन घेतलं.

२७ जानेवारी, १८५८ च्या सकाळी १० वाजता बहादूरशहाला किल्ल्यातील दिवाण ए खासमधे आणलं गेलं, त्याचा खटला चालवण्याचं नाटकही त्यांनी केलं आणि मग ३ महिन्यांनी त्याला आणि झीनतमहलला रंगूनला पाठवून दिलं. भारतीय परकीय सत्ताधीशांमधे हिंदू, अफगाणी-इराणी-दुराणी सुलतान एकीकडे आणि दुसरीकडे इंग्रज यांच्यात तोच मोठा फरक होता. या स्वातंत्र्य संग्रामात हिंदू मुसलमान एक होऊन मातृभूमीसाठी लढत होते हीच मोठी गोष्ट होती. आणि परके होते इंग्रज.. इंग्रजांनी भारताला लुटारूंसारखं, भिकाऱ्यांसारखं लुटलं आणि इंग्लंड भरलं आणि मुसलमान सुलतान आणि बादशहांनी आपला देश विसरून, भारताला मातृभूमीचा सन्मान देऊन तिच्यासाठी बंदूक उचलली. ते इंग्रजांना सामील झाले नाहीत आणि आपला देश इथल्या संपत्तीने भरला नाही. उलट शहाजहानने ताजमहाल समरकंदला न उभारता या भरतभूमीत बांधला.



रंगूनमधे ७ नोव्हेबर १८६२ मधे बादशहाला मरण आलं. त्याची इच्छा आपल्या पूर्वजांच्या दफनभूमीत स्वत:चा देह मिसळावा अशी होती. पण इंग्रजांनी ती मान्य केली नाही. रंगूनमधे " लगता नहीं हैं दिल मेरा " म्हणत बादशहा खचून जाऊन मेला, त्याच रंगूनच्या ६ वर्षांच्या बंदिवासात लोकमान्यांनी वेळ घालवत गीतारहस्य लिहिलं. त्यांच्या लेखनाच्या

कागदांच्या ट्रंका ब्रिटीशांनी त्यांना दिल्या नाहीत तेव्हाही माझ्या डोक्यात सर्व काही आहे, मी परत गीतारहस्य लिहून काढीन म्हणण्याची जिगर त्यांच्याकडे होती.

तुम ने किया न याद कभी भूल कर हमें, हम ने तुम्हारी याद में सब कुछ भुला दिया। ऊम्रे दराज मांगके लाये थे,दो आरजू में कटगये दो इंतजार में। लगता नहीं है जी मेरा ।, ना किसीके आँखका नूर हूँ । या आज लोकप्रिय झालेल्या, घराघरात पोचलेल्या गझला त्याच्याच.. जो बिगड गया वो नसिब हूँ, जो उजड गया वो दयार हूँ.. त्याच्या हा वेदनेचा हुंकार रफीसाहेबांनी आपल्या दर्दभऱ्या आवाजात घराघरात पोचवला. ८० वर्षाच्या बादशहा, राजे-राण्यांसकट अनेक वीरांच्या समिधा गिळल्यावरही, हे स्फुल्लिंगाने पेटलेलं स्वातंत्र्याचं अपयशाचं यज्ञकुंड अतृप्तच राहिलं. आणखी येणाऱ्या कोवळ्या समिधांची वाट पाहात बसलं.

है कितना बदनसीब जफ़र दफ़्न के लिये

दो गज जमीं नहीं मिली उसे कू ए यार में.

सरदार परशुराम भाऊ पटवर्धन.

वैभवगंगेचा उगम – कोतवडे. ब्रह्मीभूत हरभटबाबा पटवर्धन.

कोतवडं. नखाएवढं कोकणातलं, पाच पन्नास उंबरठ्यांचं, डोंगराच्या कुशीतलं, उंचसखल गाव. त्यातही बाळंभट पटवर्धन हे पौरोहित्यावर गुजराण करणारे गुरुजी. तेही सामान्यच. गावातील सहत्रबुध्दे खोतांकडील पौरोहित्यामुळे चार घास पोटात जात होते. तीन मुलगे हरि, विठ्ठल आणि केशव यांना घेऊन संसाराचा गाडा रेटत होते. मोठा मुलगा हरी हाताशी येईल या आशेवर दिवस ढकलत होते. पण हरिचं वेगळंच होतं. वेदमंत्रपठण, पाठांतर, करायचंच नव्हतं त्याला. मग व्हायचं तेच झालं. एक दिवस बाळंभटांचा संयम संपला. वडिलांच्या रागावण्याने संतापलेला हरभट पश्चिमेच्या समुद्राकडे तोंड करून, चालत चालत गणपती पुळयाच्या गणेश मंदिरात पोचला. तिथेच मुक्काम ठोकला. १० वर्षांच्या अखंड तपस्येनंतर आपल्यावर श्री प्रसन्न झाले आहेत, आणि आपल्याला समोरच्या व्यक्तीचं प्राक्तन वाचण्याची सिध्दी प्राप्त झाली हे हरिला अचानक कळलं. हरभटांच्या दारी मग पिडितांची मार्गदर्शनासाठी रांग लागायला लागली. एक दिवस मंदिरातच निद्रिस्त असलेल्या हरभटबाबांना विवाह करण्याचा दृष्टांत दिला. तेव्हा पुळयातीलच शेंडेभटांच्या गौराबाईंनी, लक्ष्मीबाई या नावाने हरभटांच्या आयुष्यात प्रवेश केला.. लक्ष्मीबाईशी संसार सुरू झाल्यावर हरभटबाबांना कृष्णाजी, बल्लाळ, त्र्यंबक, राम आणि मग गोविंद हे चार पुत्र झाले. संसार आणि गणरायाची उपासना चालू असतांनाच काही वर्षांनी परत गणरायाने हरभटांना देशावर

जाण्याची आज्ञा दिली होती. तेव्हा आपलं जन्मस्थान, श्रध्दास्थान सोडून, आपल्या कुटुंबाला आणि शिष्यपरिवाराला घेऊन, हरभटबाबा उत्तूरला कृष्णंभट जोशी वरवडेकरांकडे पोचले. आता काही दिवस तिथेच मुक्काम करायचा होता. कोतवडं हे सरदार पटवर्धनांच्या वैभवगंगेचं उगमस्थान होतं....

उत्तूर ते कापशी - नवीन वळण. –

हरभटांचा परिवार उत्तूरमधे चांगलाच रमला. हरभटांचं भजन, कीर्तन, प्रवचन, दु:खितांना मार्गदर्शन नित्यनेमाने सुरु झालं. हरभटांच्या संसारातही भास्कर, आणि तारा या कन्येची भर पडली होती. हरभटांच्या ६ पुत्रांना, बाबांकडे येणाऱ्या भक्तांकडून औरंगजेबाच्या फौजा, राजाराममहाराजांचा कैलासवास, ताराराणीचं सत्ता हाती घेणं, हे राजकारण कानावर पडायला लागलं. उत्तूरमधे हरभटांच्या सिध्दिची ख्याती सुदूर पसरली. ती कीर्ती ऐकून सरदार नारोपंत जोशांच्या पत्नी हरभटांच्या मठात दर्शनासाठी आल्या. त्यांच्या घरात लक्ष्मीचा वावर भरपूर होता पण पोटी संतान नव्हतं. त्याविना त्या श्रीमंतीला चव नव्हती. नारोपंत जोशी संताजी घोरपड्यांचे मानसपुत्र. कोकणातील म्हापणचे नारोपंत आणि त्यांची आई देशावर आली तेव्हा संताजींनी आपल्या देवळात त्यांना आश्रय दिला. संताजींच्या पितृतुल्य छत्राखाली आपलं जोशी हे उपनाम टाकून नारोपतांनी घोरपडे नाव धारण केलं होतं. हरभटबाबांनी लक्ष्मीबाईंना, तिरुपतीच्या बालाजींची आराधना करायला सांगितलं. नारोपंतांना राजयोग प्राप्त होईल हे भाकीतही केलं. मग लक्ष्मीबाई हरभटांच्या कुटुंबाला सोबत घेऊन तिरुपतीला गेल्या. परत आल्यावर, एक

वर्षाने सन १७०१ मधे त्यांना पुत्र झाला तो व्यंकटेश. आता हरभटबाबांना नारोपंतांनी कापशीलाच ठेवून घेतलं. नारोपंतांच्या सहवासात त्र्यंबक, राम, गोविंदाला पागा, फौज, लष्करी युध्दसाहित्य यांचं शिक्षण मिळायला लागलं. कोतवड्याच्या उगमस्थानाची वैभवगंगा देशावर येऊन प्रवाही झाली. लक्ष्मीबाई नारोपंत घोरपडे यांच्या पावलांनी पटवर्धन घराण्यात राजयोग आला. हरभटबाबांच्या पुत्रांना यशाचे दरवाजे उघडले गेले. हे वळण वैभवगंगेला समरपठारावर घेऊन आलं.

या काळात स्वराज्यातील राजकारणातही मोठे बदल झाले होते. औरंगजेबाचा १७०७ सालात अहमदनगरला मृत्यू झाला. संभाजीपुत्र शाहूराजांची सुटका होऊन ते देशात आले. ताराराणी आणि शाहूराजांमधे सत्तासंघर्ष होऊन ताराराणी हरल्या. शाहूराजे सातारच्या तख्तावर जानेवारी १७०८ ला विराजमान झाले आणि ताराराणींनी पन्हाळगडावर स्वतंत्र गादी स्थापन केली. आपल्या दरबारात नारोपंत जोश्यांना ताराराणीने सचिवपद दिलं. हरभटबाबांचं राजयोग आहे हे भविष्यकथन सत्यात उतरलं. इकडे सातारा गादीमधेही मोठी स्थित्यंतरं झाली. शाहूराजांनी श्रीवर्धनच्या बाळाजी विश्वनाथ या सरदाराला पेशवेपद दिलं. स्वराज्याची तख्तं दोन झाली. परत ताराराणींचीही सत्ता जाऊन द्वितीय राणी राजसबाईंचे संभाजीराजे कोल्हापूर गादीचे प्रमुख झाले.

कापशी ते सासवड. वैभवगंगेचा प्रवाह रुंदावला.

संताजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनी नारोपंतांना इचलकरंजी, आरग, मणेराजुरी आणि आजरे इनाम दिला. म्हणून नारोपंत घोरपडे यांनी इचलकरंजीला वास्तव्य केलं. व्यंकटेश १० वर्षांचा झाल्यावर त्याच्यासाठी वधूसंशोधन सुरू केलं. तेव्हा सातार गादीचे पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांची कनिष्ठ कन्या अनुबाईंचं स्थळ सांगून आलं.. पण...एक मोठा राजकारणाचा अडसर आड आला. नारोपंतांना ताराराणीकडून आणि बाळाजी विश्वनाथांना शाहूराजांची या विवाहाला मान्यता मिळणं केवळ अशक्यप्राय होतं. मग त्यातून मार्ग शोधणं सुरू झालं. बाळाजीपंत विश्वनाथांची पत्नी राधाबाई, कोतवड्याजवळच्या नेवऱ्याच्या, तेव्हा हरभटबाबांना मध्यस्थ होण्याची विनंती राधाबाईंनी केली. ती हरभटबाबांची मध्यस्थी ताराराणी आणि शाहूराजांनी मान्य केली. घोरपड्यांची सून येसूबाई या नावाने अनुबाई नारोपंतांच्या घरात आली.

मग सणवारी माहेरी जातांना, अनुबाईंच्या पालखीबरोबर रामचंद्र, गोविंदा, सासवडला जायला लागले. तिथे मिळेल तेवढ्या मुक्कामात राऊंच्या आणि चिमाजीआपांच्या हाताखाली लष्करी शिक्षणाचे धडे घ्यायला लागले. १७२० सालात बाजीराऊ पेशवे झाले. तेव्हा त्यांच्या स्वारीत आपली घोडी घेऊन गोविंदा आणि रामचंद्रही सामील व्हायला लागले. हरभटबाबांची मुलं उद्योगाला लागली. त्र्यंबकपंत नारोपंतांचा कारभार सांभाळायला लागले. ते अक्कलकोटच्या फत्तेसिंग भोसल्यांचे दिवाण बनले, तेव्हा नारोपंतांनीही आपली दिवाणीही त्यांनाच दिली. रामचंद्रआपा नारोपंतांच्या पागेची व्यवस्था पाहायला लागले. थोरले कृष्णाजी आणि बाळाजी पौरोहित्यात रमले. पटवर्धन

बंधूंच्या प्राक्तनाला दिशा मिळाली. आख्यायिका असंही सांगते की गोविंद हरिंना आपल्याला अपेक्षित यश मिळत नाही असं वाटायला लागलं तेव्हा त्यांनी हरभटबाबांना कारण विचारलं. हरभटबाबा ध्यानस्थ झाले आणि गोविंदाला म्हणाले की मागच्या जन्मी तू विठोबाला नवस केला होतास पण तो फेडला नाहीस. आता पंढरपूरला जा, तिथे तुला एक कुष्ठरोगी दिसेल, त्याची इच्छा पूर्ण कर म्हणजे तुझा भाग्योदय होईल. त्याप्रमाणे गोविंद हरी पंढरपूरला गेले. तिथे महाद्वारापाशी घोंगडं लपेटलेला त्यांना एक कुष्ठरोगी दिसला. त्या रोग्यानेच गोविंदपंत अशी हाक मारली. त्याला कोकणातील गाकर खाण्याची इच्छा होती. गोविंद हरिंनी गावात हिंडून गाकर करून आणले आणि त्याला खाऊ घातले. त्याला पाणी पाजलं आणि मग विठूरायाचं दर्शन घेऊन ते परत आले.पण तेव्हा तो कुष्ठरोगी अंतर्धान पावला होता. नंतर १९ सालात गोविंदपंतांना बाजीरावांच्या पथकात चाकरी मिळाली. घरातील आराध्य दैवत गणपती असूनही, त्यांनी आपल्या पुत्रांची नावे म्हणूनच कदाचित विठोबाची ठेवली असावीत.

पटवर्धन बंधूंची पराक्रमाची चढती कमान.

गोविंद आणि रामचंद्र हरि, राऊंच्या हाताखाली स्थरावले. दुसरीकडे त्यांचे संसारही सुरू झाले. कृष्णंभटांची-राधाबाई, गोविंदपंत- सत्यभामाबाई, त्र्यंबकपंत-अक्काबाई, रामचंद्र -जानकी, भास्कर- सावित्री, असा पुत्रांचा संसार सुरू झाला. हरभटबाबांची कन्या तारा हिला वैशंपायन यांच्याकडे दिली. त्र्यंबकपंतांना दोन पुत्र नीलकंठ आणि कोन्हेरे, रामचंद्राला एक कन्या आणि एक पुत्र परशुराम झाला. गोविदपंतांना गोपाळ, वामन, पांडुरंग, गंगाधर आणि एक

कन्या सखूबाई ही अपत्ये झाली. भास्कर हरिला धोंडबा, विनोबा, हरबा, सदोबा, वासुदेव आणि रामचंद्र हे ६ पुत्रच झाले. भास्कर हरि कायम कागवाडलाच राहिले. तिथे त्यांनी देवळं बांधली. नदीला घाट बांधले. कृष्णंभटांना नारायण, पुरुषोत्तमदाजी, मेघश्याम, बळवंत,आणि बाळाजीला एक मयुरेश्वर पुत्र झाला. गोविंदपंत नानांच्या देखरेखीखाली सर्व मुलांचं लष्करी शिक्षण सुरू झालं.

बाजीराऊ आणि चिमाजी आपांबरोबर पटवर्धन बंधूंनी दिल्ली, माळवा, बुंदेलखंडातील लढायांचे धडे गिरवले. चिमाजीआपांच्या वसईच्या मोहिमेत, वसई किल्ल्यावर निशाण लावायची बहादूर कामगिरी रामचंद्र हरिनेच केली. बाजीराऊ सवाई जयसिंगाच्या भेटीला गेले तेव्हा रजपूत शिलेदार आणि पेशव्यांतर्फे रामचंद्र हरी यांच्यातील भालाफेकीच्या स्पर्धेत, रजपूताला ठार करून रामने ती स्पर्धा जिंकली. स्वराज्याची शान रामचंद्र हरिने उंचावली होती. तेव्हा खूष होऊन, पेशवे बाजीरावांनी रामला २५०० राऊतांचा सरंजाम दिला. पटवर्धन पुत्रांनी आपल्या हिकमतीवर मिळवलेलं हे पहिलं बक्षिस होतं. पुणे दरबारात पटवर्धन बंधूंना पेशव्यांचे निष्ठावंत म्हणून ओळख मिळाली. त्र्यंबकपंतांनी राणोजी घोरपड्यांना कर्ज दिलं, तेव्हा त्यांना कुरुंदवाडचा वसूल परतफेडीसाठी मिळाला. त्यामुळे त्र्यंबकपंत कुरुंदवाडला आणि बाकी सर्व बंधू पुण्यात येऊन वाडा बांधून स्थिरावले. त्यांच्या यशाची कमान वाढत चाललेली असतांना परत एक अत्यंत दु:खद अकल्पित घडलं. बाजीराऊंचा २८ एप्रिल, १७४० ला रावेर मुक्कामी कैलासवास झाला. स्वराज्याचं दुर्दैव म्हणून पाठोपाठ चिमाजीआपाही ६ महिन्यांनी डिसेंबरमधे निवर्तले.

नानासाहेब पेशवे आणि पटवर्धन बंधू.

शाहूमहाराजांनी, बाजीरावांचे पुत्र बाळाजी बल्लाळ, नानासाहेबांना पेशवेपद दिलं. आता नानासाहेबांच्या मोहिमामधे पटवर्धन बंधू चमकायला लागले. राम हरि, गोविंद हरिंबरोबर त्यांचे पुत्र गोपाळ, पुरुषोत्तम, नीलकंठ, मोहिमांमधे भाग घ्यायला लागले.. त्यांच्या पथकाच्या कारभाराची जबाबदारी कृष्णाजी हरिंचा पुत्र नारायण बघायला लागला. मग वरचेवर होणाऱ्या स्वाऱ्यांमुळे गोविंद हरिंनी स्वत:चं पथक निर्माण केलं. नानासाहेबांच्या काळात १७४९ सालात शाहूराजांचा कैलासवास झाला. त्याचवेळी पटवर्धन घरातही मोठी दुर्दैवी घटना घडली. रामचंद्र हरिंचा स्वारीमधे असतांना जलोदराने मृत्यू झाला. मग सर्वांच्या विचारे, रामचंद्रपंतांना मिळालेला २५०० राऊतांचा सरंजाम पुरुषोत्तमदाजींनी सांभाळायला घेतला आणि त्यांच्या अल्पवयीन, १० वर्षांच्या परशुरामाची जबाबदारी गोविंदपंतांनी घेतली. संभाजीमहाराजांच्या काळापासून बुडवलेली खंडणी वसूल करण्यासाठी पेशव्यांनी कर्नाटकात स्वाऱ्या सुरू केल्या. तेव्हा सावनूरच्या मोहिमेत, पुरुषोत्तम कृष्णाजीने गाजवलेल्या पराक्रमावर पालखीचा मान मिळाला. सांगोल्यातील ताराराणीच्या उठावात विजय मिळाल्यावर नानासाहेबांनी सांगोल्याची मामलत मेघश्याम कृष्णाजीला दिली. त्या झुंजीत पराक्रम गाजवलेले पुरुषोत्तमदाजी यांचा मोठा सन्मान पेशव्यांनी केला. पटवर्धन बंधू राजकारणात, दरबारात आणि रणांगणात पेशव्यांचे विश्वासू प्रतिष्ठित दरबारी ठरले. त्याच वर्षी १७५० मधे पुण्यात ॐकारेश्वराच्या मंदिरामधे हरभटबाबांनी वयाच्या ९५ व्या वर्षी शेवटचा श्वास घेतला. त्यांना मिळालेल्या हरिपूरात पुढे गोविंदपंतांनी ७ मार्च १७६७ मधे

गणपती मंदिर उभारलं. हरभट बालवयात रागावून घर सोडून निघून गेले त्यामुळे हे सारं घडलं.

पेशवेपदी माधवराव. पानिपत-संक्रांत-१७६१.

नानासाहेबांच्या काळात मराठ्यांचा दरारा दिल्लीपर्यंत पोचला. मराठी फौजांची मदत दिल्लीच्या बादशहाला लागायला लागली. त्याचवेळी दिल्लीच्या बादशहाला अहमदशहा अब्दालीच्या तडाख्यातून वाचवण्यासाठी अनेक नामांकित सरदार, उत्तरेकडे वाटचाल करायला लागले. तेव्हा निजामाने कबूल केलेला ६० लाखांचा वसूल हस्तगत करण्यासाठी नानासाहेबांनी पटवर्धन बंधूंना कामगिरी सांगितली. पण पानिपतचा संग्राम स्वराज्य चक्रीवादळासारखं उध्वस्त करून गेला. त्या धक्क्यात नानासाहेब पेशव्यांचाही कैलासवास झाला. आणि १६ वर्षांचे माधवराव पेशवेपदावर आले. नानासाहेबांचे बंधू म्हणून राघोबादादांना ते पद हवं होतं. त्यामुळे राघोबादादा नावाचा विरोधाचा जळता निखारा माधवरावांना सांभाळावा लागला. पेशवे गादीवर आले त्याच वर्षी सन १७६१ मधे लष्करातला एक साधा शिपाई असलेल्या मैसूरच्या हैदरअलिने कमकुवत झालेल्या वोडियारांच्या हातून मैसूरची सत्ता हाती घेतली. माधवराव पेशव्यांची गाठ आता इंग्रज आणि हैदर या दोन बलवान विरोधकांशी होती.

पटवर्धन मिरजेचे सरदार. सन १७६२.

शून्य, सुतकी वातावरणात, रिकाम्या खजिन्याच्या आधाराने पेशवे माधवरावांनी कारभाराला सुरुवात केली. त्यांनी आपली विश्वासातील,

कर्तृत्त्ववान माणसं महत्त्वाच्या जागी नेमली. त्या संकट काळात पटवर्धन बंधू त्यांच्यामागे तटबंदीसारखे उभे राहिले. माधवरावांना गोपाळदादांचा इतका भरवसा होता की स्वारीच्या वेळी आपल्या शामियानाच्या बाहेत गोपाळराव बाहेर फौज घेऊन त्यांच्या संरक्षणाला असायचे. माधवराव पेशव्यांनी दक्षिण सीमेवर हैदरशी लढण्याला समर्थ असलेल्या पराक्रमी पटवर्धन बंधूंची मिरजेला स्थापना केली. गोविंदपंत पटवर्धन यांच्या नावाने ८५०० फौजेची सनद करून दिली. पटवर्धन घराण्याच्या भाग्याचा तो परमोच्च क्षण होता. पटवर्धन बंधूंच्या एकनिष्ठतेचा सन्मान होता. गोविंदपंतांची ४६०० फौज, परशुरामभाऊंची २४०० फौज आणि त्र्यंबक हरींची १००० फौज त्यांनी बाळगायची होती. त्यासाठी गोविंद हरींना २५ लाखांचा सरंजाम म्हणजे २५ लाख वसूलाचा मुलूख पटवर्धनांना दिला. त्याचा सारा गोळा करून त्यावर पटवर्धन बंधूंनी आपली फौज ठेवायची. स्वराज्याच्या सीमेवरचे हैदरअलि, निजाम आणि इंग्रज यांच्यापासून दक्षिण सीमा सांभाळायच्या. या तैनात जाबत्यानंतर गोविंद हरी मिरजेला, परशुरामभाऊ मिरजेहून ९ कोसांवरच्या तासगावला आणि त्र्यंबक हरी कुरुंदवाडला स्थायिक झाले. हरभटबाबांना गजाननाच्या देशावर जाण्याच्या दृष्टांताचा आता अर्थ कळला होता. कोतवड्याची वैभवगंगा मिरजेत येऊन विशाल झाली. परशुरामभाऊंचा तासगावचे संस्थापक म्हणून उदय झाला. तेव्हा भाऊ २१ वर्षांचे आपल्या बंधूंच्या हाताखाली समर्थ सरदार झाले होते.

माधवराव पेशवे झाले पण दरबारात दादा विरुध्द माधवराव असे दोन तट पडले. त्यातूनच उद्भवली उरळीकांचनची काकापुतण्यामधली झुंज आणि

माधवरावांची सत्तेतून माघार. दादांच्या हाती कारभार आला आणि लगेच त्यांनी मिरजेवर हल्ला केला. पुरुषोत्तमदाजींच्या नेतृत्त्वाखाली सर्व पटवर्धन मंडळींनी किल्ला लढवला पण त्यात पराभव पावून गोविंद हरींना मिरज किल्ला सोडावा लागला. गोपाळराव निजामाकडे मदत मागायला गेले पण निजाम दादांचा मिलाफी असल्याने मदत मिळाली नाही. ही लढाई राक्षसभुवनावर निजामाच्या पराभवाने संपली. राघोबादादांनी कारभाराचा हट्ट सोडला, माधवरावांनी परत कारभार हाती घेतला. गोपाळरावांनाही बोलावून घेऊन मिरज त्यांच्याकडे परत सोपवली. या लढाईनंतर पेशवे माधवरावांनी आता हैदरअलिकडे आपली नजर वळवली. पुणे दरबारातील अस्थिरतेचा फायदा घेऊन हैदरअलिने मराठ्यांचा मुलूख जिंकून घेतला होता तो परत मिळवण्यासाठी पेशव्यांनी कर्नाटकावर स्वाऱ्या सुरु केल्या.

कर्नाटक आणि पटवर्धन बंधू.

या काळात पटवर्धन बिनीचे सरदार होते, म्हणजे पेशव्यांच्या फौजा निघण्याआधी पटवर्धनांच्या फौजा बाहेर पडलेल्या असत. माधवरावांच्या कारकीर्दीत पटवर्धन बंधूंच्या पराक्रमाला तेज लाभलं. कर्नाटक म्हणजे गोपाळराव पटवर्धन असं समीकरणच होऊन बसलं. आपल्या १० वर्षांच्या कारकीर्दीत, हैदरअलिला संपवण्यासाठी झालेल्या संग्रमात, हैदरअलिशी रट्टेहळ्ळीची मोठी लढाई, बंकापूरची झुंज, जडेअनवडीची झटापट, या साऱ्या संग्रामांमधे गोपाळरावांच्या तलवारीचं पाणी हैदरला माघार घ्यायला लावत गेलं. परशुरामभाऊंनी या मोहिमांमधे लष्करी डावपेच आणि राजकीय डावपेच यांचं भरपूर शिक्षण घेतलं. मासूरच्या बारीतून बुध्देहाळजवळच्या पटवर्धनांच्या

छावणीवर हैदर मध्यरात्री अचानक चालून आला. त्याच्याशी करारी सामना करतांना परशुरामभाऊंच्या मांडीखालच्या तीन घोड्या पाठोपाठ मेल्या. हैदरशी झुंजी चालू असतांना राघोबादादा यांना घोडपेवरच्या संग्रामात राघोबांना हरवून, त्यांना कैदेत ठेवणं, जानोजी भोसल्यांना शरण आणणं या सगळ्याचा परिणाम पेशव्यांच्या स्वास्थ्यावर व्हायला लागला. पेशव्यांची प्रकृती वरचेवर बिघडायला लागली. सन १७६९ ला हैदरवर स्वारी करायला बाहेर पडलेले माधवराव, प्रकृती बिघडल्यामुळे, त्र्यंबकमामा पेठ्यांच्या हाताखाली फौज देऊन माघारी पुण्याला आले.

गोपाळरावांचा कैलासवास. डोलारा कोसळला.

हैदरशी संग्राम सुरू झाला. या मोहिमेत आपल्याला सेनापतीपद मिळावं अशी गोपाळरावांची तीव्र इच्छा होती, पण पेशव्यांनी त्र्यंबकमामा पेठे यांना सेनापती केलं. त्यामुळे दुखावलेल्या गोपाळरावांचं मन त्यातून उडालं. सरदारी नकोशी झाली. मी मिरजेला परत येतो हे पत्र वाचल्यावर गोविंदपंत नाना धास्तावले. पण एक दिवस त्र्यंबकमामांना न सांगता ते निघून आले होते. पेठेमामांनी पुण्याला माधवरावांकडे ही तक्रार पोचवली. गोपाळराव मिरजेत पोचले तेव्हा कृश शरीर झालेल्या आजारी गोपाळरावांना बघून गोविंदपंतांच्या पायाखालची जमीनच सरकली. जलोदराने त्यांच्या शरिराचा पूर्ण ताबा घेतला होता. मिरजेला पोचल्यावर अवघ्या ३ दिवसांमधे गोपाळरावांचं देहावसान झालं. माधवराव पेशव्यांच्या काळात स्वराज्यात तीनच राव होते. बाकी कुणीही आपल्या नावापुढे राव हे उपपद लावायचं नाही हा दंडक होता. एक होते,

गोपाळराव, दुसरे पेशवे माधवराव आणि तिसरे मुराररराव घोरपडे. गोपाळराव गेल्यावर लगेच वामनदादा कर्नाटकात फौजेत रुजू झाले. पुण्याला गोपाळरावांच्या तक्रारीच्या त्र्यंबकमामांच्या पत्रामुळे पेशव्यांचा संताप अनावर झाला होता. त्यांनी पटवर्धनांच्या जप्तीसाठी माणसं पाठवली. पण त्या लोकांना वाटेतच गोपाळदादांचा स्वर्गवास झाल्याचं कळलं. त्यांच्याकडून पेशव्यांना बातमी मिळाली. तेव्हा पेशव्यांनी दुखवटा म्हणून ३ दिवस शनिवारवाड्यावरचा चौघडा बंद करवला. " माधवराव गेले, त्यांच्या जागी गोपाळराव आहेत असं माना " असं पेशव्यांनी गोविंद हरींना लिहून पाठवलं. पेठेमामांनी लिहिलं, "आम्हा ब्राह्मणांमधे गोपाळराव मुकुटमणि होते. ते आपल्या वक्रातच गेले. आपला दरारा ठेवूनच गेले." हरभटबाबांपासून चालत आलेला समस्त पटवर्धन घराण्याचा राग हा वारसा होता.

सांवशीची लढाई. पटवर्धनांची संकटात होरपळ.

वर्षभरात १७ नोव्हेंबर ७२ सालात माधवरावही निजधामाला गेले. पेठेमामांच्या हैदरवरच्या मोहिमेत मोतीतलावाच्या लढाईत पळून जाणाऱ्या हैदरचा पराभव केला पण, त्र्यंबकपंतांचे नीलकंठही तोफेच्या गोळ्याने मारले गेले. हे कमी की काय म्हणून बऱ्हाणपूरला राघोबादादांच्या मागे फौज घेऊन धावणारे, वामनदादाही गेले. आता घराण्यात लढवय्या पुरुष एकच राहिला होता. तो म्हणजे परशुरामभाऊ. पण सरदारीचे अधिकार मात्र आले ते पांडुरंग गोविंदच्या हाती, ज्यांना लष्कर, लढाई यातला एकही शब्द परिचित नव्हता. आणि त्याचा महाभयंकर परिणाम पटवर्धन कुळाला भोगावा लागला तो १७७७

सालातील सांवशीच्या लढाईत. आजवरची प्रथा अशी होती की सनद गोविंद हरिंच्या नावाने असल्यामुळे, मोहिमा, कर्ज, कर्जफेड त्यांनी चालवायचं आणि त्र्यंबकपंत आणि परशुरामभाऊ यांनी आपली फौज घेऊन त्यात सामील व्हायचं. पण पांडुरंगतात्यांनी फतवा काढला की खर्च आणि कर्जही सगळ्यांनी वाटून घ्यायचं. त्याला परशुरामभाऊंनी विरोध केला आणि हैदरविरोधीच्या मोहिमेत ते सामील झाले नाहीत. काहीही लष्करी अनुभव नसलेल्या पांडुरंगतात्यांच्या हाताखाली, फौजा बाहेर पडल्या. हैदरच्या कसलेल्या कुमदान सेनापतीची गाठ पडली. सांवशीच्या किल्ल्यात तो दडून बसला आणि पटवर्धन फौजा आल्याबरोबर त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. सांवशीला पटवर्धन फौजेचा पूर्ण धुव्वा उडाला. पांडुरंगतात्या हैदरकडे पाडाव होऊन गेले. साखळदंडात त्यांना श्रीरंगपट्टणला नेण्यात आलं. तिथेच १० महिन्यांनी कैदेत त्यांना ताप आला आणि त्यात निधन झालं. कुरुंदवाडचा कोन्हेरेही या लढाईत ठार झाला. पटवर्धन घराण्यावर दु:खाचा आणि संकटाचा डोंगर कोसळला. सबंध घराणं उध्वस्त झालं. आता एकच वीर घराण्यात उरला होता, तो म्हणजे परशुराम रामचंद्र पटवर्धन. त्यामुळे परशुरामभाऊच मुख्य झाले. स्वराज्याच्या क्षितिजावर या काळोख्या वादळी रात्रीनंतर त्यांचा उदय झाला होता. त्यांना घराणं, सरदारी, सगळंच वाचवायचं होतं. पटवर्धन बंधूंमधली फूट घर भेदून गेली. कर्जाने कंबरडं मोडलं. लूटीमुळे होतं नव्हतं तेही गेलं. गोपाळराव, वामनराव, नीलकंठ आणि कोन्हेरे त्र्यंबक, पांडुरंग गोविंद, आणि पुत्रशोकाने त्र्यंबक हरि आणि गोविंद हरि एवढ्या शूरांचे ६ वर्षात मृत्यू झाले. पटवर्धन बंधूंमधली एकजूट संपली आणि त्या फूटीने मिरज, कुरूंदवाड, तासगाव वैभवगंगेचे वेगळे ३ प्रवाह झाले. आता पटवर्धन सरदारीची पालखी

परशुरामभाऊंच्या खांद्यावर आली. त्यांना साथ होती ती पांडुरंगतात्यांचे पराक्रमी चिरंजीव चिंतामणआपांची.



सरदार परशुरामभाऊ पटवर्धन.

परशुरामभाऊ आता पटवर्धन सरदारीचे प्रमुख झाले. चित्रदुर्गच्या राजाला छळणाऱ्या हैदरविरुध्द परशुरामभाऊ आणि हरिपंत फडक्यांनी नोव्हेंबरमधे तुंगभद्रा ओलांडून चित्रदुर्गाकडे चालायला सुरुवात केली पण वाटेत त्यांची कही लुटली गेली तेव्हा फौजेत कुणीतरी फितूर आहे अशी परशुराम भाऊंना शंका आल्यावरून शोध घेतला तेव्हा मानाजी फाकडेने १ लाख होन फौजेत वाटले असल्याची खबर लागली. तेव्हा त्याचा गोट लुटला पण मानाजी फाकडे पळून गेला. एवढ्यात पुण्यामधे नाना फडणीसांचे चुलत बंधू मोरोबादादांनी नानांविरूध्द कारस्थान केल्यावरून भाऊ आणि फडके त्वरेने पुण्यात पोचले. मोरोबांचं बंड थंडावलं, आणि नाना फडणीसांच्या हाती परत सत्ता केंद्रित झाली.

पेशवे माधवरावांच्या निधनानंतर स्वराज्याच्या मंदिरावरही एका पाठोपाठ घाव बसत होते. माधवरावांच्यानंतर पेशवेपदावर आलेल्या नारायणरावांच्या, ९महिन्यांमधे झालेल्या त्यांच्या शनिवारवाड्यातील खूनाने महाराष्ट्र हादरला. आता राघोबांपासून स्वराज्य वाचवायला बारभाई मंडळाची स्थापना झाली. त्यात परशुरामभाऊही होते. नाना फडणीस आणि सखारामबापूंच्या हाती दक्षिणेचा कारभार आणि उत्तरेचा बंदोबस्त महादजी शिंद्यांच्या हाती असं जबाबदारीचं वाटप झालं. नाना फडणीसांना लष्करी शिक्षणाची कमतरता होती ती त्यांनी हरिपंत फडके हा आपला सेनापती नेमून दूर केली. नारायणरावांच्या पत्नी गंगाबाई यांना पुरंदरावर ठेवलं. थोड्याच अवकाशात एप्रिलमधे गंगाबाईंना पुत्र झाला, त्याचं नामकरण सवाई माधवराव

करून तो ४० दिवसांचा झाल्यावर त्याच्या नावे पेशवाईची वस्त्रे साताऱ्याहून आणली आणि पेशव्यांच्या नावे कारभार सुरू झाला. या वेळी नाना आणि सखारामबापूंना राघोबांना भेटायला जावं लागलं. तेव्हा नवजात बाळाचं संरक्षण करण्यास कुणाला सांगावं या चिंतेत नाना आणि बापूंना आठवले ते पुरुषोत्तमदाजी पटवर्धन. ती जबाबदारी दाजींनी अत्यंत जागरूकपणे डोळ्यात तेल घालून सांभाळली. एक आख्यायिका सांगते की एक दिवस एक बाई बाळाच्या खोलीत जायला लागल्या तेव्हा दाजींना तिच्या देहबोलीवरून शंका आली. त्यांनी लगेच तिला धरली. तेव्हा तिच्या आंबाड्यात चाकू लपवलेला सापडला. बापू, नाना येईपर्यंत दाजी पुरंदरावरच मुक्कामाला होते. मराठी फौजांना चुकवत शेवटी राघोबादादा पेशवेपद मिळवण्यासाठी इंग्रजांना जाऊन मिळाले.

इंग्रजांचं पुणे जिंकायचं स्वप्न धुळीला.

या अस्थिरतेचा फायदा घेतला तो हैदरअलिने आणि इंग्रजांनी. इंग्रजांचा पुण्यातला वकील मॉस्टीन याने दादांना गादी मिळवून देण्यासाठी मोरोबादादा आणि इतर असंतुष्टांना हाताशी धरलं. ते महादजी शिंद्याच्या चतुराईमुळे फसलं आणि नाना परत सत्तेत आले. मॉस्टीनचं नाना फडणीसांना घालवायचं स्वप्न धुळीला मिळालं. आता इंग्रजांनी हा राघोबा हुकूमाचा एक्का हाताशी धरला आणि इंग्रज राघोबादादांना घेऊन पुण्याकडे यायला लागले. राघोबादादांना पेशवेपदावर बसवण्याचा तह दादांशी २४ नोव्हेंबरला करून, २५ नोव्हेंबर १७७८ या दिवशी, इंग्रजी पलटणी पनवेलला उतरल्या. मुंबई किल्ल्यासमोर पनवेलात उतरून, चौक, खोपोली, राजमाची , खडकी, चिंचवड

मार्गे इंग्रज पुण्यात पोचत. तसेच यावेळी कर्नल इगर्टनच्या हाताखाली ५०० इंग्रज आणि २००० भारतीय शिपाई घेऊन सर्व खंडाळ्याला पोचले. पुण्यात नाना फडणीसांनीही महादजी शिंद्यांच्या हाती सर्व सूत्रं दिली. इगर्टन घेऊन पुढे पुढे यायला लागल्यावर मराठ्यांनी आधीच तिथला प्रदेश जाळून टाकायला सुरुवात केली आणि घाटातील रस्ताही मराठ्यांनी बंद करून टाकला. शेवटी ९ जानेवारी ७९ सालात वडगाव-तळेगावावर इंग्रजांचा पूर्ण पराभव झाला. पुण्याला पोचणे फार कठीण आहे हे खूप नुकसान झाल्यावर इंग्रजांच्या लक्षात आलं. म्हणून तळेगावावर इंग्रजांनी शरणागती पत्करली. केवळ अति लोभ हेच इंग्रजांच्या या स्वारीचं कारण होतं. पण इंग्रजी लष्करी सामर्थ्याचं महत्त्व महादजी शिंद्यांनी लगेच हेरलं आणि भविष्यात आपलं सामर्थ्य वाढवलं. राघोबादादा मराठ्यांच्या ताब्यात आले आणि त्यांना शिंदे -होळकरांनी झांशीला नेण्याचं ठरलं. राघोबांचा झांशीकडे प्रवास सुरू झाला. पण महेश्वरावर नर्मदेच्या तीरावर असतांना अचानक राघोबांनी दगा दिला आणि ते परत पळून सुरतेला इंग्रजी सेनापती गॉडर्डला जाऊन मिळाले. परत एक मोठा फटका दादांनी कारभाऱ्यांना दिला. याच १७७९ सालात हैदर, निजाम, नागपूरकर भोसले यांना एकत्र आणून सर्वांनी वॉरन हेस्टींगच्या हावभरी होण्याला आवर घालण्यासाठी मोठा लढाईचा उपक्रम केला. त्या ४/५ वर्षांच्या लांबलेल्या महायुध्दाने इंग्रज आणि मराठे दोघेही होरपळले.

राघोबा हाती असल्यामुळे चिवट इंग्रजांना स्वराज्य जिंकण्याचा लोभ सुटत नव्हता. वडगावावर झालेला अपमान पुसण्यासाठी गॉडर्ड आणि ग. ज. वॉरन हेस्टींगने पुण्यावर चालून जाण्याची तयारी केली. गॉडर्डने आधी वसई

जिंकायची ठरवली आणि मग कल्याण, बदलापूर कर्जत मार्गे पुण्यावर चालून जाण्याचा बेत केला. हार्टले नावाच्या सेनाधिकाऱ्याने मराठी फौजा अडवण्यासाठी बदलापूरास कुळगावावर छावणी केली. मराठ्यांच्या फौजा वज्रेश्वरीवर पोचल्या असतांना हार्टलेच्या फौजेबरोबर मोठी लढाई रामचंद्र गणेश या जुन्या सेनापतीने केली. ते स्वत: या लढ्यात ठार झाले पण हार्टलच्या सैन्याचीही दैना झाली. वसई गॉडर्डने जिंकली आणि आता हार्टलेच्या मदतीसाठी तो निघाला. हार्टलशी हरिपंत फडके आणि पटवर्धनांच्या फौजा भिडल्या.

गॉडर्ड वज्रेश्वरीवरून कर्जत मार्गे, बोरघाटाला लागला. गॉडर्ड फौज घेऊन खंडाळयाच्या तळयाजवळ तोफांच्या बंदोबस्ताने राहिला. परशुरामभाऊंनी खंडाळयाची पहाणी केल्यावर तिथे लढणं उपयोगाचं नाही हे सर्व सरदारांच्या लक्षात आलं. आता एकच मार्ग होता तो म्हणजे त्यांची मुंबईहून येणारी रसद तोडणे. म्हणून परशुरामभाऊंवर ती कामगिरी सोपवली. भाऊ कोळंब्याच्या घाटाने खाली उतरले. खोपोलीजवळ पेज नदीतीरावर त्यांनी छावणी केली आणि लगेच रसद घेऊन जाणाऱ्या इंग्रजी पलटणीवर दोन वेळा हल्ला केला. त्यात इंग्रजांचे ४०० शिपाई ठार झाले. डेरे राहुट्या, चांदीची भांडी, ५००० बैलजोड्या, उंट, बंदूका, दारूगोळयाचे छकडे लुटले. पनवेलहून ५ पलटणे निघाली हे कळल्याबरोबर, तुकोजी होळकरांनी त्यांनाही झपाटलं आणि मोठी लूट आणली. गॉडर्डने खंडाळयाहून मदतीसाठी फौज पाठवली ती काल्र्यावर तळ देऊन राहिलेल्या हरिपंतांनी लुटली. एकूण, खालून आणि वरून मराठ्यांनी रसद बंद केली. गॉडर्डला हा हिंसका भारी पडला. पुण्याला पोचता

येणार नाही याची खात्री झाली तेव्हा सपशेल माघार घेऊन, गॉडर्ड घाट उतरायला लागला तेव्हा तर मराठ्यांना चेवच आला. वरून हरिपंत आणि खालून भाऊ आणि होळकर यांनी इंग्रजी फौजेला चिमटीत धरून भरपूर लुटलं. लढाई मातब्बर झाली. इंग्रज घाबरा झाला असं नानांनी सातारला कळवलं. गॉडर्डची फौज खालापूरला राहिली आणि कशीबशी चौककडे जायला लागली तेव्हा त्यांचे १०००/ १२०० सैनिक ठार झाले. बेसुमार प्रचंड मोठी लूट मराठ्यांना मिळाली. गॉडर्ड कसाबसा पनवेला पोचला आणि मग मुंबईला गेला. गॉडर्डला मराठ्यांचा हिसका कळला. परशुरामभाऊ आणि होळकरांचा हा हिसका होता.

"गाडराने हिंदुस्थानात जागोजाग लढाया केल्या, त्याच तोऱ्याने इकडे मर्दुमकी दाखवयाला आला. त्याचा गर्वपरिहार जाला. अशी जरब आजतागाईत इंग्रजांना बसली नव्हती. मुंबईतील सारे जन हासते." नाना फडणीसांनी सातारला महाराजांना कळवलं. त्यानंतर परशुरामभाऊ माघारी घरी आले.

पुढचं ८२ साल भारतीयांसाठी फार वाईट गेलं. फ्रेंचांकडून युध्दसाहित्य घेऊन इंग्रजांशी समर्थपणे लढणारा हैदरअलीचा मृत्यू हे द. भारताला लंगडं करणारा ठरला. हैदरअलीच्या जागी आलेला त्याचा पुत्र टिपू सुलातान हा मराठ्यांनाही भारी झाला. त्याच्याविरूध्द लढण्यात पुढचं दशक संपलं. कित्तूर, कुर्ग, नरगुंदवर त्याचे हल्ले सुरु झाले. २ जुलै १७८५ ला नरगुंदवर हल्लाकरून भावे यांना साखळदंडात अडकवून टिपूने पट्टणला नेलं. टिपूने आपले दोन वकील नानांकडे पुण्याला पाठवून बोलणी चालू ठेवून त्यात त्यांना अडकवून ठेवलं. लष्करी डावपेंच कळत नसलेल्या नानांना फसवून त्या काळात टिपूने

मराठ्यांच्या मुलूखावर हल्ले केले. त्यामुळे परशुरामभाऊ हताशपणे नरगुंदकर भाव्यांचा हा अध:पात पाहात राहिले. पण याचा वचपा काढण्यासाठी नाना फडणीस आणि निजामाने यादगीरवर भेटून टिपूवर चालून जाण्याची मोहीम आखली. त्याप्रमाणे परशुरामभाऊंच्या फौजा बदामीकडे चालायला लागल्या. बदामीचा टिपूचा किल्ला जिंकायचं त्यांनी ठरवलं. रणनीती कसलेल्या, अनेक लढाया जिंकलेल्या परशुरामभाऊंच्या एकट्यांच्या विचाराने चालली होती. बदामीचा किल्लेदार गुलाम हैदरने नरगुंदकर भाव्यांना क्रूर वागणूक दिली होती. त्यामुळे, परशुरामभाऊंना त्यालाच शासन करायचं होतं. हा अभेद्य किल्ला जिंकण कठीण होतं. तेवढ्यात टिपूची फौज किल्ल्याच्या रक्षणासाठी येते आहे हे कळल्यावर आणि किल्ल्यातील ५ तोफा निकामी झाल्या आहेत ही बातमी काढल्यावर भाऊंनी किल्ल्याच्या तटबंदीला शिड्या लावल्या आणि फौज आत उतरवून किल्ला जिंकला. गुलाम हैदर हाती आला पण नानांनी त्याला जाऊ दिलं म्हणून परशुरामभाऊ खूप नाराज झाले.

८३ साल उजाडलं. आयुष्यभर पेशवेपद मिळावं म्हणून शत्रूला जाऊन मिळणारे राघोबादादा या साली नाशिकला मरण पावले. मरणापूर्वी त्यांनी गोदावरी तीरावर प्रायश्चित्त घेऊन गोपिकाबाईंचं समाधान केलं. सखारामबापू बोकिलांना फितूरी केल्याच्या सबळ पुराव्यांमुळे कैद करून अटकेत ठेवलं. पुणे दरबारात आता नवीन राजकीय वळण लागलं. भारतीय सत्ताधीशांशी राजकारण खेळण्यात नाना फडणीस आणि लष्करी बाजू सांभाळण्यासाठी महादजी शिंदे अशी कारभाराची वाटणी झाली. भारतीय सत्ताधीशांनी इंग्रजांचा वाढता हस्तक्षेप टाळण्यासाठी भारतीय फौजेला इंग्रजी वळण देण्यासाठी फ्रेंच

सेनाधिकाऱ्यांना हाताशी धरलं. जी दुरंगी सत्तास्पर्धा युरोपात इंग्रज आणि फ्रेंचात चालली होती, हे नवीन वळण युरोपातील त्यांच्या जयापजयावर बदलायला लागलं. टिपू सुलतानच्या महाराष्ट्रावरील वाढत्या चढायांमुळे त्याची सत्ता कमी करणे हाच एक उपाय नाना आणि निजामाकडे उरला. याचवेळी आणखी एक मोठा बदल राजकारणात झाला. ८६ सालात उत्तम सेनानी आणि प्रशासक असलेला कॉर्नवॉलिस हेस्टींगच्या जागी गव्हर्नर जनरल बनून आला. उत्तर भारत हाताशी आल्यावर आता इंग्रजांना त्यांचे दोन मोठे शत्रू मराठे आणि टिपू सुलातनच होते. यावेळी मराठे आणि निजाम आपापले सुप्त हेतू मनात ठेवून इंग्रजांचा फायदा करून घेण्यासाठी पुढे आले. या दोघांनाही टिपूचा वरचष्मा कमी करायचा होता पण त्याला संपवायचं नव्हता कारण इंग्रजी सत्तेला थपवण्याचं काम तोच करू शकत होता. या तिघांची युती झाली. इंग्रजांना मराठ्यांचं घोडदळ हवं होतं, मराठ्यांना त्याचं युध्दसाहित्य आणि या दोघांना निजामाची फौज हवी होती. या युतीतून घडलं ते मैसूरचं टिपू सुलतानाविरूध्दचं १७९१ सालचं युध्द.

या मोहिमेप्रमाणे टिपूने गिळलेला मुलूख सोडवायची जबाबदारी भाऊंवर होती. ते कार्य पार पाडून इंग्रजी फौजेला जाऊन मिळायचं काम होतं. १७९१ सालच्या दसऱ्यानंतर परशुरामभाऊ आणि हरिपंत फडके धारवाडचा किल्ला जिंकायला निघाले. धारवाडचा किल्ला रसद बंद करूनच मिळवायचा होता कारण त्यांच्याकडील युध्दसाहित्य अत्यंत फुटकं आणि कमी होतं. इंग्रजांचा फ्रेडरिक त्यांना सामील झाला. शेवटी रसद बंद करून झालेल्या अन्नपाण्याच्या हालांमुळेच किल्ला हाती आला. त्यानंतर भाऊ टिपू

सुलतानाची प्राणप्रिय नगरी बिदनूर घ्यायला गेले. नरगुंदकर भाव्यांच्या अमानूष वागणुकीचा टिपू सुलतानवरचा सूड त्यांनी बिदनूर लुटून फेडला. तिथे लूटालूट करून ते इंग्रजी फौजेला मिळायला श्रीरंगपट्टणच्या दिशेने चालायला लागले. त्याचवेळी पट्टणचा वेढा सोडून द्यायच्या विचारात असलेल्या कॉर्नवॉलिसच्या फौजाला भाऊंची फौज भेटली. उपासमारीने हैराण झालेल्या या फौजेने भाऊंकडील सर्व अन्न आधाशीपणाने संपवलं. अगदी दहीसुध्दा चाटून खाल्लं. या नंतर श्रीरंगपट्टणची घमासान लढाई ९२ सालच्या विजयाच्या शेवटाने संपली. एकटा टिपू सुलतान तीन फौजांशी लढला पण शेवटी हरला. टिपूची शक्ती अर्ध्यावर आली.

परशुरामभाऊंच्या नेतृत्त्वाखालची मराठ्यांची शेवटची यशस्वी खर्ड्याची लढाई. ११ मार्च १७९५

मराठी साम्राज्याची भिंत कोसळावी अशी बातमी फेब्रुवारी ९४ सालात आली ती म्हणजे महादजीबाबा शिंद्यांचा कैलासवास झाला. पाठोपाठ ४ महिन्यांमधे हरिपंत फडकेही वारले. त्यामुळे स्वराज्याची बाजू आणखीनच खचली. एकटे परशुरामभाऊ स्वराज्यात शिल्लक राहिले. परशुरामभाऊंच्या कारकीर्दीतला मानाचा आणखी एक तुरा वाढेल असं खर्ड्याचं मोठं युध्द ९५ सालात घडून आलं. हा लढा निजाम विरूध्द मराठे असा झाला. निजामाने आजवर बुडवलेली ३ कोटी रुपयांची खंडणी हेच त्याचं निमित्त झालं. राक्षसभुवनच्या लढाईनंतर निजामाने दरवर्षी त्याच्या उत्पन्नाचा एक तृतियांश भाग खंडणी म्हणून देण्याचं करारात कबूल केलं होतं. माधवराव असेपर्यंत निजामाने करार पाळला. पण नंतर पुणे दरबारच इतक्या संकटातून जात होता

की निजामाने त्याचा फायदा घेऊन खंडणी देणं थांबवून टाकलं. निजामाने टिपूच्या लढाईनंतर खंडणी देण्याचं पुणे दरबारचे वकील गोविंदराव काळे यांना कबूल केलं. पण निजामाचा दिवाण मुशीर उल मुल्क याने निजामाला सुचवलं की ३ कोटी देण्यापेक्षा आपण मोठी फौज उभारू आणि मराठ्यांशी लढू. त्यामुळे निजामाने आपली फौज प्रचंड वाढवली. तेव्हा नाना फडणीसांना ती खंडणी मिळवण्यासाठी शस्त्र धरावं लागलं. या लढाईचं सेनापतीपद दीर्घ अनुभवी परशुरामभाऊंच्या हाती आलं. मराठा साम्राज्याचे सर्व सरदार शिंदे होळकर, भोसले, गायकवाड, फडके, गोळा झाले. निजामाची फौज कूच करून गेली आहे ही बातमी मिळताच मराठी फौजाही अहमदनगर घोडेगावाजवळ थांबल्या. निजाम तळसंगीवर होता. त्याच्या पहिल्या अनपेक्षित हल्ल्यात मराठी फौज मागे सरकली तेव्हा गोविंदरावांना निजामाने दरबारात बोलावलं आणि खुनशी दिवाण मशिर उल मुल्कने नाना, परशुरामभाऊ, दौलतराव वगैरेची सोंगे स्त्रीवेष देऊन दरबारात नाचवली. ती बातमी गोविंदरावांनी नानांना कळवल्यावर निजामाचा शेवट करणं एवढाच निर्णय एकमताने नानांनी बोलावलेल्या सभेत झाला. आणि मग ११ मार्चला घामासान युध्द झालं त्यात निजामाचा दारूण पराभव झाला. मोठा नरसंहार झाला. शेवटी निजामाला युध्दसाहित्य रणांगणावर टाकून खर्ड्याच्या किल्ल्यात आश्रयाला जावं लागलं. मग तर मराठ्याचं काम आणखीनच सोपं झालं. निजामाला पुरता कोंडून त्याला शरण आणण्याने या लढाईचा शेवट झाला. परशुरामभाऊंच्या डोळ्याला जखम झाली. पटवर्धन कुटुंबातला विठ्ठल ठार झाला. स्वराज्यातला हा मोठा शेवटचा विजय अशी त्याची नोंद इतिहासात झाली. निजामाने सर्व पैसा देण्याचं कबूल केलं. निजामाने इंग्रजांची मदत मागितली पण त्यांनी नाकारली. खरं तर इंग्रज आणि मराठ्यांची

झुंज व्हावी आणि आपण मराठ्यांचा प्रदेश लुटावा अशीच त्याची योजना असावी.

पाठोपाठ ९५ सालात तर स्वराज्य मंदिराचं छतच कोसळलं. तरूण सवाई माधवरावांचा शनिवारवाड्याच्या सज्ज्यातून खाली पडून आकस्मिक मृत्यू ओढवला. या अपघातामुळे त्यांचा पाय मोडला, शल्य विशारदाने हरिणाच्या पायाची जोड देऊन तो उभाही केला पण नंतर ४ दिवस ताप येऊन त्यात पेशव्यांचं निधन झालं. (आता पायात रॉड घालतात) हे एकच मोठं संकट आपल्याबरोबर अनेक संकटांची माळ घेऊन अवतरलं.

पेशवेपदासाठी बाजीराव-नाना यांच्यात तीव्र संघर्ष. परशुरामभाऊंचा सहभाग.

नाना फडणीसांना आता पेशवेपदावर कुणाला बसवायचं याचा निर्णय घ्यायचा होता. यावेळी राघोबादादांचे चिरंजीव दुसरे बाजीराव हेच खरे वारसदार होते, पण नाना फडणीसांना बाजीराव नको होते आणि बाजीरावांना नाना नको होते पण पेशवेपद हवं होतं. या संघर्षातून निर्माण झालं ते अत्यंत खिन्न करणारं, अस्थिरतेच्या, अराजकाच्या गर्तेत नेणारं राजकारण. फितूरी, पैसा ओतून माणसं फोडणं, वचनं मोडणं, करार करून मोडणं यांना उत आला. त्यामुळे दरबार नासला. बाजीराव असतांनाही नानांनी बाहेरचे वारस शोधायला सुरुवात केली हे परशुरामभाऊंसकट कुणालाच आवडलं नाही. चिमाजी आपांना सवाई माधवरावांच्या पत्नीला दत्तक देण्याचं कारस्थान झालं. चिमाजी आपा वयाने १० वर्षांचे असले तरी यशोदाबाईंचे सासरे होते. पण आता नानांना घाई करायची होती कारण बाजीरावाने शिंद्याशी पैका कबूल करून मदतीला

बोलावलं होतं. तेव्हा बाजीराव आणि चिमाजी यांना आणण्यासाठी नानांनी परशुरामभाऊंना जुन्नरला बाजीरावांकडे पाठवलं. बाजीरावांनी भाऊंना, आपला हक्क आहे हे आणि यशोदाबाईंच्या मांडीवर चिमाजी आपाला दत्तक हे ठासून नाकारलं. परशुरामभाऊंनाही ते मान्य होतं.परशुरामभाऊंनी पुण्याला हा सगळा तपशील पोचवला आणि आता काय करायचं हे विचारलं. तेवढ्यात पुण्याला शिंदे फौज घेऊन बाजीरावांना न्यायला येत हेत ही बातमी नानांना कळली. तेव्हा बाजीरावही हातचे जाणार, सत्ताही जाणार आणि पुण्यात राहणंही धोक्याचं होणार हे लक्षात घेऊन नानांनी बाजीरावांना पुण्यात घेऊन येण्याचा निर्णय भाऊंना कळवला. भाऊंनी नानांना शपथ घातली की पुण्याला आल्यावर बाजीरावांना पेशवेपद द्यावं ते नानांनी मान्य केलं. परशुरामभाऊ बाजीरावांना घेऊन पुण्याजवळ खडकीला आले. तिथेच बाजीरावांनी तळ केला. नानांनी त्यांना शनिवारवाड्यात चलण्याविषयी आग्रह केला पण शिंदे येईपर्यंत बाजीरांवीं तो साफ फेटाळला. आपण नानांच्या दबावाखाली राहणार नाही हे स्पष्ट सांगितलं. मग दोघांच्यात समेटाच्या आणाशपथा झाल्या. त्या काळात नानांनी ४ लाख रुपये वाटून शिंद्यांच्या चिटणीसातर्फे फितूरी घडवली. परशुरामभाऊंच्याच शब्दात सांगायचं तर “आत आत मनस्वी राजकारणे. कोणाचा कोणावर विश्वास नाही. आणाशपथांना तर ताळच नाही.”

हेच तंतोतंत खरं वर्णन पुणे दरबारी मंडळींचं होतं. त्यात भाऊही लपेटले गेले.

बाजीरावांना शिंद्यांकडून अटक.

बाजीरावांना आपल्या हाती घेण्याचा डाव नानांनी उधळला म्हणून संतापलेले दौलतराव शिंदे पुण्याच्या रोखाने येऊ लागले. तेव्हा नाना फडणीसांना आपलं भविष्य स्वच्छ दिसलं. जवळ जवळ २० कोटींचा सारा खजिना आणि कुटुंब घेऊन ते साताराकडे पळाले. शिंदे आल्यावर बाजीरावांनी शनिवारवाड्यात प्रवेश केला. परशुरामभाऊ त्यांच्याच समवेत होते. पुण्यात आल्यावर पेशवेपदाची वस्त्रे घ्यायला सातारला जाणं आवश्यक होतं. आपल्याला कबूल केलेला पैसा आत्ता द्या, आणि नाना फडणीसांना कारभारातून काढा या मागणीसाठी दौलतराव शिंदे हटून बसले. नानांशिवाय पुण्यातला कारभार शक्य नाही आणि शिंद्यांशिवाय पेशवेपद टिकणे शक्य नाही या कात्रीत बाजीराव अडकले. खजिन्यात पैसाच नसल्यामुळे दौलतरावांना द्यायला बाजीरावांजवळ पैसाच नव्हता. बाजीराव हाती येत नाहीत हे पाहिल्यावर दौलतराव शिंद्यांनी आपला बेत बदलला. त्यांनी परशुरामभाऊंना आपल्याकडे वळवून घेतलं. नवीन कट केला. बाजीरावांना कैद करायचं, चिमाजीआपांना गादीवर बसवायचं, आणि पुण्याचा कारभार भाऊंनी पाहायचा असा करार दोघांच्यात झाला. परशुरामभाऊंनी त्याबदल्यात २५ लाख रोख आणि निजामाकडील पैसा आल्यावर त्यातील ७५ लाख असे पैसे द्यायचे आणि परशुरामभाऊ स्थिरावले की दौलतराव शिंद्यांनी निघून जायचं असा करार ठरला. या करारामुळे आजवर पटवर्धन घराण्यात पुण्यातील सत्तेत सहभागी व्हायचा योग आला नव्हता तो योग आला. हे सगळं गुप्तपणे ठरलं.

हे सगळं घडल्यानंतर जेव्हा १७ एप्रिलला बाजीराव शिंद्यांच्या तळावर दौलतरावांना भेटायला गेले तेव्हा दौलतरावांचे तलवारी घेतलेले शिंद्याचे हस्तक त्यांच्याभोवती उभे राहिले. बाजीरावांना त्यांनी स्नानसंध्येसाठीही उठू दिलं नाही. तेव्हाच बाजीरावांना आपल्याला शिंद्यांनी कैद केल्याचं लक्षात आलं. पण बाजीराव घाबरले नाहीत हे दौलतरावांना अनपेक्षित होतं. परशुरामभाऊंना ही बातमी कळल्याबरोबर त्यांनी चिमाजीआपाला जबरदस्तीने पालखीत घालून खडकीहून पुण्याला पलायन केलं. ही बातमी बाजीरावांना कळल्यावर ते सुन्नच झाले. शनिवारवाड्यात पोचल्यावर भाऊंनी शास्त्रीबुवांना बोलावून २५ मेला त्यांचे यशोदाबाईंच्या मांडीवर ठेवून दत्तकविधान उरकलं आणि २ जूनला चिमाजीआपांना पेशव्यांच्या मसनदीवर बसवलं. यानंतर नाना फडणीसांना अटक करण्याचं कारस्थानही शिंद्यांचं ठरलं होतं. पण परशुरामभाऊंचा त्याला विरोध होता. आपल्याला कैद होणार हे माहीत असलेले नाना साताऱ्याहून महाडला पोचले आणि तिथेच राहिले.

नानांचं महाड कारस्थान.

सत्तालोलुपता, फसवाफसवी कट या साऱ्या अधोगतीत फसलेल्या स्वराज्यातून सातारला निघून गेलेले नाना फडणीसही आपल्या अजब चातुर्याने आपल्या चाली खेळायला लागले. शिंद्यांच्या फौजांना अटकाव करण्यासाठी मार्गातील झाडे तोडून, रस्ते उखडून टाकले. महाडला पोचल्यावर त्यांनी निजाम, भोसले, इंग्रज, कोल्हापूरकर, होळकर यांच्याशी संपर्क साधून पाठिंबा मिळवला. इंग्रजांना शिंद्यांवर स्वारी करण्यासाठी चिथावलं, होळकर, निजाम यांच्या पदरात भरपूर फायदे घातले आणि दौलतराव शिंदे यांच्याशीही संधान

बांधलं. बाजीरावांना शिंद्यानी गादीवर आणायचं, आणि परशुरामभाऊंच्या मदतीला असलेल्या दौलतरावांचे दिवाण बाळोबा तात्यांना अटक करायची , मग नाना पुण्यात आले की शिंद्यांनी परत जायचं. त्याबद्दल शिंद्यांना १ कोटी रुपये कबूल केले. शिंदे आता चांगलेच कोंडीत सापडले. एकीकडे इंग्रज स्वारीची भीती, दुसरीकडे नानांचा खेळ, यावर नानांना शरण जाण्याशिवाय दौलतराव शिंद्यांना दुसरा पर्यायच उरला नाही. ही बातमी कळताच परशुरामभाऊ चिमाजीआपांना घेऊन जुन्नरकडे पळाले. पण शिंद्यांच्या फौजांनी त्यांना आणि चिमाजीआपांना कैद करुन तुरुंगात डांबलं. मग नाना २५ नोव्हेंबरला महाडहून पुण्यात आले. नानांनी ५ डिसेंबर १७९५ या दिवशी बाजीरावांना पेशवेपद दिलं आणि स्वत:कडे कारभार घेतला. परशुरामभाऊंची परिस्थिती तर आणखीनच बिघडली. नाना फडणीसांनी परशुरामभाऊंना मांडवगणच्या तुरूंगात बंदिस्त केलं. त्यांच्या अनुनयांकडून, नातेवाईकांकडून, भरपूर पैसा उकळला. परशुरामभाऊ आणि बाजीराव यांच्यातही फूट पाडली.

परशुरामभाऊंची अखेर. करवीरकर आणि भाऊंमधे लढाई.

महाभारतात मौसल पर्वात सर्वच महारथींची शक्ती नाहीशी झाली असा उल्लेख आहे. स्वराज्याच्या ऱ्हासकाळात, पुणे दरबारातील अनेकांचीही हीच गत झाली. नाना फडणीसांना अटक लबाडीने झाली. महादजी शिंद्यांच्या बायका आपल्या मागणीसाठी दौलतराव आणि नाना यांच्याविरुध्द दक्षिणेत येऊन दंगा करायला लागल्या. सातारचे छत्रपती आणि करवीरकर महाराज हेही मागे राहिले नाहीत. सर्जेराव घाटगे, रास्ते आपापल्या परिने भर घालतच होते. या सर्वांवर वचक ठेवणारा सामर्थ्यवान मात्र कुणीच उरला नाही. महाडला


असतांना परशुरामभाऊंवरील रागावरून, नाना फडणीसांनी पटवर्धनांचा मुलूख हवा तसा लुटायची परवानगी कोल्हापूरकर शिवाजी महाराजांना दिली. त्यामुळे करवीरकर पटवर्धनांच्या मुलखात दंगा करायला लागले. यातून भाऊ विरुध्द करवीरकर भांडणाचा जन्म झाला. बाजीराव या सगळया अंदाधुंदीने घाबरून गेले. या सर्वांवर ताबा मिळवायचा असेल तर परशुरामभाऊंना मांडवगणाच्या तुरूगातून सोडा आणि त्यांच्याकडे मोहीम सोपवा असा सल्ला माधवराव रास्त्यांनी दिला. परशुरामभाऊंची प्रकृती तुरूगात बिघडलेलीच होती. त्यांना हवाबदलच्या निमित्ताने बाहेर काढायचं ठरलं. या सुटकेसाठी भाऊंनी २० लाख रुपये दंड म्हणून भरायचे आणि कैदेत आहोत असेच समजायचे असा करार झाला. परशुरामभाऊ कैदतून मोकळे झाले.

पट्टणकुडीची लढाई .

१६ जून १७९८ ला ते सातारकर छत्रपतींविरूध्द निघाले. रास्त्यांच्या मदतीने सातारचा किल्ला जिंकून ते तासगावला आले. ११ सप्टेंबरला घरात गणेशोत्सव साजरा केला तो त्यांचा शेवटचा सण. गणेशोत्सव संपल्यावर दसऱ्याला परशुरामभाऊ परत मोहिमेवर निघाले. त्यांनी करवीरकरांना नमवून त्यांच्याकडून दंड घेतला. हे करवीरकरांच्या भांडणाचं मूळ ठरलं. एकेक मुलूख जिंकत भाऊ पट्टणकुडीवर आले.

९९ सालच्या एप्रिल मेच्या काळात परशुरामभाऊंची प्रकृती अतिशय नाजूक झाली होती. शरिरात शक्ती अजिबात नव्हती. त्यावर इलाज सुरु झाले पण आता त्यात स्मृतीभ्रंशही सुरु झाला. गोकाकच्या तळावर असतांना तो सर्वांनाच कळला. दिवसभर गंजिफा खळत बसले, वेळेचं भान कळेनासं झालं.

संध्याकाळपर्यंत स्नान नाही, कधी झोपत नाहीत, कधी सकाळी झोपतात ते ऊठतच नाहीत, मनाला येईल ते वेडेवाकडे बोलत राहतात अशी अवस्था झाली.



करवीरकर आणि परशुरामभाऊ यांच्यात लढाई सुरू झाली. भाऊंच्या मदतीला ना पुण्याहून फौज आली ना बंधू कुरुंदवाडकर आणि मिरजकरांकडून मदत मिळाली. दोन्ही फौजा वेदगंगेच्या काठावर आल्या. भाद्रपद वद्य ॥ २ ॥ ला भाऊंचा तळ पट्टणकुटीवर पडला आणि शिवाजीमहाराज २ कोसांवर हमीदवाड्यावर होते. करवीरकर महाराज आणि भाऊ यांच्या फौजा एकमेकांसमोर आल्या. २ सप्टेंबरला करवीरकर महाराजांनी वेदगंगा ओलांडून डोंगराच्या आश्रयाने तळ केला. मंगळवार, भाद्रपद वद्य चतुर्थीला, १७ सप्टेंबरला महाराजांनी आपला तळ सोडून भाऊंच्या फौजेवर हल्ला केला. १

हजार स्वार जवळ ठेवून भाऊंनी गोट सांभाळायचा आणि बाकीच्या फौजेने करवीरकरांवर तुटून पडायचं अशी योजना भाऊंनीच केली. संध्याकाळ होत आली तरी मारगिर चालू राहिली तेव्हा रामचंद्राने वडिलांना तळ सोडण्याचा निरोप पाठवला. भाऊंची फौज सामान लादत असतांनाच शत्रूची फौज भाऊंच्या गोटावर येऊन आदळली. आपल्या लोकांना निघून जायला अवसर मिळावा म्हणून परशुरामभाऊ पालखीतून उतरून घोड्यावर बसले आणि मिळतील तेवढ्या शिपायांसह शत्रूशी लढायला लागले. तेव्हा, भाऊंच्या जवळपासचे सैनिक पळून गेले. भाऊंना तीन जखमा झाल्या. आधीच मरणपंथाला लागलेल्या परशुरामभाऊंना करवीरकर शिवाजीमहाराजांच्या शिलेदारांनी बरेच वार करून त्यांना ठार केलं.

तिकडे भाऊंच्या फौजेचीही पळापळ झाली. परशुरामभाऊंच्या पुत्रांनाही जखमा झाल्या. सगळा गोट लुटला गेला. पटवर्धनांचं मोठं नुकसान झालं. परशुरामभाऊंचं शव जिथे पडलं होतं, तिथे ते उचलून त्याचं दहन करण्यासाठी नारो शंकर करंदीकरांनी महाराजांकडे परवानगी मागितली. हमिदवाडा इथे भाऊंच्या देहावर ब्राह्मण न मिळाल्यामुळे भडाग्नी दिला गेला. गणरायाच्या कृपेने मोठमोठ्या शत्रूबरोबर रणांगणावर झुंजणाऱ्या, अढळ सूर्यासारख्या, स्वराज्यात झळकणाऱ्या पटवर्धन घराण्यातील या शूर पुरूषावर एका सामान्य लढाईत संकष्ट चतुर्थीलाच मृत्यू आला. करवीरकर महाराजांनी तिथे भाऊंचं स्मारक बांधलं. भाऊंचा घोडा जिथे पडला त्याच्याही जागी चौथरा उभारला. परशुरामभाऊ गेले. पटवर्धनांच्या वैभवगंगा काळसागरात सामावली.

भाऊंसारखा शिपाई नाही. गोपाळरावांच्या मागे शिपाई म्हणौन नाव राखिले. असा पेशवे बाजीरावांनी सांत्वनपर मजकूर पाठवला.

स्वच्छ चारित्र्य हे परशुरामभाऊंचं वैभव होतं. बाजीरावांचे विश्वासू, खासगीवाले लिमये हे त्यांचं आजोळ. परशुरामभाऊ एकपत्नीव्रती होते. त्याकाळात ही फार कौतुकाची गोष्ट होती. तासगावचे सावकार जोग हे राधाबाईंचं माहेर. राधाबाई वारल्यावर परशुरामभाऊंनी कायम पांढरे कपडेच घातले. परशुरामभाऊंना ४ पुत्र आणि ४ कन्या होत्या. एक कन्या द्वारकाबाई, कायगावकर पाटणकरांकडे, ठमाबाई ही नवकोट नारायण हुपरीकरांकडे, एक कन्या मनकर्णिका वाईचे सावकार वैद्यांकडे, एक कन्या बयाबाई या बारामतीकर जोश्यांकडे दिली पण लग्नानंतर १५ व्या दिवशी बयाबाई विधवा झाल्या. परशुरामभाऊंनी शास्त्रीबुवांकडे तिच्या पुनर्विवाहासाठी परवानगी मागितली पण अशा विवाहाला शास्त्रात परवानगी नाही असा जबाब मिळाला. त्याकाळात पुनर्विवाहाचा विचार मनात आणणं हे काळाच्या खूप पुढे असणं होतं. भाऊंचे ४ पुत्रही पराक्रमी निघाले. परशुरामभाऊंच्या हाताखाली चिंतामणआपा तयार झाले. तेच सांगलीचे संस्थापक. हरिपूरला गोपाळरावांच्या पत्नी सरस्वतीबाई यांच्या मायेत ते राहिले. पटवर्धन घराण्यातील शूर पुत्र पडला नाही अशी कोणतीही लढाई स्वराज्यात झाली नाही हा या घराण्याचा थोर लौकिक.

सन १७४० मधे जन्मलेले परशुरामभाऊ सन १७९९ च्या १७ सप्टेंबरला अनंतात विलिन झाले. हरभटबाबांचे बंधू विठ्ठल आणि केशव यांच्या यादवाडकर, शीळकर पुत्रांनी स्वराज्याच्या लढाया गाजवल्या. पटवर्धन घराण्यातील ८/१० तरूण पुत्र रणांगणावर पराक्रमाची शर्थ करत असत.

भाऊंच्या जाण्यानंतर ८ महिन्यांमधे १३ मार्च १८०० ला नाना फडणीसही गेले. शिवरायांनी उभं केलेलं स्वराज्याचं सुवर्णमंदिर कोसळलं. स्वराज्याचं वीरांचं तारामंडळ अस्ताला गेलं. १७९० ते १८०० हे दशक स्वराज्याच्या थोर महापुरुषांच्या जाण्याने स्वराज्याच्या भिंती, खांब, कळस सारं उतरवणारं ठरलं. १२ फेब्रुवारी ९४ ला महादजीबाबा शिंदे, पाठोपाठ ४ महिन्यांमधे २० जूनला हरिपंततात्या फडके, १३ ऑगस्ट ९५ ला अहिल्याबाई होळकर, २७ ऑगस्ट ९५ मधे सवाई माधवराव, ९९ सालात परशुरामभाऊ पटवर्धन, १८००सालच्या मार्च १३ तारखेला नाना फडणीस, सारे एकापाठोपाठ गेले. दुसरे बाजीराव हा शनिवारवाड्यावर लागलेल्या इंग्रजी निशाणाला निमित्त ठरला. दुसरीकडे टिपू सुलतानचा मृत्यू हा भारतासाठी नाशकारक ठरला. सगळा भारत उजाड झाला.

सारी भरतभूमी गोऱ्यांच्या हाती पडली. भारतातील राजा-राणी-सरदार-उमराव परंपरेचा लोप झाला. भरतवर्षातील सारीपटावर नियतीने नवीन डाव मांडला. जागातिकीकरणाची सुरूवात होती ती. नवीन औद्योगिक क्रांती आणि नवीन विचारांनी जगरहाटी बदलून गेली. भारतात देदीप्यमान इतिहास घडवणारे निर्माण करणारे तेजस्वी पुरूष मावळले पण अजूनही क्षितिजावर चमकत राहिले आहेत.

.

हा सगळा काल चितारण्यासाठी बहुमोल पुस्तकांचा आधार मिळाला.

Delhi Sultanate- Majumdar Ramesh Cahandra.

गुलशन- इ -इब्राहीमी - फरीश्ता अनुवादक-डॉ, भ. ग. कुंटे

History of Begum Nurjahan- आनंद सुगम

Nur jahan and Jahangir- Robert Caunter, Mountstuart Elphinstone, Stanlev Lane-Pool

मराठी कुळांचा इतिहास भाग 1.- जाधव घराण्याची कैफियत - श्री. गोपाळ दाजीबा दळवी.

मराठी रियासत भाग १- गो.स. सरदेसाई,

छत्रपती शिवाजी - कृष्णराव केळूस्कर


माझा प्रवास - वरसईकर गोडसे गुरुजी.


सरदार परशुराम भाऊ पटवर्धन - ऐतिहासिक लेखसंग्रह.-खरे,


मराठी रियासत भाग ८ - सरदेसाई. या सर्वांनी आपापल्या संशोधनात्मक लेखनाने इतिहास उजळून टाकला. त्यांच्या संशोधनाने, जे घडत गेलं ते मांडता आलं. त्यांची अपार मदत झाली. त्यांचे न संपणारे ऋण आहेत.


ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss…ss.














ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली

डॉ. स्मिता दामले यांची इतर 9 पुस्तके

ONE click on cover/ Book will **OPEN**







ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १५ वे वर्ष.

डॉ. स्मिता दामले यांचे हे दहावे पुस्तक.

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. हल्लीच्या गुगगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत. डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६)

स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्त्रबुद्धे (५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।